म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२८४

७०५५

REFBK-0020254
REFBK-0020254

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र.
विभाग
क्रमांक
नों. दि.

6_1

REFBK 0020254
REFBK-0020254

# आत्मनिवेदन.

या लोकप्रिय पुस्तकाची ही सचित्र चौथी आवृत्ति महाराष्ट्रीय रसिकांच्या हातीं देतांना संतोष वाटत आहे. तीन आवृत्त्या अनुक्रमें १॥, २ व १॥ वर्षांत संपल्या. दिसेंबर १९२७ मध्यें तिसऱ्या आवृत्तीची प्रत शिल्लक राहिली नाहीं. बृहन्महाराष्ट्रांतील प्रसिद्ध मासिकें व वृत्तपत्रें यांच्या विद्वान आणि रसिक संपादकांनीं आजवर या पुस्तकाची प्रशंसा करून आपली रसज्ञता व्यक्त केली. याविषयीं मी त्यांचा फार आभारी आहें.

या संपादक महाशयांचे प्रसन्न अभिप्राय या चौथ्या आवृत्तीस जोडिले आहेत. त्यावरून त्यांची ह्याविषयींची गुणज्ञता कळून येईल. ह्या अभिप्रायांत हें पुस्तक शाळांतून चालू करण्यांत यावें अशा अर्थाच्या ज्या विविध उपयुक्त सूचना करण्यांत झाल्या त्याप्रमाणें कांहीं इंग्रजी शाळांतून 'मराठ्यांचीं संग्रामगीतें' हीं 'काव्यवाचन पाठ' ह्मणून नेमण्यांत आलीं, तर कांहीं म्युनिसिपल व डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्डाच्या अधिकाऱ्यांनीं बक्षिसांकरितां ह्मणून हीं संग्रामगीतें मागविलीं. या शाळाधिकाऱ्यांचाही मी आभारी आहें.

या चौथ्या आवृत्तींत तिसऱ्या आवृत्तीपेक्षां पुढील सहा प्रकरणें अधिक घातलीं आहेत.

१ कल्याणी कल्याणाची
२ स्वराज्य आणि पुत्रप्रेम
३ पित्राज्ञा
४ घेतला सूड जनकाचा !
५ पन्नाचा फन्ना उडवी !
६ भाऊवर गर्दी झाली !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक

REFBK-0020254

दाते ग्रंथ सूचीतून

ले.

लिमये पु. आ.

नाबडी, जळगांव

१०२६

संग्रामगीताच्या चौथ्या आवृत्तीचें वैशिष्ट्य तिच्या प्र
णांत आहे. शिंदे सरकारचे होममेंबर श्रीमंत सरदार खा
महाराज पवार यांनीं गेल्या माधवजयंतीच्या उत्सव प्रसंगीं
ग्रंथकर्त्यास प्रेमळ निमंत्रण केलें. त्याप्रसंगीं श्रीमंत सरदार ख
साहेब महाराजांचे धार-निवासी भ्रात्रीय श्रीमंत धैर्यशील
महाराज पवार संस्थान-मलठण, यांचाही प्रेमळ परिचय घडल
ग्वाल्हेर ही मराठ्यांची राजधानी, तेथें हीं गीतें दोन सभांत
ह्मणवून दाखविलीं गेलीं.

श्रीमंत धैर्यशीलराव महाराज पवार यांच्यासारख्या मरा
ठ्यांच्या शूर कुळांतील उदार व थोर पुरुषांनीं या चौथ्या आवृ
त्तीस आश्रय देऊन मराठ्यांच्या संग्रामगीतांवरील आपलें प्रेम
व्यक्त केलें याविषयीं मी त्यांचें मनःपूर्वक आभार मानितों.

हा योग श्रीमंत सरदार खासेसाहेब महाराज पवार, होम
मेंबर ग्वालियर गव्हर्मेंट यांनीं जुळवून आणिला ही गोष्ट मला,
तशीच संग्रामगीतांच्या वाचकांस सतत स्मृति देत राहील.

बाबजी प्रिंटिंग प्रेसचे मालक व त्यांचे मदतनीस यांनीं
स्वल्प किंमतींत या पुस्तकाची शीघ्र छपाई केली व कामांत
सुबकपणा दाखविला ह्मणून मी त्यांचाही फार आभारी आहे.

पुस्तकाचे एकंदर स्वरूप व चित्रें लक्षांत घेतां एक रुपया
किंमत अधिक वाटणार नाहीं व महाराष्ट्रकाव्यरसिक पूर्वींहून
अधिक प्रेमानें या पुस्तकाचा आदर करतील असा विश्वास
वाटतो.

जळगांव

२१।५।२८

रसिक नम्र

द० आ० तिवारी

२२६४८

मराठ्यांचीं संग्रामगीतें या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीवरील

कांहीं विद्वान व रसिक संपादकांचे अभिप्राय.

२५४४०.०
२००.

## वृत्तपत्रें

**नवाकाळ–मुंबई (ता० २३।७।२६)**

" ......मराठ्यांचीं संग्रामगीतें हा ग्रंथ लोकप्रिय झाला आहे, यांत शंका नाहीं. दोन आवृत्त्या संपून तिसरी आवृत्ति काढण्याचें भाग्य कवींच्या वाट्याला क्वचितच येत असतें. या पुस्तकावर महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व प्रसिद्ध मासिकांनीं व वृत्तपत्रांनीं अनुकूल अभिप्राय दिले आहेत. ह्या गीतांची गोडी महाराष्ट्रीय वाचक वर्गाला लागली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. आजचा काळ ..साराच्या विविध क्षेत्रांत नवे नवे प्रयोग करण्याचा आहे. ह्मणून वाङ्मयांत नवे नवे प्रयोग केलेले हल्लीं विशेष आढळून येतात. परंतु केव्हां केव्हां रसिकतेच्या अभावानें लेखकांचे प्रयत्न हास्यास्पद होतात, तर केव्हां वाचकांना असदभिरुचींचें वळण देणारे असतात. यास्तव जेव्हां योग्य मार्गावर यशस्वी प्रयत्न करण्यांत येतो तेव्हां कवीनें किंवा लेखकानें वाङ्मयांत भर घातलेली दिसून येते.

'मराठ्यांचीं संग्रामगीतें' या पुस्तकानें महाराष्ट्रीय शाहिरी वाङ्मयांत भर घातली आहे. ह्या गीतांसाठीं कवीनें ऐतिहासिक कथानकें किंवा विषय शोधून काढून तीं वाचकांच्या मनावर चांगल्याच रीतीनें ठसतील असें त्यांचें वर्णन केलें आहे. गीतांची भाषा सरळ व जोरदार अशी असून वीररस उत्पन्न करणारी आहे. हीं गीतें वाचीत असतां मराठ्यांच्या इतिहासांतील उज्वल चित्रें डोळ्यांसमोर उभीं राहतात.

प्रस्तुत (तिसऱ्या) आवृत्तींत घातलेल्या आठ प्रकरणांपैकीं 'घ्या माझी मज तरवार,' 'पटवर्धन कुलमणि भाऊ' आणि 'रक्तास मिळालें रक्त' हीं चांगलीं वठलीं आहेत ...... "

**प्रबोध–धुळें (ता० १५।८।२६)**

" खान्देशचे सुप्रसिद्ध कवि श्री. तिवारी ह्यांनीं हीं गीतें रचिलीं आहेत. गीतांची पहिली आवृत्ति १॥ वर्षांत व दुसरी आवृत्ति पहिलीच्या दुप्पट

असूनही २ वर्षांत संपली. आतां ही तिसरी आवृत्ति काढण्यांत आली आहे. ह्यावरून ह्या पुस्तकाची लोकप्रियता सहज कळून येणार आहे. निरनिराळ्या ऐतिहासिक प्रसंगावर रचलेलीं हीं गीतें सुंदर, श्रवणमनोहर आणि स्वदेशाभिमानोद्दीपक आहेत. एवढें सांगितलें ह्मणजे ह्या संबंधानें अधिक सांगावयाची आवश्यकता नाहीं.

प्राथमिक शाळांतील वरच्या इयत्तांतून हीं गीतें क्रमिक पुस्तक ह्मणून ठेवण्यांत आल्यास 'एक पंथ दो काज' ह्या न्यायानें विद्यार्थ्यांना काव्याबरोबर इतिहास आणि स्वदेशाभिमान ह्यांचे पाठही सहजासहजीं मिळतील लोकलबोर्डांचे अधिकारी आमच्या सूचनेचा विचार करतील अशी आशा आहे."

श्री शिवाजी–मुंबई ( १४।८।२६ )

"रा० तिवारींची काव्य-प्रतिभा आतां महाराष्ट्राला माहितच आहे. प्रस्तुत काव्यांत त्यांनीं मराठ्यांच्या पराक्रमाचें प्रभावशाली वर्णन करणारीं ३२ गीतें दिलीं असून तीं उत्तम स्फूर्तिदायक आहेत."

महाराष्ट्र–नागपूर ( २९।८।२६ )

"रा. तिवारी यांचीं झांशीच्या पराक्रमी राणीवरील तडफदार कवनें महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. त्यांच्या संग्रामगीतांची ही तिसरी आवृत्ति असून यांत आठ नवीन कवनांचा समावेश केला आहे... ... उद्धव वृत्त हें सामान्यतः केवळ करुण रसाला अनुकूल आहे असें समजण्यांत येतें पण माधव, टेकाडे, तिवारी प्रभृति कवींनीं या वृत्तांत वीररसात्मक कवनें लिहून, कवीच्या वाणींत जर ओज असेल तर कोणतेंही वृत्त वीरश्रीला मानवतें, हें सिद्ध केलें आहे. या संग्रहांतील बहुतेक गीतांत वीररसाचा उत्तम परिपोष झाला आहे. संताजीची घोडदौड, कुंभेरीची भंवेरी, गारदी कटोनी मेला, भाऊ भाऊ, बेलाग बदामी कोट वगैरे कवितांत वीर-करुणांचें उदात्त मिश्रण झालें आहे......"

प्रागतिक–जळगांव ( ता० २०।९।२६ )

"कवि तिवारींचीं संग्रामगीतें बरेच दिवसापासून प्रसिद्ध

आहेत. यांची तिसरी आवृत्ति नुकतीच तिवारींनीं प्रसिद्ध केली आहे. या आवृ-त्तींत ' लववेना हें शिर मातें ' ' कुंभेरीची भंवेरी ' ' हळदी घाटाचें युद्ध इत्यादि गीतें अंगावर रोमांच उठविणाऱ्या प्रसंगावर गायिलेलीं आहेत...... पुस्तकाची किंमत तिवारींच्या काव्य--कौशल्या-च्या मानानें थोडीच आहे."

केसरी-पुणें ( २६।१०।२६ )

" मराठ्यांच्या वेगवेगळ्या युद्धप्रसंगाचीं यांत वर्णनें असून तीं वीर-श्रीयुक्त व रोमांचकारी आहेत ह्मणूनच थोड्याच वर्षांत तिसरी आवृत्ति काढ-ण्याची पाळी आली आहे. "

विजयी मराठा-पुणें ( ता० २९।११।२६ )

" मराठा वीरांचीं ऐतिहासिक कालांतील स्फूर्तिप्रद व ओजस्वी संग्रामगीतें या भागांत दिलेलीं आहेत यांतील बहुतेक कवनें प्रतिभापूर्ण असून वीररस उत्कृष्ट साधला आहे. श्री० तिवारी यांच्या प्रत्येक कवितेंत उत्कृष्ट देशाभिमानाची जाज्वल्य ज्योत प्रज्वलित झालेली दिसते. श्री. तिवारी यांचा हा उपक्रम स्तुत्य असून त्यांनीं ऐतिहासिक कालांतील पोवाड्याच्या चालीवर आपली काव्यरचना केल्यास तो प्रयत्न अधिक यशस्वी होईल असें आह्मास वाटतें. वाङ्मयप्रेमी रसिकांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. "

राष्ट्रवीर-बेळगांव ( ता० १२।४।२७ )

" मराठ्यांचीं संग्रामगीतें " हीं बृहन्महाराष्ट्रांत सर्वांच्या ओळखीचीं झालीं आहेत. व अवघ्या साडेतीन वर्षांत या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या संपल्या यावरून मराठ्यांच्या संग्रामगीतांवरील जनतेचें प्रेमही व्यक्त झालें आहे. यामुळें प्रस्तुत गीतांविषयीं अभिप्रायाची आवश्यकता उरली नाहीं. तथापि गुणाचा पुनः पुन्हां झालेला गौरव गोडी देत असतो या करितां अभिप्राय देण्यास आह्मी उद्युक्त झालों आहों.

यांतील गीतें गातांना भावना उद्दीपित होते, अंगावर शहारे येतात आणि ह्मणून कवि तिवारी हे खरे शाहीर होत. यांच्या बहुतेक गीतांत राष्ट्रीय भावना ओतप्रोत भरलेली असल्यामुळें मृत राष्ट्राच्या अंगांत नव चैतन्य खेळविण्यास हीं गीतें खात्रीनें उपयुक्त होतील.

म्हणून राष्ट्रभक्त मराठ्यांनीं आपल्या छाव्याच्या-राष्ट्राच्या भावी आधार स्तंभाच्या-निर्लेप अंतःकरणावर मराठ्यांच्या संग्रामगीतांतील भाव जरूर उमटवावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास मराठ्यांचीं संग्रामगीतें घरोघर गायिलीं गेलीं पाहिजेत. अर्थात् पुस्तक संग्राह्य आहे.

छपाई सुवाच्य, कागद चिवट, गुळगुळीत असतां पुस्तकास... किंमत ठेविली आहे ती थोडी कमीच आहे.

कवि तिवारी यांचें आयुरैश्वर्य वाढो आणि मराठ्यांचीं संग्राम-गीतें उत्तरोत्तर प्रकाशमान होवोत अशी आह्मी दृढ इच्छा करितों."

वैनतेय-सांवतवाडी (ता. १७।५।२६)

"तिवारींच्या ऐतिहासिक काव्यगुच्छाची ही तृतीयावृत्ति नुकतीच निघाली आहे. विनायक व माधव या दोन आधुनिक कवींनीं विपुल व मधुर ऐतिहासिक कविता लिहिली आहे वैपुल्याच्या दृष्टीनें तिवारींची कविता किती तरी जास्त आहे... ...या संग्रहांत एकंदर ३३ गीतें असून त्यांच्यांतील प्रमुख गुण आवेश, देशाभिमानाची स्फूर्ती व मराठ्यांच्या इतिहासांतील अमर प्रसंगांचें सुंदर चित्र रेखाटण्याचें कौशल्य हे आहेत.

शाळांतील विद्यार्थ्यांच्या वाचनांत व सभांतील गायनांत अशा कविता अवश्य आल्या पाहिजेत.. ..."

उदय-उमरावती (ता. ५।७।२७)

"वीररसप्रधान कविता करण्यांत श्री तिवारींचा हात महाराष्ट्रांत कोणीही धरूं शकत नाहीं, ही आतां सर्वविश्रुत गोष्ट आहे. श्री. तिवारींच्या वीर-रसात्मक कवितांच्या ह्या संग्रहाची ही तृतीयावृत्ति आहे हें सांगितल्या बरोबरच महाराष्ट्रांत हीं सुंदर संग्रामगीतें किती लोकप्रीय झालीं आहेत हें वेगळें सांगणें नको. तृतीयावृत्तीचा मान महाराष्ट्रांत कवितेच्या पुस्तकास आमच्या पाहण्यांत तरी फक्त याच पुस्तकास मिळालेला दिसतो. ह्यांतील बहुतेक सर्व गीतें जवळ जवळ सारख्याच तोलाचीं व सुंदर असल्यामुळें त्यांत सरस-निरस निवडून कोणत्याही

एका विशिष्ट गीताची स्तुति करितां येत नाहीं. आठ चांगल्या कविता या आवृत्तींत घातल्या आहेत एकंदरींत पुस्तक संग्राह्य व वाचनीय आहे."

# मासिकें.

विद्यासेवक-पुणें ( जुलै १९२६ )

"रा. तिवारी यांची कविता आज बरेच दिवस महाराष्ट्राच्या परिचयाची झाली आहे प्रस्तुत-मराठ्यांचीं संग्रामगीतें-पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति निघाली आहे यावरून त्याच्या लोकप्रियतेचीही साक्ष आपोआपच पटते. या गीतांकरितां निवडलेले बहुतेक प्रसंगही आणीबाणीचे व हृदय-स्पर्शी आहेत....हीं गीतें तरुण मुलांनीं एकवार तरी अवश्य वाचून पहावीं."

आनंद-पुणें ( जुलै १९२६ )

"रा. तिवारी यांच्या या गीतांत स्वाभिमान, आवेश आणि तेजस्विता हे गुण भरले असल्यामुळें तीं महाराष्ट्रीयांस फार प्रिय झालीं आहेत; हें योग्यच आहे...... "

लोकमित्र-खानापूर ( जुलै १९२६ )

"या पुस्तकांतील प्रत्येक गीत वाचकाच्या अंगीं स्फूर्ति उत्पन्न करणारें असून त्याची तेजस्विता आणि चटकदारपणा खरोखर और आहे. थोड्या दिवसांत तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा योग आला यावरूनच लोक-रुची कळते."

सहविचार-बडोदे ( आगष्ट १९२६ )

"जळगांवचे शाहीर दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांचें पुस्तक मराठ्यांचीं संग्रामगीतें यास तिसऱ्या आवृत्तीचें भाग्य सरळच लाधलें आहे. या आवृत्तींत त्यांनीं आठ गीतें नवीन घातलीं आहेत ... ...मराठे व रजपूत लोकांच्या इतिहासांतील प्रसंगांची निवड शोधकबुद्धीची असून रचना आवेशयुक्त आणि शब्दयोजना बहारीची आहे."

मराठी शिक्षक-पुणें ( आगष्ट १९२६ )

" ऐतिहासिक प्रसंगावर स्फूर्तिदायक कवनें रचण्याविषयीं तिवारी यांचा लौकिक असून त्यांच्या संग्रामगीतांची तृतीयावृत्ती काढण्याचा योग आला हेंच त्यांच्या कवनांच्या लोकप्रियतेचें निदर्शक आहे . ...आठ गीतें नवीन घातलीं आहेत तींही इतर गीतां सारखींच सरस वठलीं आहेत."

चित्रमयजगत्-पुणें ( सप्टेंबर १९२६ )

" रा० तिवारींच्या नेहमींच्या गीताप्रमाणें हीं गीतें ओजस्वी व तेजस्वी आहेत...... "

ब्राह्मण-इस्लामपूर ( कार्तिक, शके १८४८ )

" श्री. दु. आ. तिवारी यांनीं हीं गीतें रचिलीं असून त्यांच्या तिसऱ्या आवृत्तीची एक प्रत आमच्याकडे आली आहे. अल्पकाळांत या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या यावरूनच तें लोकप्रिय होत चालल्याची साक्ष पटण्यासारखी आहे. गीतें अत्यंत प्रोत्साहक व तेजस्वी असून त्यांच्या वाचनानें मराठ्यांचा इतिहासही सहज कळण्या सारखा आहे. तरुणांचा स्वाभिमान जागृत करून त्यांच्याठायीं व्यापक महत्वाकांक्षा व मर्दपणा यांचें बीजारोपण करण्यास हीं गीतें चांगलीं उपयोगी पडतील यांत शंका नाहीं. "

महाराष्ट्र कृषिवल-पुणें ( २५।११।२६ )

" सदर पुस्तकांत रा. तिवारी यांनीं निरनिराळ्या ... ३३ कवितांचा संग्रह केला आहे.... मराठी वाङ्मयांत अलीकडे जी काव्यरचना होत आहे तींत पुष्कळ कविता सामान्यतः शृंगारकरुण वगैरे अन्यरसप्रधान असतात. परंतु वीररसोत्पादक काव्यें फारच थोडीं असतात अशा प्रकारच्या काव्याची उणीव रा. तिवारी यांनीं अंशतः भरून काढिली त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत...... "

उद्यम-नागपूर ( आक्टोबर १९२६ )

" प्रस्तुत पुस्तकाची ही तृतीयावृत्ति आहे. हींत कांहीं गीतें नवीन घातलीं असून एकंदर पुस्तक कवीच्या कीर्तीला साजेसें स्फूर्तिदायक आहे.

'दास्य हेंच ना लक्ष्येय ?' ही शेवटली कविता ... ...कवि वर्तमान कालाकडे वळल्याचें निदर्शक ह्मणून अभिनंदनीय आहे. दारिद्रनारायण देशांत कवीच्या प्रतिभेस उत्तेजित करणारे व श्रोत्यांच्या मनास घरें पाडणारे अनेक प्रसंग आहेत."

भारत मित्र-रिवणगोवा ( अंक ३ सन १९२७ )

" यांतील एकंदर गीतें स्फूर्तिदायक असून त्यांची रचना कविराज श्री. तिवारी यांनीं फारच उत्कृष्ट केलेली आहे. अल्पावधींत निघालेल्या या तिसऱ्या आवृत्तीवरून पाहतां प्रस्तुत पुस्तक जनतेला फारच आवडलें ह्मटलें पाहिजे. आणि त्याची लोकप्रियता याहीपेक्षां विशेष वाढणें पुस्तकावरून पाहतां योग्यच दिसतें. एकंदरींत प्रस्तुत पुस्तक अत्यंत बोधप्रद, विशेष स्फूर्तिदायक आणि फारच चित्ताकर्षक असून संग्राह्य आहे. किंमत बरीच माफक आहे. "

# चित्र-सूची.


| चित्र | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | श्रीमंत धैर्यशीलराव महाराज पवार, संस्थान-मलठण.... | प्रथम |
| २ | वीरमाता जिजाबाई व बालशिवाजी .... | ४ |
| ३ | कल्याणची कल्याणी .... .... .... | ८ |
| ४ | श्री शिवाजी महाराज व बाजी घोरपडे .... | १५ |
| ५ | वीरांगना सावित्रीबाई ठाणेदारीण .... .... | १९ |
| ६ | एसूबाई व बालशाहू .... .... .... | २२ |
| ७ | संताजी घोरपड्यांचा खून .... .... | ३३ |
| ८ | चिमाजी अप्पा ( वसईवर हल्ला ) .... .... | ४० |
| ९ | मल्हारराव होळकर ( कुंभेरीवर चढाई ) .... | ४४ |
| १० | इब्राहिमखान गारदी व महादजी शिंदे .... | ७३ |
| ११ | सदाशिवराव भाऊ व विश्वासराव .... .... | ७५ |
| १२ | सदाशिवराव भाऊ .... .... .... | ८४ |
| १३ | जनकोजी शिंदे .... .... .... | ८९ |
| १४ | महादजी शिंदे .... .... .... | १०७ |
| १५ | बदामी किल्ल्याच्या तटावरील बेमार .... | ११० |
| १६ | आप्पासाहेब पटवर्धन व सय्यद रेझा .... | ११३ |
| १७ | परशुरामभाऊ पटवर्धन .... .... | १२१ |
| १८ | हळदी घाटाचें युद्ध .... .... .... | १२९ |

# विषयानुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ | प्रसिद्धीचें स्थान |
|---|---|---|
| १ हिंदूंचा हिंदुस्तान ! .... | १ | राजकारण |
| २ लववेना हें शिर मातें ! .... | ४ | आनंद |
| ३ कल्याणी कल्याणाची .... | ७ | लोकमित्र |
| ४ स्वराज्य आणि पुत्रप्रेम ... | १० | आनंद. |
| ५ पित्राज्ञा .... .... | १३ | किर्लोस्कर खबर. |
| ६ घेतला सूड जनकाचा .... | १४ | बालवसंत. |
| ७ पत्नीचा फन्ना उडवी .... | १७ | वऱ्हाडशाळापत्रक |
| ८ द्या माझी मज तरवार .... | १९ | लोकमित्र. |
| ९ मुसलमान बंधूची हिंदुभगिनी | २२ | राजकारण. |
| १० संताजीची घोडदौड .... | २६ | महाराष्ट्र साहित्य. |
| ११ द्या करीं जरा समशेर ! .... | ३० | लोकमान्य. |
| १२ शाहूची यवनी माता .... | ३४ | लोकमित्र. |
| १३ मोहरा इरेला पडला .... | ३८ | संदेश. |
| १४ कुंभेरीची भंबेरी .... .... | ४२ | प्रफुल्लता. |
| १५ कीर्तीचा ध्वज मळवीला .... | ५० | ” |
| १६ स्वर्गांत भेट होईल .... | ५६ | ” |
| १७ विजयाच्या द्वारीं अडला .... | ६० | ” |
| १८ मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूशीं बेइमान होऊं ? .... | ६५ | राजकारण. |
| १९ गारदी कटोनी मेला ! .... | ६९ | ” |

| विषय | पृष्ठ | प्रसिद्धीचें स्थान. |
| --- | --- | --- |
| २० विश्वास सोडुनी गेला .... | ७४ | विविध ज्ञानवि० |
| २१ गिलचा खाशानिशीं मारीन | ७७ | काव्यरत्नावली. |
| २२ भाऊवर गर्दी झाली ? .... | ८१ | |
| २३ धन्य जननि जनकोजीची | ८६ | विविध ज्ञानवि० ज्युबिली ग्रंथ |
| २४ भाऊ ! भाऊ ! .... ... | ९३ | विविध ज्ञानवि० |
| २५ महांकाळी (तोफ) .... | ९९ | लोकमान्य. |
| २६ वडगांवावरचा वीर .... | १०३ | प्रमोद. |
| २७ बेलाग बदामी कोट .... | १०८ | भारतमित्र. |
| २८ शूराच्या उदरीं शूर ! .... | १११ | स्वराज्य. |
| २९ हें शील नव्हे मर्दाचें ! .... | ११५ | ,, |
| ३० पटवर्धन कुलमणि भाऊ ! .... | ११९ | ,, |
| ३१ फिरविशी कसा जरिपटका ? | १२३ | ,, |
| ३२ हळदी घाटाचें युद्ध ! .... | १२६ | ,, |
| ३३ रक्तास मिळालें रक्त .... | १३१ | ,, |
| ३४ एक काळ ऐसा होता .... | १३५ | कर्मयोगी. |
| ३५ ,, ,, ,, भाग २ रा | १३७ | ,, |
| ३६ ,, ,, ,, ,, ३ रा | १४० | प्रफुल्लता. |
| ३७ ,, ,, ,, ,, ४ था | १४३ | कर्मयोगी. |
| ३८ केवळ देशाकरितां .... | १४७ | भारतमित्र. |
| ३९ दास्य हेंच ना त्वद्ध्येय .... | १५० | तरुणभारत. |


---×---

स्वस्तिक वाचनालय, नौपाडा - ठाणे.

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणें
विभाग क्रमांक
अनुक्रमांक



श्रीमंत धैर्यशीलराव महाराज पवार

संस्थान - मलठण

# अर्पण-पत्रिका.

**श्रीमंत धैर्यशीलराव महाराज पवार**

**संस्थान-मलठण**

यांची कुलीनता, निराभिमानता व मराठ्यांच्या संग्राम-
गीतांवरील त्यांची प्रसन्नता या गुणांनीं त्यांस
हें पुस्तक सादर समर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र
दिनांक


सब वीर किया करते हैं, सम्मान कलमका ।

वीरोंका सुयश-गान है, अभिमान कलमका ॥


लाला भगवानदीन ।

|| ॐनमश्चंडिकायै ||

मराठी ग्रंथ संग्रहालय,

# मराठ्यांचीं संग्राम--गीतें.

## हिंदूंचा हिंदुस्थान !




20248

ब्राह्मण ब्राह्मणेतर वा मुसलमान, हिंदू जैन
पारशी शीख वा बौद्ध बहुधर्मश्रद्धावान
आह्मी भारत--भू--पुत्र अंतरांत जाणूं ह्मण.
बंधु बंधु यांच्या कलहीं
जरि शिरला कोणी गेहीं
उसळून बोलूं सारेही--
" पाय काढ गेहांतून ? हिंदूंचा हिंदुस्थान ! " १

"दोघांचें भांडण लाभ तिसऱ्याचा,"-ही म्हण ठावी;
ना तुला, न मजला पोळी श्वानाला कां घालावी?
नीच-वृत्तिनें परहस्तीं जन्मभूमि केवीं द्यावी?

स्वर्गलोक सुरलोकांचा
पाताल नागलोकांचा
अभिमान नयांना त्यांचा

अमुचाही हा अभिमान 'हिंदूंचा हिंदुस्थान'! २

उन्नत त्या हिंदुकुशाला हिंदिमहासागर त्याला
या प्रचंड सिंधुनदाला ब्रह्मपुत्र-नद जो त्याला
जा पुसा, तुह्मा ऐकाया येईल श्रुतिवचमाला

जेथलें ज्ञान मिळवोनी
जाहलें जगत् सज्ञानी
यद्यशो-दुंदुभि श्रवणीं

ऐकाया येतो अजुन हिंदूंचा हिंदुस्थान! ३

जो हिमाचलानें शोभे हिमगिरिही ज्यानें शोभे
जो भागीरथिनें साजे भागीरथि ज्यानें साजे
जो भरतकीर्तिनें गाजे भरतकीर्ति ज्यानें गाजे

धर्माच्या क्रांतीकालीं
विश्वनाथ वेळोवेळीं
प्रगटला जिथें जयशाली

कवण देश कांतीवान? हिंदूंचा हिंदुस्थान! ४

यत्कीर्ती–हंसी उठली ब्रह्मलोकिं जाउन ठेली
वाहन जो हंस विधीचा त्याशीं रत होउन वळली
येतांना स्वर्गंगेंत ती प्रसूत साध्वी झाली
धवलांग चंद्र हा नोहे
हें तदंड विलसत आहे
पितृलोक जयावर मोहे
ऐसा सयश--संपूर्ण हिंदूंचा हिंदुस्थान ! ५

भू-ग्रह-गोलाच्या भंवतीं घेऊन उपग्रह--रूप
कां प्रदक्षिणा घालितसे रजनीचा नाथ समीप ?
ज्योतिर्विद् ग्रहविद्ज्ञानी कारणें वदोत अमूप
मज कारण वाटे एक
मणि महिं--कंठांत सुरेख
भाळला तयास शशांक
तो मणी कोणता छान हिंदूंचा हिंदुस्थान ! ६

या भारत–भूच्या पोटीं जाहला जयांचा जन्म
जाहल्या तदंकी ज्यांच्या मधु शैशव--लीला पूर्ण
हृदयांत खळाळे रक्त पाहतां तिचें दुर्दैन्य
पुत्र ते तिचे झटतांना
जे पराभिलाषी त्यांना
छळिती त्या दुर्वृत्तांना
इतुकेंहि नसावें ज्ञान हिंदूंचा हिंदुस्थान ! ७

———×———

# लववेना हें शिर मातें !



" बाळ शिवबा ! तुला आग्रहानें दरबारां नेलं पण येथें तू सुलतानाला सलाम केला नाहीं; ऐकतों "! असें वीरमाता जिजाईनें विचारल्याबद्दल बालशिवाजी ह्मणतात:—

*   *   *

होतात देउळें नष्ट    होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राह्मण ओरडती    धर्मावरती संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं    सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांचिया पुढें जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते !    लववेना हें शिर मातें !
तूं सांग !-तुझ्या चरणाशीं    ही तोडुन ठेविन मान !
तूं सांग !-तात-चरणाशीं    कापोनी ठेविन मान !!

लक्ष्वेना हें शिर मातें



**वीरमाता ' जिजाबाई ' व बाल ' शिवाजी '**

" तूं सांग तुझ्या चरणाशीं -- ही तोडुन ठेविन मान "

ना. प्रेस ज.

[ म. संग्रामगीतें--पृष्ठ ४ ]

गोब्राह्मण यांच्या करितां खड्गाग्र ठेविन मान!!!
परि परके सत्ताधारी
गृहिं शिरून झाले वैरी
वधतांच तयांना भारी–
सक्रोध वृत्ति मम होते लववेना हें शिर मातें! २

मी ह्मणतां 'नाहीं नाहीं' दरबारीं नेलें आई!
जों अंत शिरोनी पाहीं तों चढून गेली भुवई!!
मुजऱ्याला हात न वाही शिर लववूं शकलों नाहीं!!!
हें सिंहासन कोणाचें?
हें वैभव तरि कोणाचें?
काहूर मनीं प्रश्नांचें
अपहारी नृपसत्तेतें लववेना हें शिर मातें! ३

एकटाच रात्रीं बसतों मी जन्मभूस आठवतों!
ढळढळा आइगे! रडतों त्वेषानें क्षणिं संचरतों!!
झोंपेंत देशबंधूंच्या दुःखानें दचकुन उठतों!!!
बोलते भवानी "ऊठ?"
बोलते जन्मभू "ऊठ?"
"धर समशेरीची मूठ!"
अवमानुन त्या आज्ञेतें लववेना हें शिर मातें! ४

देशाचा राजा नाहीं राजनिष्ठ राहूं कैसा?
धर्माचा राजा नाहीं राजभक्त होऊं कैसा?
या उलट्या बोध गळातें जीवाचा अडके मासा!

ज्या शिरीं भार देशाचा
ज्या शिरीं भार धर्माचा
कर्तव्यें वाहायाचा
विसरून देशधर्मातें लववेना हें शिर मातें ! ५

स्वाभिमान सुटला ज्यांचा देशभक्ति सुटली ज्यांची
कुलकीर्तीचा इतिहास स्मृति देइ न उज्वलतेची
वाढवोत ते ते शोभा दास्याच्या दरबाराची
"उद्दाम" ह्मणो कुणि मातें
कीं करोत उपहासातें
परि जागोनी स्वत्वातें
हिंदद्वेषी तख्तातें लववेना हें शिर मातें ! ६

सुलतान जाहला क्रुद्ध उमराव जाहले क्रुद्ध
जातिवंत झाले स्तब्ध जनकही होय हतबुद्ध
परि तुझी आणि अंबेची शिरिं कृपा असावी शुद्ध
मावळचे जमवुन भाई
स्थापीन मराठेशाही
हालवीन आदिलशाही
बोलतों सत्य जें गमतें लववेना हें शिर मातें ! ७

———×———

# कल्याणी कल्याणाची

शिवाजी महाराजांनीं कोंकणच्या घाटांतून विजापुराकडे जाणारा कल्याणचा खजिना लुटला. तिकडे आबाजी सोनदेवानें कल्याण प्रांतावर हल्ला चढवून तेथील सुभेदार अहंमद मुल्ला यास गोटासह लुटला. या गर्दीत मुल्लाची रूपसंपन्न सून सांपडली. तिला महाराजांस अर्पण करण्याकरितां त्यांजकडे आणिलें, त्या नीतिमान राजानें तिला वस्त्रभूषणें देऊन तिची पतीकडे रवानगी केली '

कोंकणच्या घाटामध्यें कल्याणी खजिना आला
वाजलें खुणेचें शिंग शिववाचा छापा पडला
तिकडे कल्याण प्रांतीं आबाजी चढवी हल्ला
गोटासह लुटला मुल्ला
बंदिस्त तयाला केला
धांवता जनाना धरिला
सांपडली सून तयाची कल्याणी कल्याणाची १

नैसर्गिक सुंदरतेनें युवती ती नटली होती
लावण्य रसाची सीमा तद्वदनीं झाली होती
भूलोक बघाया खालीं जणु परी उतरली होती
संयमी वृत्तिहि लोल—
होवोनी, न धरी तोल
ऐसें तद्रूप अमोल
परमावधि विधि—सुकृतीची कल्याणी कल्याणाची २

हें सुंदर ललना—रत्न निज शिव—प्रभूला वाहें
भक्तीच्या पदरीं पाप आबाजी बांधी पाहें

आणिली सभेमाझारी विस्मयें सभा तिज पाहे
घर्म-बिंदु नटले भालीं
रक्तिमा विलसला गालीं
लज्जेनें पाही खालीं
मोहिनी मनोहरतेची कल्याणी कल्याणाची ३

मदनाचा मोहक बाग तेथील लता ती होती
दुःखाचा वाहुन वायू जरि मलूल झाली होती
दर्शनें शांति-लहरींना अंतरीं उसळवित होती
धर्म-नीति यांचा दीप
भोसले कुलाचा भूप
सच्छील वधे निष्पाप
मोहकता चंद्रकलेची कल्याणी कल्याणाची ४

गोब्राह्मण-पालक वदला श्रवणीय मंगला वाणी
"जरि अशीच असती अमुची सुंदरा जिजाई जननी
रूपवान गणिलों असतों आह्मीही लोक-वचांनीं
जरि हवी यशाची सिद्धी
स्त्री-हरणाची दुर्बुद्धी-
सोडोनी, राखा शुद्धी
ही माता भगिनी अमुची कल्याणी कल्याणाची ५

शत्रुवरी घाला घाले करुं नका परस्त्री-छलना
जय-लक्ष्मी खेंचुन आणा परि आणुं नका पर-ललना
कुणि घेऊं नये निजशिर्षीं अबलांच्या अभिशापांना



कल्याणच्या सुभेदाराची सून व छत्रपतींचा दरबार

"ही माता भगिनी अमुची -- कल्याणी कल्याणाची"

[म संग्रामगीतें पृष्ठ ८]

चा. प्रेस ज.

भूषउनी वस्त्राभरणीं
पाठवा पतीच्या सदनीं "
ही शिवभूपाची वाणी
ऐके निज कल्याणाची  कल्याणी कल्याणाची ६

नीतिमंत शिव--भूपाल  गाजला महाराष्ट्रांत
शीलवंत कुलवंताचें  मोहवी मनाला चरित
गात्रोत शिवाचीं गाणीं  कवि उत्साहें रसभरित
शिव उन्मत्तांचा वैरी
त्यांवरी तयाची स्वारी
परि अबलांचा कैवारी
देतसे साक्ष सुगुणाची  कल्याणी कल्याणाची ७



# स्वराज्य आणि पुत्रप्रेम.

संभाजी फितुर होऊन दिल्लीरखानाच्या गोटांत गेला. खानानें त्याला पुढें करून भूपालगडावर हल्ला चढविला. त्या गडावर चाकणचा किल्लेदार **फिरंगोजी नरसाळा** याची नेमणुक होती. छत्रपतींच्या ज्येष्ठ पुत्रावर—महाराष्ट्राच्या युवराजावर—त्या स्वामिभक्त शूराच्यानें तोफेचा गोळा टाकवेना! तो किल्ला सोडून रायगडावर पळाला! 'भूपालगडाकडे खान वळला आहे, तेथील नरसाळा किल्लेदार चांगला लढवय्या आहे' म्हणून महाराजांस तितकी चिंता नव्हती. महाराज रायगडाच्या दरबारांत बसले असतां फिरंगोजी नरसाळा तेथें आला.

(चाल– भूपती०)

शिव छत्रपती भोसले कुळाचा राणा,
तो स्वराज्य सिंहासनिं बसला असतांना—
भूपाल गडाचा 'नरसाळा' नर-गाझी
गड सोडुन आला राजमंदिरामाजी
पाहतां तयाला प्रभुला विस्मय झाला
हा चाकणचा लढवय्या कैसा हरला!
"शत्रुच्या करीं गड दिला, कशाला आला?
भरवसा आपुल्या मर्द कुळीचा गेला!
भूपाल गडाचा वार न ऐकूं आला
शिवशाहीचा कां आज दरारा गेला?"
कुजबुजती कोणी, कोणी खालीं बघती
शूराची लज्जा राख विभो! मनिं म्हणती.


* * *

तो स्वामिभक्त बहु विनीत--वचनें बोले,
" खानानें पुढतीं संभाजीला केलें !
युवराज पाहिला, स्वामिभक्ति गहिंवरली,
तोफेची वत्ती हातामधुनी गळली !
हा भावी राजा रायगडाचा अमुचा
यावरतीं टाकूं गोळा कां तोफेचा ?
येसूबाईच्या सौभाग्याचा तिलक
म्यां कसा पुसावा शिवराया ! निःशंक ?
भोसले कुळाचा वंश कसा निर्दाळूं ?
शिवछत्रपतींचें हृदय कसें मी जाळूं ?
कर्तव्य तेविं निज राजकुलाची भक्ती
दोघांचें काहुर माजे माझ्या चित्तीं !
जरि राजपुत्र मम तोफेपुढती नसता;
चाकण किल्ल्याचा सूड उगविला असता
अपराधी झालों, आलों अपुल्या चरणीं
मज तोफेवरतीं बांधुन उडवा गगनीं "!

*   *   *

त्या स्वामिभक्त शूराच्या भक्तिवचांनीं
शिवभूप विरोनी गेला अंतःकरणीं.
हिंदवी स्वराज्य--स्थापनकर्ता बोले
" मी स्वराज्य-कंकण निजहस्तीं बांधियलें
जो फितुर जहाला पुत्र, रोधितो प्रगती
बळि पडो तयाचा स्वराज्यदेवी पुढतीं !

जरि येइल सुत आडवा स्वराज्या पुढतीं
तोफेचा गोळा टाकिन त्याच्यावरतीं.
भूपालगडावर मी असतों जरि तेव्हां—
मम हस्त न ढळता तोफेवरचा केव्हां !
सारून विवशता पुत्राच्या प्रेमाची
वल्हवली असती नौका कर्तव्याची !
जर संभाजीला पुढें करूनी खान
गड घेउं लागला, चिरूं लागला मान,
नर रक्त सिंचुनी वृद्धिंगत जो केला
तो स्वराज्य-तरु वाळेल, कीड ही त्याला !
जा, फिरवा दुर्गी दुर्गावरती द्वाही
कीं स्वराज्याहुनी सुतही प्रिय मज नाहीं !"



# पित्राज्ञा

शहाजी राजे यांस मुधोळच्या बाजी घोरपड्यांनीं दग्यानें पकडिलें त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांनीं युक्तीनें सुटका करविली. सुटकेनंतर राजे कर्नाटकांत गेल्यावर त्यांनीं घोरपड्याला पुरा सूड उगविण्याविषयीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें.

( चाल–भूपतीं० )

" जरि असाल अमुचे वीर्यशालि सत्पुत्र
तरि घोरपड्यांना कराल शिक्षापात्र !
ह्मणवितात 'बाजी', कपटी केवळ पाजी
मनसबीस चढले करुनी 'हांजी! हांजी!'
वरकरणी प्रीती, करणी मात्र कसाबी
विश्वासघातकी, स्वार्थाचे हे लोभी !
दाविलें प्रेम, भोजनीं निमंत्रण केलें
उलटले शेवटीं, बद्ध अह्माला केलें!
हा शत्रु जरी करिं खड्ग धरोनी येता
भोसले कुळाचा हात पारखा होता !
रंगवूं अजूनहि मुधोळचें मैदान
हा विजापुराच्या मागें लपतो हीन !
हें विदित, तुह्माला, काय पुन्हां सांगावें ?
जळल्या हृदयाच्या अग्नीला शमवावें !

# घेतला सूड जनकाचा

शहाजी राजे यांस मुधोळच्या बाजी घोरपड्यानें दग्यानें पकडलें! त्यांस जिवंत पुरण्याची शिक्षा देत असतां घोरपड्यांनीं त्यांच्या हनुवटीखालीं शेवटची चीप दिली! इतक्यांत थापा टाकीत आलेल्या स्वारानें आदिलशहाचा हुकूम दिला, त्यावरून राजांची सुटका झाली! सुटकेनंतर राजे कर्नाटकांत गेल्यावर त्यांनीं घोरपड्यांचा पुरा सूड उगविण्याविषयीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें. बाजी घोरपडे मुधोळास त्यांच्या गांवीं आहेत अशी संधी पाहून महाराजांनीं अकस्मात् त्याजवर छापा घातला आणि बाजीस ठार करून आपल्या पित्याचा सूड उगविला. यावेळीं महाराजांचा क्रोधाग्नी इतका पेटला होता कीं, त्यांत घोरपड्यांचें आप्त-स्वकीय वगैरे २०० लोकांची कत्तल उडाली! त्यांचा एक मात्र वंशज या कत्तलींतून वाचला व तोही त्यावेळीं तेथें नसून विजापुरास होता म्हणून वाचला!

"जरि असाल अमुचे पुत्र भोसले मर्द वंशाचे
बाजीला शासन द्यावें आमुच्या प्राण--वैराचें"
कर्णांत शब्द हे घुमतां पूज्य त्या जन्मदात्याचे!
बाजीच्या गृहवासाची
साधून संधि मोलाची
भ्रुकुटी चढली शिवबाची
उंहुळला सिंधु कोपाचा घेतला सूड जनकाचा १

वळवाचे जैसे मेघ उसळतीं नभीं एकाकीं
वैशाख-ऋतूंचे पूर आकस्मिक सिंधु--तटाकीं
ठाकली मुधोळा पुढतीं ... मावळी फौजही बाकी!



छत्रपति 'शिवाजी महाराज' व 'बाजी घोरपडे'
उसळले हात दोघांचे

वा प्रेस ज — म संग्रामसर्गांत पृष्ठ १०

होऊन पराचे दास
स्वजनांच्याही कंठास
लाविती नीच जे फास
गांठला समूह तयांचा    घेतला सूड जनकाचा २

तरवारी घोरपड्यांच्या    जणु मृत्यु–मुखांतिल रसना
कोषांतुनि बाहिर आल्या    कीं क्रुद्ध भुजंगम–ललना.
इकडे तर घेइ भरारी    गरुडाची केवळ सेना
ढालीस लागली ढाल
नाचले तीक्ष्ण करवाल
एकेक पडे घायाळ
घातला सडा रुधिराचा    घेतला सूड जनकाचा ३

शिव–शंकर दोघांमध्यें    कांहींही नव्हता भेद
पाहवे न मुख रायाचें    सूडाचा नयनीं क्रोध
एकेक गजासुर योद्धा    गांठून करी तच्छेद
खड्गाच्या घाटावरचे
पाणी जे प्याले साचे
रणशूर मुधोळावरचे
केला निःपात तयांचा    घेतला सूड जनकाचा ४

" तो कुठें ? जयानें धरिलें    निजजनकाला कपटानें
लाविली गळ्याला चीप    भोसलेकुल–द्वेषानें "
शोधीत फिरे जो भूप    टाकला तोहि शौर्यानें
उसळले हात दोघांचे

शौर्यांत चपलता नाचे
यश थोर जिजापुत्राचें
लाविला टिळा रक्ताचा घेतला सूड जनकाचा ५

हा भाऊ घोरपड्यांचा हा भाचा घोरपड्यांचा
हा कुमार हा तो पुतण्या ठेचला वंश सापाचा
तीनशे मारिले खासे केला उच्छेद खलांचा
वैऱ्यांचें झालें सत्र
वाचला एकची पुत्र
तेथें तो नव्हता मात्र
हा प्रभाव शिवकोपाचा घेतला सूड जनकाचा ६

जीवितही तृण मानावें जननि जनक यांच्यासाठीं
तळ हातावर शिर घ्यावें आपुल्या जन्मभूसाठीं
काळासह झुंज करावी प्राणप्रिय धर्मासाठीं
हा क्षत्रिय--धर्म पवित्र
गाववी यदीय चरित्र
तो पूज्य असे सर्वत्र
पाळिला धर्म पुत्राचा घेतला सूड जनकाचा ७



# पन्नीचा फन्ना उडवी

श्री छत्रपती शिवाजी महाराज हे दुसऱ्यांदा सुरत लुटून परत येत असतां चांदवडच्या खिंडींत मोंगल सुभेदार दाऊदखान पन्नी ह्या त्यांस आडवा आला. त्याच्या बरोबर बाकेखानही होता. महाराजांनीं त्या खिंडींत दोन प्रहर पर्यंत घनघोर संग्राम करून दाऊदखान पन्नीचा फन्ना उडविला व सर्व लूट रायगडावर पोंचती केली. या युद्धांत बाकेखान जखमी होऊन चांदवडच्या किल्ल्यांत लपला व दाऊदखान पळून गेला !

बेसूरत करुनी सुरत शिव--सिंह रायगडिं वळला
मोंगल रिपु दाउद पन्नी मार्गांत आडवा आला
तोंडांत लुटीचा घास पारधी जिवावर टपला
गर्जलें चांदवड--खोरें
उभयांच्या जय--निर्धारें
जाहले वीर सामोरे
शिव पहिला हल्ला चढवी पन्नीचा फन्ना उडवी १

जों तीक्ष्ण चमकले खड्ग तों तीव्र चमकले भाले
यावनी शक्तिच्या संगें मावळी चपलता खेळे
भाल्यांतिल अंतर तुटतां सरमिसळ मावळे झाले
एकदांच झाला घाव
नामांकित जे उमराव
त्यांचेंच बुडालें नांव
शिव शौर्य आपुलें मिरवी पन्नीचा फन्ना उडवी २

माथ्यावरि आला सूर्य थांबेना तरिहि धुमाळी
टोळीसह झुंजत होती आवेशें दुसरी टोळी
प्रबला प्रबलांची झाली खिंडींत अहा ! खांडोळी

खानाची ढाल फिरेना
शिवराज खड्ग वळवीना
जय-देवि कौल देईना

परि अंतीं शिव रिपु पळवी पन्नीचा फन्ना उडवी ३

बहुमोल लुटीचा खजिना त्यावरी गर्दि पन्नीची
लढवय्या बाकेखान तोही करि कुमक तयाची
भोसले कुलाचा राणा गर्जे वाणी शौर्याची

खवळले पहाडी वीर
चक्राकृति धरिला घेर
कोंडले पठाणी वीर

शिव शत्रु--मदातें जिरवी पन्नीचा फन्ना उडवी ४

तों बाका बाकेखान करकरा खाउनी दात
रायाच्या संमुख आला श्रीविष्णु पुढें जणुं दैत्य
उसळलें भवानी खड्ग घायाळ पळे निमिषांत

सन्निध गड चांदवडाचा
रक्षक झाला खानाचा
इकडे नृप रायगडाचा

यवनेश यशाला मळवी पन्नीचा फन्ना उडवी ५

दाउदखां पन्नी कोठें आढळे न छत्रपतींना
माणके हिऱ्यांच्या पेट्या चालल्या कुणी अडवीना
पाडाव जाहले वैरी औदार्य दाविलें त्यांना

लक्ष्मीसह जयलक्ष्मीला
शिव--सिंह घेउनी गेला
वार्ता ही दिल्लीशाला

बहु चिंता--सागरिं बुडवी पन्नीचा फन्ना उडवी ६



वीरांगना 'सावित्रीबाई' ठाणेदारीण व छत्रपतींचा दरबार

" अंतरीं रणेच्छा फार -- द्या माझी मज तरवार "

वा प्रेम ज.

[ म. संग्रामगीतें पृष्ठ १९ ]

# द्या माझी मज तरवार !

बेलवडीचा स्वामिनिष्ठ किल्लेदार येसप्रभु हा छत्रपतींच्या सैन्याशीं लढतां लढतां रणांगणीं पतन पावला. तेव्हां त्याची स्त्री सावित्रीबाई ठाणेदारीण ही घोडेस्वार होऊन पुढें आली. ती तेजस्विनी इतक्या शौर्यानें लढली कीं, शिवप्रभूंचे सरदार दादाजीप्रभु यांस शेवटीं पाठीमागून जाऊन तिच्या घोड्याचे पाय तोडावे लागले ! पाय उतार झाल्यावर तिच्या मर्द कर्नाटकी सैन्याची व तिची ताटातूट करून दादाजीनें ती सिंहीण कोंडींत अडविली. कोंडीं फोडून जाण्याकरितां तिनें इतका आश्चर्यकारक पराक्रम केला कीं, दादाजीला शेवटीं तिचा उजवा हात तोडून तिला पकडावें लागले ! तशा विकलांग स्थितींतही तिच्या पायांत लोखंडी बिड्या घालून तिला शिवप्रभुपुढें आणिलें !

जी खंडित सव्य कराच्या      पुसते न गलित रुधिरातें
ओसरल्या परि पदराला      सांवरिते डाव्या हातें
मृदु वपु ज्या रक्ताक्षीची      संग्राममदें थरथरते

प्रभुवीरपत्नि सावित्री
रविपुत्री जणुं गायित्री
आणितां शिवप्रभुपुढतीं

बोलली वाणि अनिवार      ' द्या माझी मज तरवार '    १

" पतिपूर्वजवीर-करांनीं      जी नित्य विजयिनी झाली
स्वामिभक्त पतिहस्तानें      जी कीर्तिशालिनी झाली
माझ्याच मात्र ती हातें      तरवार अपेशी झाली

मरणाच्या दुःखाहूनी
दुःख हेंच अंतःकरणीं
येईना वदतां वदनीं

अंतरीं रणेच्छा फार      द्या माझी मज तरवार    २

या तुमच्या सरदारांच्या पुरुषार्थाला धिक्कार!
या मर्द शिलेदारांच्या मर्दुमकीला धिक्कार!
मृत्यूच्या या चोरांनीं मागून घातले वार!
निःशस्त्र करोनी मातें
मद चढला नामर्दांतें
विसरले धर्मयुद्धातें
हे खरे जरी झुंजार द्या माझी मज तरवार ३
आवडतीं बाळें माझीं बांधा हत्तीच्या पायीं
सूळावर चढवा मातें बांधा तोफेच्या ठायीं
तुह्मांस दयेची भिक्षा मागणार केव्हां नाहीं
एकवेळ सोडा मातें
या एका डाव्या हातें
दावितें शौर्य तेजातें
हा लढो सर्व दरबार द्या माझी मज तरवार ४
स्वामिभक्तिच्या देवीला रक्ताभिषेक करण्याला
भवितव्यतेस संग्रामीं लावून खड्ग-निकषाला
सौभाग्यतिलक तो माझा गर्जना करित जैं गेला
तैं कुलकीर्तीचें तेज
क्षण चमकुन होय वितेज
पहुडले रणीं पतिराज
शिरिं तत्कार्यांचा भार द्या माझी मज तरवार ५
स्वामीची येतां हाक सुखशय्या सोडुन धवूं
स्वामीची आज्ञा होतां कालमुखीं माना देऊं
पुरुषांमागें स्त्रीपुत्र आहुती तनूची वाहूं

प्रभु जातीच्या लोकांचा
ध्वज-लेख प्रभु--भक्तीचा
नित उज्वल चमकायाचा
तो मलिन जाहला फार    द्या माझी मज तरवार    ६

निर्मनुष्य सदनें दिसतीं    तो स्मशानही गड दिसता
स्त्रीपुरुष वृद्ध आबाल    प्रत्येक लढोनी मरता
तुमच्या या विजयी नेत्रीं    भिववितो उग्र भेसुरता
पेंढारी ठग हे सारे
नीतीला नख देणारे
पातले नटुनि सामोरे
सोडा व्हा अजुनी दूर    द्या माझी मज तरवार    ७

एकेक गडकरी माझा    रणमर्द मराठा गाजी
निश्चयी प्रभूच्या काजीं    संकल्प तनूचा योजी
किल्ल्याचा बुरुजचि झाला    घनघोर संगरामाजी
जिंकिला पुरुष अबलेनें
हें नवल मुक्तकंठानें
कवि गाते आनंदानें
मम अढळ युद्धनिर्धार    द्या माझी मज तरवार "    ८

शौर्यप्रिय शिवभूपाल    बोलला वीर विदुलेला
" मातोश्री तुजसम माता    वंद्य या महाराष्ट्राला
स्वामीचा शिकवो अर्थ    भक्तीच्या आधीं शिशुला
बेभान जाहली होती
शुद्धिच तिज कांहीं नव्हती
उसळून पुन्हां बोले ती
" कर्तव्य करित मरणार    द्या माझी मज तरवार "    ९

# मुसलमान बंधूची हिंदु भगिनी!

## "सांभाळा प्राणविसावा"

रायगड किल्ला स्वाधीन करितांना येसूबाईनें झुल्फिकारखानाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बाल-शाहूस त्याच्या हवालीं केलें. त्यानेंही हातीं कुराण घेऊन तिला बहीण ह्मटलें व तें नातें शेवटपर्यंत पाळलें!

वाजवून गेला डंका शिवराज पितामह ज्याचा
यज्जनकें धर्मासाठीं बळि दिधला स्वप्राणाचा
यद्यश:सौरभीं रमुनी गातील कवींच्या वाचा
नातु तो शूरवीराचा
पुत्र तो धर्मशूराचा
स्वामी या रायगडाचा
म्यां कैसा हातीं द्यावा सांभाळा प्राणविसावा १

घालती पन्हाळीं वेढे वेडेच त्यांस ठरवोनी
उडवीत छाति जाणारा शत्रूच्या छातीवरुनी
ठेंचून करी रांगोळी रांगण्यावरी खेंचोनी
तो भीष्म[1] महाराष्ट्राचा
समयोचित बलधैर्याचा
हा वंशज हाय! तयाचा!
लाविते हात मी दैवा! सांभाळा प्राणविसावा २

मी सून वरें कोणाची! जों विचार करिलें चित्तीं
मी पत्नि वरें कोणाची! जों प्रश्न ठेविते पुढतीं

१ शिवाजी महाराज.



'एसूबाइ' बाल 'शाहू' व 'झुल्फिकारखान'

वा. प्रेम ज. "लावितें हात मी दैवा -- सांभाळा प्राणविसावा!" [म. संग्रामगीतें पृष्ठ २२]

हा समय करूं देईना    मज मान खालची वरतीं
अबलांचे असतिल मानी
त्यांनींच मिशी ठेवोनी
मिरवावें पुरुष ह्मणोनी
शूर–धर्म शूरां ठावा    सांभाळा प्राणविसावा ३

जीवितेश्वराचा घात    शिरिं वज्राघाताचि गमला
सुकली न अश्रुची धारा    अद्याप पदर हा ओला
तों भोग पारतंत्र्याचा    वाढून पुढें हा आला
ऐशी न कोणती जननी
सुत अर्पि परांलागोनी
विश्वास रणांत धरोनी
अर्पितें जिवाचा ठेवा    सांभाळा प्राणविसावा ४

हा होइल राजविलासी    जन्मतां ज्योतिषी वदले
दीर्घायुषि होइल भोगी    रेखाशास्त्रज्ञ ह्मणाले
बसवील घडी राज्याची    संत साधु बोलुन गेले
सर्वांनीं शुभ वर्तविलें
हें अशुभ वदाया आलें
काळीज पोळुनी गेलें
तुमचाच अतां ओलावा    सांभाळा प्राणविसावा ५

भडभडून येतें पोटीं    दुःखाचें गरळ न साहे
कोणाच्या जवळीं ओकूं    प्रेमीजन कोठें आहे ?
रोधून पाहतें कष्टें    परि मातृहृदय ना राहे

मीं अंगावर खेळविलें
कटिवरतीं घेउन फिरल्यें
पाळण्यांत गाणें ह्मटलें
हा अतां तुह्मीं रक्षावा   सांभाळा प्राणविसावा   ६

परवांच्या तुमुल रणांत   जैं हताश सैनिक झाले !
'परतले गडकरी'—ऐसें   येऊन कुणीं सांगितलें !
सिंहासन सोडुन उठला   आरक्त करोनी डोळे !
देहानें जरि सुकुमार
घेऊन ढाल तलवार
युद्धाला होय तयार
हा रणसिंहाचा छावा   सांभाळा प्राणविसावा !   ७

जोंवरी करीं तरवार   तोंवरी शत्रुशीं दावा
टाकून शस्त्र जो आला   त्याशीं न करावा कावा
निर्धौतयश:पट ज्यांचा   प्रकटिती वीर सद्भावा
साम्राज्य—धुरंधर, ज्यांच्या—
सत्यप्रिय असती वाचा
कृति करुन दाविती साच्या
बोललां तशी कृति दावा   सांभाळा प्राणविसावा   ८


विश्वास न येता जरिही   जातिचे मराठे आह्मी
मारतां मारतां मरतों   देशाच्या येतों कामीं !
खंजीर—युक्त ललनांचे   चमकते हात संग्रामीं !
विश्वासीं त्यजिला मान

मानेंत घातली मान
दोघांत 'राम रहिमान'
राखोनी अपुल्या नांवा सांभाळा प्राणविसावा ९

जर असेल घात करावा आहेच उभें हें पोर !
वचनभंग करणें चित्तीं आहेच करीं समशेर !
होउंद्या खानसाहेब ! सोक्ष कीं मोक्ष निर्वैर !
मक्केचा वारा मजसी
गुणगुणतो कीं कानाशीं
"झुल्फिकारखाँ विश्वासी"
आठवून तिथल्या देवा सांभाळा प्राणविसावा १०

* * *

मुसलमान बंधू झाला बहिण ती हिंदुधर्माची
हातांत कुराण–ग्रंथ वाहतो शपथ तो त्याची
संकटांत एकी व्हावी रीत ही हिंदुयवनांची
"हें कुराण बघ उचलोनी
मानिली तुला मी भगिनी
हो विशंक अंतःकरणीं
सांगणें नको या भावा "सांभाळा प्राणविसावा" ११



# संताजीची घोडदौड.

**संभाजी** महाराजांच्या वधानंतर **येसूबाई** व **बालशाहू** मोंगलांच्या ताब्यांत सांपडले. रायगडची गादी जिंजीला गेली ! स्फुरण पावलेली मोंगलसेना ज्या त्या किल्ल्यावर हिरवें निशाण फडकावूं लागली ! ती वेळ मोठ्या आणीबाणीची होती. **धनाजी जाधव** व **संताजी घोरपडे** या रणझुंजारांनीं आणि **प्रल्हाद निराजी** सारख्या राजकारणी पुरुषांनीं त्यावेळीं मराठी राज्याची इमारत कृतनिश्चयानें सांवरली. **संताजी घोरपड्यांनीं** तर आपल्या घोडदळाच्या साह्यानें **औरंगजेबाला** अगदीं बावरून सोडलें होतें.

* * *

तळहातीं शिर घेउनियां दख्खनची सेना लढली
तरि विजयी मोंगलसेना ना नामोहरम जहाली
पडली मिठि रायगडाला सोडवितां नाहीं सुटली
राजरत्न राजाराम
कंठास त्यास लावून
जिंजीवरती ठेवून
परते सर सेनापतिची घोडदौड संताजीची १
मिरजेवर पातशहाची शहाजणें वाजत होतीं
हाणिल्या तयांवर टापा फोडून टाकिलीं पुरतीं
मारिली टाच तेथून घेतला पन्हाळा हातीं
तों कळलें त्या वीराला
जिंजीला वेढा पडला
पागेसह वेगें वळला
चौखूर निघे त्वेषाची घोडदौड संताजीची २

झुल्फिकारखाँ लढवय्या कातरलीं झुल्पें त्याचीं
धूळधाण केली तेथें किति अमीर उमरावांचीं
उसळली तिथोनी मांड मग त्या कर्दनकाळाची
जिंजीचा धुरळा मिटला
जालना प्रांतिं तो उठला
चोळितो शत्रु नेत्रांला
गेली हां हां ह्मणतांची घोडदौड संताजीची ३

वाजल्या कुठें जरि टापा धुरळ्याची दिसली छाया
छावणींत गोंधळ व्हावा "संताजी आया! आया!"
शस्त्रांची शुद्धी नाहीं धडपडती ढाला घ्याया
रक्तानें शरिरें लाल
झोपेनें डोळे लाल
जीवाचे होती हाल
शत्रूला ऐशी जाची घोडदौड संताजीची ४

गिरसप्पा वाहे 'धों धों' प्रतिसारिल त्याला कोण?
शिशिराचा वारा 'सों सों' रोधील तयाला कोण?
हिमशैल–खंड कोसळतां प्रतिरोधिल त्याला कोण?
होता जो गंगाथडीला
आला तो भीमथडीला
एकाच दिसांत उडाला
करि दैना परसेनेची घोडदौड संताजीची ५

पुरताच बांधिला चंग घोड्यास चढविला तंग

सोडी न हयाचें अंग भाला बरचीचा संग
औरंगाचा नवरंग उतरला जाहला दंग
तुरगावर जेवण जेवी
तुरगावर निद्रा घेई
अंग ना धरेला लावी
भूमीस खूण टापांची घोडदौड संताजीची ६

संचरलें होतें न कळे तुरगांसहि कैसें स्फुरण
उफळाया बघती वेगें रिकिबींत ठेवितां चरण
जणुं त्यांसहि ठावें होतें युद्धीं "जय किंवा मरण"
शत्रूचे पडतां वेढे
पाण्याचे भरतां ओढे
अडती न उधळती घोडे
चालली अशी शर्तीची घोडदौड संताजीची ७

नेमानें रसद लुटावी नेमाजी शिंदे यांनीं
सांपडती हय गज तितुके न्यावे हैबतरावांनीं
वाटोळें सर्व करावें आटोळे सरदारांनीं
"खाड खाड' उठती टापा
झेंपावर घालित झेंपा
गोटावर पडला छापा
आलीच ह्मणति काळाची घोडदौड संताजीची ८

चढल्या घोड्यानिशि गेला बेफाम धनाजी स्वार
करि कहर बागलाणांत ओली न पुशी समशेर

बसवितो जरब यवनांना बेजरब रिसालेदार
वेगवान उडवित वाजी
तोंडावर लढतो गाजी
धाऊन येइ संताजी
पळती मोंगल बघतांची घोडदौड संताजीची ९

नांवाचा होता ‘ संत ’ जातीचा होता शूर !
शीलाचा होता ‘साधू’ संग्रामीं होता धीर !
हृदयाचा ‘ सज्जन ’ होता रणकंदनिं होता क्रूर !
दुर्गति ती संभाजीची
दैना राजारामाची
अंतरीं सर्वदा जाची
उसळे रणशार्दूलाची घोडदौड संताजीची १०

मर्दानी लढवय्यांनीं केलेल्या मर्दुमकीचीं
मर्दानी गीतें गातां मर्दानी चालीवरचीं
कडकडे डफावरि थाप मर्दानी शाहीराची
देशाच्या आपत्कालीं
शर्थीचीं युद्धें झालीं
गा शाहीरा ! या काळीं
ऐकूं दे विजयश्रीची घोडदौड संताजीची ११

# द्या करीं जरा समशेर!

संभाजीराजाच्या वधानंतर ज्यांनीं महाराष्ट्राची पडती बाजू शर्थीनें सांवरली त्या संताजी घोरपडे व धनाजी जाधव या अतिरथी–महारथींचा पुढें बिघाड झाला! छत्रपति राजारामाच्या अप्रसन्नतेनें संताजीच्या कपाळीं वनवास आला! दुर्दैवानें रानोमाळ हिंडणारा हा वीर एका ओढ्यांत स्नान करीत असतां मारेकऱ्यांनीं त्याचा निर्दयपणें खून केला! तो निःशस्त्र वीर शेवटपर्यंत त्यांस ह्मणत होता कीं,–अरे! "हातांत जरा समशेर द्या"

संकटीं महाराष्ट्राची सांवरली बाजू ज्यानें
आवेशें घोडदळाचा थैमान घातला ज्यानें
औरंगशहाचे कळस कापून आणिले ज्यानें
तो संताजी दुर्वेषें
स्वजनांच्या व्यक्तिद्वेषें
सांपडला देहत्रासें
निःशस्त्र बोलला धीर द्या करीं जरा समशेर! १

अचलाच्या निर्झरतीरीं अचल वीर उघडा होता
करणारा रक्तस्नानें स्नानाला सजला होता
दबलेले उसळुन आले पातकी घातकी घाता
चमकला जरासा देहीं
कर कमरेवरतीं जाई
तरवार कटीला नाहीं
समयचतुर बोले वीर द्या करीं जरा समशेर! २

जीवाची आशा नाहीं मरणाची भीती नाहीं

शूर मृत्यु पृष्ठीं वाही विजयाला सन्मुख पाही
कोंदल्या दिशा जरि दाही लढतांना स्वर्गीं जाई
शिवनेरीच्या दासाचा
शिवशाहीच्या भक्ताचा
संग्राम पहा अंतींचा
वारावरि घाला वार द्या करीं जरा समशेर ! ३

एवढा धनाजी शूर मित्राचा शत्रू झाला !
सुविचारी राजाराम कर्णदंश त्यासहि घडला !
प्रल्हाद निराजी एक परलोकीं तोही शिरला !
कर्तृत्व जाहलें फोल
भक्तीचें गेलें मोल
जीवितही झालें लोल
बाहूला चढला जोर द्या करीं जरा समशेर ! ४

देशभक्त बंधू सारे चुगलखोर झाले कैसे !
बंधूला तोडायाला मारेकरि बनले कैसे !
जाति--रक्त हे प्यायाला हिंस्रपशु झाले कैसे !
दगलबाज पापी चोर
होऊन येति शिरजोर
जोडाया पातक घोर
जरि असाल सारे शूर द्या करीं जरा समशेर ! ५

या संताजीचे घोडे एकाच दमानें गेले
जींजीचे फोडुन वेढे गनिमास उधळुनी आले
घामानें डबडबलेले कृष्णेचें पाणी प्याले

त्या वाजींच्या गाजीला
गांठोनी एकांताला
कापाया सारे सजला

पातला समय जरि घोर द्या करीं जरा समशेर! ६

द्या भाला बरची पट्टा द्या लँगोर अथवा सांग
द्या कट्यार गदका निमचा द्या लाठी कमठा बाण
मरतांना तालीमखाना घ्या योद्ध्याचा पाहून

दावेदाराचा दावा
तुह्मि शौर्य आपुलें दावा
वंशाला डाग न लावा

मज नको शस्त्रसंभार द्या करीं जरा समशेर! ७

युद्धाचीं नीतीतत्वें अधमांना रुचलीं नाहीं
पापिष्ट खुनी हृदयांत अल्पही दया ना राही
सक्रोध लाल—नेत्रांत उरला न विवेकहि कांहीं

दुष्टांचे सजले हात!
चमकला शूर देहांत!
सरकला हात दो हात!

करि घोष पाहुनी घेर द्या करीं जरा समशेर! ८

पुढच्यानें केला वार हाताची केली ढाल!
मागचा घालतो घाव हाताची दुसऱ्या ढाल!
तो उजवा डावा मारा साहून उसळला लाल!

एकाला लाथेसरसा
दुसऱ्याला ठोशासरसा



"संताजी घोरपडे" व त्याजवरील मारेकरी.

"निःशस्त्र उभारूनि हात -- शिवशाहीकी!' -- जय बोले!"

बा. प्रेम ज.

[स. संग्रामगीतें पृष्ठ ३३]

पाडोनी तोडी फासा
त्वेषानें गर्जे वीर		घ्या करीं जरा समशेर! ९

जों वर्मी बसला घाव		"जय छत्रपतीकी"—बोले
जों खंडित झालें गात्र		"जय समर्थ सद्गुरु"—बोले
निःशस्त्र उभारुनि हात		"शिवशाहीकी जय"—बोले
बेदर्द कसाई चोर
निःशस्त्रीं ज्यांचें वैर
शिर करिति धडाहुन दूर
पडतांना वदलें शीर		घ्या करीं जरा समशेर! १०

रिपुरुधिरानें देशाचा		धुतला हो ज्यानें डाग!
देशानें तद्रक्ताचा		लावून घेतला डाग!
घोरपडे वंशज घोर		विसरले न हा दुर्भाग
संग्रामीं योद्धे जबरे
दरबारीं डावे मुजरे
रायाला करिती सारे[१]
तें स्मरे वाक्य दरबार		घ्या करीं जरा समशेर!

व्यक्तिद्वेषाचें खूळ		जातिद्वेषाचें मूळ
देशोन्नतिच्या मार्गांत		हे मोठे उन्नत सूळ
हो! महाराष्ट्र-भक्तांनों		काढा उपटून समूळ
जो देशभक्त जातीचा
जो शौर्यशालि वंशाचा
तन्मुखिं न विनंती-वाचा
मागतो संकटीं शूर		घ्या करीं जरा समशेर! १२

१ हे घोरपड्यांचे डावे मुजरे शाहू महाराजांच्या वेळेपर्यंत चालू होते. पुढें ते शाहू महाराजांनीं घोरपड्यांची समजूत घालून बंद करविले.

# शाहूची यवनी माता.

राजारामाच्या मृत्यूचें वर्तमान शाहूला कळलें, त्यावेळीं त्याला अतोनात दुःख झालें. केव्हां ना केव्हां तरी काका आपली सुटका करतील अशी त्यास आशा होती, ती समूळ नष्ट झाली. आतां आपणांस शेवटपर्यंत मोंगलांच्या अटकेंत रहावें लागणार या हृद्रोगानें त्याचें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें व शेवटी त्याला मोठा ताप येऊं लागला. **येसूबाई** व **बेगम** (रोषनार) साहेब फारच घाबरल्या. **बेगम** तर शाहूचा बिछाना सोडीनाशी झाली; व ती देवाची करुणा भाकूं लागली. **औरंगजेबाला** ती गोष्ट कळली तेव्हां तो स्वतः **शाहूच्या** समाचाराला गेला व त्याच्या अंगावरून हात फिरवून म्हणाला, " तुमारा चिच्या मर गया उस्वास्ते तबियत बिघड गई ? तुम् हमारे बेटीके बेटे हो. फिकर मत करो. तुमारा राज्य तुमकू देऊंगा. " पुढें बेगमच्या अविश्रांत खटपटीनें **शाहूस** आराम पडला. ( गोनटेकृत शाहू म० चरित्र पान २८. )

काकांचा ऐकुन मृत्यू शाहूचा खचला धीर
आशेचा तुटला तंतू मुक्तीची इच्छा दूर
शय्येवरि हृद्रोगानें तनु झाली क्षणभंगूर
तो रायगडाचा कान्हा
येसूबाईचा तान्हा
तापांत कण्हत असतांना
तळमळते चिंतायुक्ता रोषनार बेगम माता १

" ध्यास सोड वेड्या जीवा ! भेटतील कैचे काका
स्वातंत्र्य कोठचें दैवीं बंदिवास ठरला पुरता
आलमगीर शहा कैसा हा तोच तात बंधू आतां "
अंतरांत कढ दुःखाचे

नेत्रांत नीर शोकाचें
तुमटती शद्ब शाहूचे
अधिक बिंदु गळती, पुसतां रोषनार बेगम माता २

पाहतो जन्मदात्रीला तों हृदय भरोनी येतें !
पाहतो प्रेमदात्रीला तों अखंड धारा गळते !
"रडुं नको, नको मज रडवूं सांग काय तुजला गमतें ?
धर्माच्या पुत्रासाठीं
औरंगशहाची बेटी
करिल शक्य साऱ्या गोष्टी"
समजावी तत्सुखनिरता रोषनार बेगम माता ३

प्रीतीची सरिता जेथें जातिभेद कुठचा तेथें ?
मायेचा सागर जेथें धर्मभेद कुठचा तेथें ?
एकात्म भावना होतां रक्तही वितळुनी जातें
ही दिव्य देवतानीती
जी साधुसंत आदरिती
ती निर्मल योषिज्ज्योती
दाखवी सुकीर्ती—विहिता रोषनार बेगम माता ४

वाढून आपुला हात येसूबाईच्या कंठीं
भगिनीला भगिनी सांगे ती समजूतीच्या गोष्टी
परि तिचाच दाटुन कंठ फुटती न शद्ब तें ओष्ठीं
वत्सलता स्फुंदत होती
प्रीतीला भाषा नव्हती
तिजसवें करी रोदन ती
कोण हो प्रीतिची ललिता ? रोषनार बेगम माता ५

" दुग्धाचा एकहि घोट    बाळ कांहिं प्याला नाहीं
टाकिलें वळें तोंडांत    कंठांत उतरलें नाहीं
हीं पात्रांतिल पक्वान्नें    मज रुचतिल केवीं बाई

मस्तकीं ठेवुनी हात
अनिमिष त्याला पाहात
अश्रुंचीं फुलें वाहात

बसली निकट दुःखार्ती    रोषनार बेगम माता ६

एवढें राजमंदिर तें    तिज अरण्य भासत होतें
उपभोग्य वस्तु असतांना    मन विपण्ण झालें होतें
नश्वरता बाणुन चित्तीं    ऐश्वर्य न रमवि मनातें

रात्रंदिन बसुन उशाशीं
प्रार्थोनी परमेशाशीं
करि नाना उपचाराशी

ती सम्राटाची दुहिता    रोषनार बेगम माता ७

शेवटचा सुटला श्वास    वसनें तीं चिंब जहालीं !
देहास लावितां हात    शीतता दिसे आलेली !
नाडीला लाउन हात    हकिम मान खालीं घाली !

भेसूर दुःख तेव्हांचें
जननीचें कीं यवनीचें
वर्णावें तरि कोणाचें ?

कष्टली तनूस न बघतां    रोषनार बेगम माता ८

स्वाभाविक अदय मनाचा    औरंगशहा विख्यात
प्रीतिशील त्याची कन्या    ही आश्चर्याची मात
कोळशांत हिरकणि जैशी    वा नलिनी जणुं चिखलांत

काष्ठाला अंकुर फुटला !
दगडाला पाझर सुटला !
कळवळा शहाला आला !
थोपटीत होती पुत्रा    रोषनार बेगम माता    ९

कठिण शैल चित्तीं द्रवतो    सरितेच्या प्रेमजलानें
मेघाला सुटती धारा    चमकतां वीज तेजानें
दिल्लीश्वर पाझरला तो    त्या उदात्त देखाव्यानें
" अल्लानें खैर करावी
दख्खनचा राजा भावी
उपभोगो राज्य सुदैवी
दुहिता न यशाची सरिता    रोषनार बेगम माता "    १०

सर्व सदय झाले होते    सर्वेशाही निर्दय नव्हता
हरएक मंगलाकांक्षी    हरिही न अमंगल–कर्ता
सकलेच्छा 'संकटजावें'    सकलेशहि संकट–हर्ता
येसूबाईचें सुकृत
निजलेलें उठलें हंसत
तरि बेगम होती जपत
झाली संजीवनि-मात्रा    रोषनार बेगम माता    ११

वैभवावरी चढणारा    शौर्यकीर्ति गाजवणारा
अटकेवर बाहु–बलानें    जरिपटका नाचविणारा
बा ! अशा महाराष्ट्रा ! तूं    यवनी मातेचा प्यारा
तत्स्मरण सदा तुज व्हावें
यवन सर्व बंधू–भावें
प्रेमानें तूं कवळावें
शिकवून जाय सच्चरिता    रोषनार बेगम माता    १२

—×—

# मोहरा इरेला पडला.

## [ वसईचा वेढा ]

मोठ्या तुमुलयुद्धांचे व अगदीं निकराच्या हल्ल्यांचे अनेक प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासांत आहेत; पण त्या सर्वांत **वसईचा** वेढा अधिक महत्वाचा होय. किल्ला **पोर्तुगिजांच्या** ताब्यांत असून तो सर करण्याचा **चिमाजीआप्पांचा** निर्धार होता. किल्ल्याच्या तिन्ही बाजूंस पाणी; जमिनीच्या बाजूनें सुरंग लावावे तों वरून **पोर्तुगीजांनीं** आगीचा वर्षाव करावा! चार महिने झाले तरी किल्ला हातीं येईना तेव्हां एके दिवशीं **आप्पांनीं** आपल्या सरदारांस बोलावून सांगितलें कीं, "माझें डोकें तरी तोफेच्या धडाक्यानें उडवून **वसईच्या** किल्ल्यांत जाऊन पडेल असें करा, ह्मणजे माझा हेतु पूर्ण होईल!" अशा प्रकारें **आप्पा**सारखा "मोहरा इरेला पडला!" हें पाहून, "सरदारांस चेव आला आणि त्यांनीं आगीचा मारा होत असतां वाळूंत चर खणून सुरंग लाविले. सुरंगांनीं खिंडार पडतांच" "हर हर महादेव" ह्मणून मराठ्यांनीं निकराचा हल्ला केला आणि तटावर बावटा रोविला!

बेलाग दुर्ग जंजीरा वसईचा किल्ला असला
दुस्मान 'फिरंगी' तिथला आटोपे नच कोणाला
त्या सिंहाला पकडाया भारतीय 'चिमणा' सजला
गोव्याच्या टोपीवाला
कोंकणचा पगडीवाला
लागली झुंज उभयांला
बुद्धींचा डाव उडाला मोहरा इरेला पडला १

मर्द त्या मराठी फौजा रणकीर्ति जयांच्या गाव्या
तळहातीं शिर घेऊनिया चालुनी तटावर जाव्या

जणुं पोंगावत मधमाशा। आणि मोहळास बिलगाव्या
कडकडाट वरुनी व्हावा
सारखा अग्नि वर्षावा
परि सिंहाचा तो छावा
परतेना। हिंमतवाला मोहरा इरेला पडला २

बोलावुनि सरदारांना तो समरधुरंधर बोले
शूरांनो ! वेढा घाया चार मास होउनि गेले
आवडते कंठमणीही कार्य काय त्यांनीं केलें ?
बेहिंमत जे असतील
परतोनी ते जातील
मी आहे निश्चयशील
जा कळवा श्रीशाहूला मोहरा इरेला पडला ३

घालुनी उडी संग्रामीं जिंकील भयंकर काळ
मी असा घेतला होता एकेक निवडुनी लाल
मी तुह्मांस मानित होतों शौर्याचे तेजोगोल
जाहली परीक्षा आजी
मति खिन्न जहाली माझी
ह्मणतील काय ते वाजी !
जा कळवा कीं दादाला मोहरा इरेला पडला ४

तोफेच्या तोंडीं मातें बांधोनी उडवा हातें !
शिर तुटुनी त्या आघातें किल्ल्यांत पडूं द्या त्यातें !
प्रिय असेन मी तुह्मातें पुरवा अंतिम इच्छेतें !

ती निर्वाणीची वाणी
डोळ्यांला आणी पाणी
प्रत्येक वदे गहिंवरुनी
"इर्षेस वीर हा चढला मोहरा इरेला पडला" ५

लागला विषारी बाण सकलांच्या अंतःकरणीं
शस्त्रांस पोंचले हात लढवय्यांचे फुरफुरुनी
उतरुनी रक्त डोळ्यांत नजराही गेल्या फिरुनी
ध्वनि 'हर हर' ऐसा झाला
पाठीच्या सुटल्या ढाला
बोलती सकल या बोला
"राखूं निज लौकीकाला मोहरा इरेला पडला" ६

गोळ्यांच्या माऱ्याखालीं चर खोदोनी रेतींत
उडविले सुरंगी बार तट लोळविला मातींत
गर्जना एकदम झाली पडलेल्या खिंडारांत
जों बांध तटाचा फुटला
तों सेनासागर सुटला
धैर्याचा किल्लेवाला
बंदुकीस भाला भिडला मोहरा इरेला पडला ७

कदमाच्या पुढतीं कदम चालले कदम सरदार
वारावरि करिताचि वार अनुसरले शूर 'पवार'
शिंद्याचा खंदा घोडा सोडिला जणूं कीं तीर
वावटा धरुनि तोंडांत



चिमाजी अप्पा (वसईवर हल्ला)

बा. प्रेस ज    " बंदुकीस भाला भिडला -- मोहरा इरेला पडला ' "    [ संग्रामगीते पृष्ठ ८० ]

भोसला चढे जोमांत
आगीच्या वर्षावांत
सामना भयंकर झाला मोहरा इरेला पडला ८

गरनाळी तोफा मोठ्या धुंकार कराया सजल्या
घायाळ धडाधड खालीं तनु कितिकांच्या धडपडल्या
छातीचे निधडे वीर चिंध्या परि त्यांच्या झाल्या
पगडीची फौज हटेना
शत्रूची पकड सुटेना
तो विजयश्रीचा ‘ चिमणा ’
बेहोष होउनी लढला मोहरा इरेला पडला ९

शौर्याची शर्थ जहाली बावटा तटावरि चढला
जयनादानें वसईचा दिग्प्रांत अहा ! दुमदुमला
पोर्तुगीज किल्लेवाला आप्पांच्या शरणीं आला
राष्ट्राची वाढे कीर्ती
तो समय आणि ती मूर्ती
ठाके कवि नयना पुढतीं
आठवतां या वाक्याला मोहरा इरेला पडला १०

# कुंभेरीची भंबेरी

सर्व उत्तरहिंदुस्थान काबीज करण्याच्या इराद्यानें इ० स० १७५४।५५ सालीं श्रीमंत **रघुनाथराव पेशवे** यांनीं **पुण्याहून** नगारे वाजविले! त्यांच्या बरोबर **मल्हारराव होळकर**, **जयाजी शिंदे**, **यशवंतराव पवार** वगैरे मातब्बर सरदार होते. हा पेशव्यांचा दिग्विजयी काळ होता. **जयपूर**, **बिकानेर**, **कोटा** या संस्थानांतून खंडण्या घेत घेत मराठी फौज **सुरजमल्ल जाटाच्या** मुलुखांत शिरली. मराठ्यांनीं त्याजकडे एक कोट रुपये खंडणी मागितली; तो ४० लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. मराठे ऐकतना. **जाट** चांगला सामर्थ्यवान् व लढवय्या होता. **कुंभेरीच्या** अभेद्य किल्ल्यांत त्याचें ठाणें होतें. त्यानें ४० लक्ष रु० घ्या नाहीं तर युद्धास तयार रहा. असा निरोप देऊन बरोबर ५ गोळ्या व दारूही पाठवून दिली.

मराठ्यांस मनस्वी अपमान वाटून त्यांनीं **कुंभेरीस** मोर्चे लाविले. **मल्हारराव होळकरासारखा** युद्धकलापटु सेनापति पुढें होऊन त्यानें खंदकांतून तोफा, **हस्तनाला** व **सुतरनाला** यांचा **कुंभेरीवर** मारा सुरू केला! **जाटांनींही** वरून आगीचा केवळ पाऊस पाडला! इतक्यांत **मल्हाररावाचा** एकुलता एक पुत्र, सति **अहिल्येचा** सौभाग्यतिलक **खंडेराव**, **जाटाकडील** जेजालेच्या गोळ्यानें मोर्चांत ठार झाला. पुत्र–दुःखानें भडकून गेलेल्या त्या कर्दनकाळ वीरानें यमुनेच्या तीरीं त्याचें श्राद्ध करीत असतां घोर प्रतिज्ञा केली कीं, " कुंभेरीची माती खणून यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक्य."

**सुरजमल्ल जाट मल्हाररावास** ओळखून होता. **होळकर** आपली प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं ह्मणून त्याला जरब बसली व तो घाबरला. त्याचा **रूपराम** नांवाचा एक मोठा राजकारणी मंत्री होता. त्यानेंही **जाटास** तह करण्याची सल्ला दिली. जाट अर्ध–कोट रुपयांची खंडणी देऊन शरण आला! **होळकरांच्या** नुसत्या जरबेनें " कुंभेरीची भंबेरी " उडाली! शरण आलेल्यावर शस्त्र धरूं नये हें लक्षांत घेऊन त्या उदार सरदारानें त्यास सोडून दिलें.

दाक्षिणात्य शौर्याब्धीचा भरतीचा विजयी काळ
केंद्रस्थल पुण्यपुरीचें उसळली लाट विक्राळ
उत्तर विंध्याद्रीपुढचा मुलुख तो विकट खडकाळ
जयपूर बिकानिर कोटा
तुडवून मुलुख गढ--कोटा
जाटावर वळल्या लाटा
मग ये वेळा उडणारी कुंभेरीची भंवेरी १

सरदारांच्या तोफांचे कोटाला मोर्चे भिडले
गोळ्यावर सुटती गोळे तटबंदी लेश न हाले
रेतीचें रणमैदान यत्न ना सुरुंगी चाले
चावती मराठे ओठ
सांपडतां थोडी वाट
कापोनी काढूं जाट
ह्मणती उडवूं निर्धारीं कुंभेरीची भंवेरी २

भाल्याच्या फाळावरतीं वसवोनी जयलक्ष्मीला
दुंदुभिच्या ठेक्यावरतीं नाचवीत शौर्यश्रीला
ढालेचा मिरवित हात इंदुरचा गाजी आला
अभिमान सुभेदारीचा
विश्वासहि कर्तृत्वाचा
उचलिला विडा पैजेचा
उडवीन ह्मणे मल्हारी कुंभेरीची भंवेरी ३

जोडी कर्णार्जुन यांची किंवा अर्जुन भीष्माची

कीं सुरेंद्र इंद्रजिताची इंद्रजीत सौमित्राची
या रावण रघुनाथाची रघुनाथ परशुरामाची
ह्या रणतीर्थाच्या तीरीं
एकाला दुसरा भारी
जन ह्मणती "निश्चयकारी--
हा उडविल रिपुवलहारी कुंभेरीची भंवेरी!" ४

घनघोर युद्ध करणारा छातीचा बांधुन कोट
कोटाला मारुन बगल दारावर गेला थेट
'एळकोट' करुनी चढला फौजेचा घेउन गोट
हस्तनाळ गर्नाळांचा
सुतरनाल जेजालांचा
वर्षाव करुन अग्नीचा
चढवी उडवाया स्वारी कुंभेरीची भंवेरी ५

घन गर्जे सूरजमल्ल[1] मल्हार केसरी गर्जे
हेमंत भानुसम जाट हा[2] ग्रीष्म--भानुसम साजे
तो[1] नील शनैश्वर तारा हा[2] मंगळ तारा शोभे
कुंजर जैसा नंदीला
कीं गरुड जणों हंसाला
तैसा भिडला जाटाला
उडवाया समरविहारी कुंभेरीची भंवेरी ६

विजयाचें तोरण इकडे अर्जुन हा[2] बांधित होता

१ कुंभेरीचा किल्लेदार. २ मल्हारराव होळकर.

तिकडे सुत खंडेराव अभिमन्यू झगडत होता
मोर्चांच्या चक्रव्यूहीं जणुं भास्कर तळपत होता।

अवतारच खंडोबाचा
भंडारा उडवी रिपुचा
तो कसचा परतायाचा

उडविल्याविना माघारीं कुंभेरीची भंबेरी। ७

जाटांची कडवी जात अब्रूला मरतिल सारे
दांतीं तृण धरतिल कसचे जीवाला तृण गणणारे
मरतांना पडतिल उलथे पाठ न परि दाखविणारे

त्यांनाच तयांची जननी
धन्य होय हो प्रसवोनी
तन्निश्चय गेला ठरुनी

"पाहूं कैशी उडणारी कुंभेरीची भंबेरी" ८

कडकडाट इतुका झाला कीं असंख्य विद्युत्पात
गोळेही इतुके सुटले जणुं ताऱ्यांची बरसात
उठला कीं इतुका धूर जणुं जमले घन व्योमांत

दरवाजा पहिला फुटला
दुसऱ्यावर हल्ला चढला
चिरडून तिथें वैऱ्याला

उडविण्यास घेइ भरारी कुंभेरीची भंबेरी। ९

अपशकुनी डावा बाहु तों एकाएकीं स्फुरला
गोळ्यानें जेजालेच्या 'खंडोजी' ठार जहाला

ऐकतांच दुर्वार्तेला हातांतुन भाला पडला
शत्र लावोनी पोटाशीं
अश्रूंच्या गाळी राशी
गमलें परकीय जनांसी
विसरेल वाक्य मल्हारी 'कुंभेरीची भंबेरी' १०

मारिला फणेवरि टोला फणि सूड न घेइल काय?
छाव्याचा मुडदा बघुनी संतप्त केसरी होय
जल--ओघाखालीं खळगा पाडितां गर्जना होय
ज्याचा विजयी भुजदंड
शत्रूची शमवित कंड--
मिळवी जयकीर्ति अखंड
उडवील न काय करारी कुंभेरीची भंबेरी ११

"त्वां माझें श्राद्ध करावें मज तुझेंच करणें पडलें!
तव हस्त-तिलोदक प्यावें मीं तुलाच प्याया दिधलें!
सुत एकचि तूं होतासी मत्सद्गति पुढची न कळे!
जाहला आज निर्वंश
जो करी दुष्ट विध्वंस
छेदीन तयाचा वंश
उडवितों पहा अनिवारी कुंभेरीची भंबेरी १२

ऐक गे! अहिल्ये! देवी! ठेवी न चितेवर पाय
विरहाची तूंही आग मज लावुं नको गे हाय!
श्वशुराची माझी विनती तूं अमान्य करिशिल काय?"



सुभेदार मल्हारराव होळकर

" यमुनेचा वनविन गाळ -- या कुंभेरीची माती ! "

बा. प्रेस जळ. [ म. सग्रामगीतें पृष्ठ ४८ ]

ती स्नुषा शीलकुलवान
परतवी तिला विनवून
येतांच ह्मणे उडवून
रिपुवंश हनन करणारी कुंभेरीची भंबेरी १३

"कुंभेरीचा कुंभार वसवीन गाढवावरतीं
चौमुखख धिंड काढून देईन यमाच्या हातीं
यमुनेचा वनविन गाळ या कुंभेरीची माती
सार्थकता तरि देहाची
पूर्ततांहि जनकत्वाची
त्यावीण शांतता कुठची ?
अजि उडेल संस्मृतिकारी कुंभेरीची भंबेरी " १४

ऐकुनी प्रतिज्ञा घोर वायूही चित्तीं भ्याला
तव भरलीं शंभर वर्षं सांगून जाय जाटाला
मोठीच वावटळ उठुनी गड पांडुरवर्ण जहाला
उमळोनी तरुवर पडले
वन विवर्ण होउन गेले
कीं उडवी आजचि नकळे
हा भीष्म वाक्यनिर्धारीं कुंभेरीची भंबेरी १५

घेतलें सतीचें वाण परतेल न तो माघारीं
राहिला उभा बदलून तो दहांस असतो भारी
तळहातीं शिर जो घेतो काळहि ना त्यास निवारी
रूपराम मंत्री वृद्ध

राजनीति कुशल गुणज्ञ
स्वामीस करी सद्बोध
उडवील वीर इंदोरी कुंभेरीची भंबेरी १६

"ऐकोनी नांवेंच घोडे लाविती न मुख पाण्याला
थोपटून मानेवरतीं पुसतात तुर्क तुरगाला
'क्या पानीमें दिखता है मल्हारी भालेवाला?'
ऐसा हो ज्याचा धाक
तो करील दौलत खाक
माराल मागुनी हाक
उडतांची हृदयविदारी कुंभेरीची भंबेरी १७

कोपून पुणें दरबारीं आपटतां पद जोरानें
तो काबुलचा दरबार दरकला उग्र भीतीनें
तें सुलेमान तख्ताचें हाललें शिखर कंपानें
वेळीं न हुषारी धरिली
पगडी न जरी लववीली
तरि सर्वांशीं उडलेली
येईल बघुन अंधेरी कुंभेरीची भंबेरी १८

भाल्यावर ज्याच्या निंबू शेंदूर फांसुनी राही
तें निंबू कसचें राया! वैऱ्याचें डोकें पाहीं
काळाचा दंड बघोनी रक्ताचें पाणी होई

१ मल्हारीचें

बुद्धीशीं वैर न आणा
सलतिल जरि हित--वच कर्णा
तरि उडलेली बघतांना
डोळ्यांतुन वाहिल वारी  कुंभेरीची भंबेरी  १९

राजस्थानाची भूमी  हयपदोत्कीर्ण झालेली
आर्यावर्ताची धरणी  वृकगृध्र--काकमय असली
अंतर्वेदीची क्षोणी  नररुधिरसिक्त बनलेली
यांकडे तरी पाहून
आपुली शक्ति जाणून
उडवा न गर्व वाहून
अंतर्यामीं सलणारी  कुंभेरीची भंबेरी"  २०

*  *  *

खंडणी अर्धकोटीची  देउन रिपु शरणीं आला!
चरणीं लवलेल्यावरतीं  धरवे न शस्त्र कोणाला
शूरास दयेचीं शास्त्रें  लागतीं न पढवायाला
औदार्य मनाचें दावी
रक्तपात चुकवी भावी
नुसत्या जरबेनें उडवी
रिपुगर्व हनन करणारी  कुंभेरीची भंबेरी  २१

# कीर्तीचा ध्वज मळवीला.

## विषय-सूत्र.

" गिलचांच्या सरदारांनीं रोज रोज आमची रसद लुटावी, पठाणांनीं आमच्या सैनिकांचा धुव्वा उडवावा, आणि आमच्या एकाही मराठे सरदारास या गोष्टीचा सूड उगवितां येऊं नये! ही मोठी नाउमेदीची गोष्ट आहे! आमचे कांहीं सरदार तर पोरवयाचेच आहेत; पण—" जनकोजी शिंद्यानें भाऊसाहेबांस पुढें बोलूंच दिलें नाहीं; तो ताडकन् उठून उभा राहिला आणि ह्मणाला—" कां हा रणसिंह शिंद्यांचा छावा स्वामीस तेजोहीन वाटला कीं काय? हा अस्सा जातों—आणि या म्यानांतून बाहेर काढलेल्या समशेरीचा प्रभाव दाखवून नंतर चरणांचें दर्शन घ्यावयास येतों." असें बोलून तो अठरा वर्षांचा फाकडा वीर भरदरबारांतून निघून गेला! भाऊसाहेब व त्यांचा तो दरबार त्या बालवीराकडे विस्मयपूर्ण दृष्टीनें पहातच राहिला!

हा तरुण वीर आपल्या बोलण्यानें इर्षेस चढून साहसास प्रवृत्त झाला हें ध्यानीं येऊन प्रसंगीं मदत करावी व पाठ राखावी ह्मणून बळवंतराव गणपत मेहेंदळे यांस हुकूम सुटला! बळवंतराव व जनकोजी यांचें मनोमनीं चांगलें नव्हतें. मेहेंदळे आपली खास पागा घेऊन गेले. पण शिंद्यावर ऐन गर्दीच्या वेळीं एकजात ५०० पठाणी स्वार तुटून पडले असतांही ते गिधाडासारखे घिरट्याच घालीत होते! मेहेंदळ्यांची हरामखोरी शिंद्यांच्या तेव्हांच लक्षांत आली आणि त्या झटक्यांत तर तो अधिकच मर्दुमकीनें लढला.

विजयी होऊन रक्तानें भरलेली ती जनकोजीची बालमूर्ती आपल्या कंगणीदार पगडीला मिरवीत, घाम पुसीत दरबारांत ठाकली! तेथें मोठ्या जोरदार भाषेंत त्यानें मेहेंदळे यांचा पाजीपणा व्यक्त केला. भाऊसाहेबांनीं शिंद्याची पाठ थोपटून बळवंतरावास दोष दिला. गुडघ्यांत मान घालून बसलेले बळवंतराव घरीं येतात तों दारातच उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नीनें ' कीर्तीचा ध्वज मळविला! ' असें ह्मणून त्यांना धिक्कार केला. घरीं दारीं दोहींकडे होत अस-

लेल्या अपमानानें तो मानी पुरुष चिडून गेला. मळविलेला कीर्तिध्वज उजळून येईन नाहीं तर आपली "स्वर्गांत भेट होईल." असें पत्नीला सांगून त्यानें एकदम डंके वाजविले! ते ऐकतांच आपली खास तैनाती फौज घेऊन तो सरदारांचा सरदार **सदाशिवराव भाऊ बळवंतरावाच्या** रक्षणाकरितां त्यांच्या पाठीशीं धाऊन आला. स्वतः श्रीमंत भगवा झेंडा तोलीत आपणाकरितां येत आहेत; हें पाहतांच **बळवंतरावाचा** कंठ भरून आला! या युद्धांत **बळवंतराव** पडले. भाऊसाहेब अत्यंत दुःखानें त्यांचें प्रेत घेऊन परत वळले. पुढें मेहेंदळ्या-बरोबर त्यांची सत्यवचनी पतिव्रता स्त्री तिथेंच सती गेली!!

स्वारींनीं ह्मणती काल कीर्तीचा ध्वज मळवीला
जनकोजी ऐसा शिंदा बालवीर तोंडीं दिधला
दुरुनीच घालुनी घिरट्या गृध्रासम डोळा दिधला
मी महिंदळे वीरांची
वीर—पत्नि असतां साची
वार्ता दुर्लौकीकाची
मग कैशी ऐकूं बोला कीर्तीचा ध्वज मळवीला १

ओठाच्या वरचें दूध अजुनी न जयाच्या सुकलें
अठरा वर्षांचें पोर झेंडे फडकावित आलें
रणशूर शिकंदर गाजी ते माशा उडवित आले
व्यक्तिद्वेषाचा सूड
देशाच्या कार्यीं मूढ
उगवितात मानारूढ
नुमगलें कसें स्वारीला कीर्तीचा ध्वज मळवीला २

पांचशें पठाणी स्वार शिंद्यावर येउन पडतां
एकटाच 'हर! हर!' शद्बें बेहोष होउनी लढतां

20258

तुहि भीमासम लढवय्ये    तैं कोठें गेला होतां ?
काकणें अह्मांसम हातीं
भरलेलीं कां हो ! होतीं ?
दगडाची करुनी छाती
परतोनी कैसें आला ?    कीर्तीचा ध्वज मळवीला ३

रक्ताच्या कारंजांचे    तनुवरी फवारे उडले
घामाच्या धारा फुटुनी    डवडवुनी मुखही गेलें
श्रम होतां अपरंपार    तें म्लान जरासें झालें
शिंद्याची ऐशी मूर्ती
ठाकतां पेशव्यापुढतीं
शाबास ! वाहवा ! ह्मणतां
धिक्कार जाहला आपुला    कीर्तीचा ध्वज मळवीला ४

"काळीजच उलटे ज्यांचें    कुलटे आह्मांसह होते
चोरटे दगलबाजीनें    ते घिरट्या घालित होते
उलटेल केधवा डाव    उलटे ते चिंतित होते !"
शिंदे ऐसे रागांत—
वदतां भर दरबारांत—
घातली मान गुडघ्यांत
निर्लज्ज कसें तें झालां ?    कीर्तीचा ध्वज मळवीला ५

पाहतांच रणमैदान    रोमांच थरारुनि जावे
आवेश भरोनी अंगीं    छातीचे बंद तुटावे
हृदयाच्या ठोक्यासरसी    शरिरांत रक्त उसळावे

जे प्रळयकाळचे सांब
काळाला ह्मणतिल थांब ?
पळुं नको असा तूं लांब
बळि पडले ते द्वेषाला कीर्तीचा ध्वज मळवीला ६

ऐकुनी जयांचें नांव अरि-शरिरीं कंप सुटावा
नौबतिचा ध्वनि दुमदुमतां धैर्याचा दोर तुटावा
उसळुनी धडाडी घेतां शेळ्यांचा कळप पळावा
ते काल ऐन समयातें
लावितां न कर खड्गातें
टकमक कां पाहत होते ?
मतिविकार कैसा झाला कीर्तीचा ध्वज मळवीला ७

करकरीत कोरे कपडे रक्ताचा डाग न एक
घमघमाट ये गंधाचा घामाचा थेंब न एक
तरवार कटीला नाहीं हातांत छडीचा झोंक
या ऐशा वेषें मजला
कां भुलवायाला आला ?
भुलणारी नाहीं विदुला
शौर्यावर पाडुनि घाला कीर्तीचा ध्वज मळवीला ८

स्वारी विजयाची माला येईल कंठिं घालून
दारांतचि मी आनंदें पंचारति ओवाळीन
राहुनी उभी शेजारी वरतीं पंखा वारीन
भोपळा भ्रमाचा फुटला

अंधार रवीच्या पाठीं
जन्माला तैसे आलां     कीर्तीचा ध्वज मळवीला १२

आलांत तसें जा परतीं     हें तोंड न मज दावावें
घाढून पाल्थे शत्रू     मातींत मिळवुनी यावें
पडलेला डाग धुवोनी     दासीला दर्शन द्यावें
जरि गेलां स्वर्गावरतीं
तनु ठेउनि सरणावरतीं
सेवीन येउनी वरतीं
बोलोत न जन या बोला     'कीर्तीचा ध्वज मळवीला' १३

मराठी ग्रंथ [illegible], ठाणे.
[illegible] शाखा.
[illegible] [illegible]
[illegible] [illegible]
[illegible] [illegible]



आशातरु दग्ध जहाला
मी सोडी निश्वासाला
ऐकिलें यदा वार्तेला    कीर्तीचा ध्वज मळवीला ९

दोषितात तुमचे तुह्मां    सरदार तसेचि शिपाई
गोटा-गोटांतुनि ऐका    किति निंदा चाले बाई !
देतात तुह्माला उपमा    "हे बारगिरांचे भाई !"
दुःशब्द कसे ऐकवती
अपमान कसे साहवती
कां वाटत नाहीं खंती ?
लाविला डाग वंशाला    कीर्तीचा ध्वज मळवीला १०

"हा बेहिमत्याचा मुलगा"    वदतील लोक बाळाला
"ही नामर्दाची दासी"    हिणवितील बाई मजला
"विश्वासघातकी, पाजी"    हीं विशेषणें तुह्मांला
वडिलांची तुमच्या कीर्ती
दुमदुमते आर्यावर्ती
शौर्याची होती मूर्ती
मोठ्यांच्या पोटीं आलां    कीर्तीचा ध्वज मळवीला ११

एरंड उसाच्या पोटीं    शेवाळ नदीच्या कांठीं
कीं आम्रफळाच्या पोटीं    निःसत्व असावी बाठी
कंटक पुष्पाच्या देठीं    कांटे फणसाच्या पाठीं
कीं काच हिऱ्याच्या पोटीं
तुळशींत भांग उफराटी

अंधार रवीच्या पाठीं

जन्माला तैसे आलां  कीर्तीचा ध्वज मळवीला १२

आलांत तसें जा परतीं  हें तोंड न मज दावावें

घालून पालथे शत्रू  मातींत मिळवुनी यावें

पडलेला डाग धुवोनी  दासीला दर्शन द्यावें

जरि गेलां स्वर्गावरतीं

तनु ठेउनि सरणावरतीं

सेवीन येउनी वरतीं

बोलोत न जन या बोला  'कीर्तीचा ध्वज मळवीला' १३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.



# २ स्वर्गांत भेट होईल.

भामिनी पुरें कर आतां वाणीचें शर-संधान
त्वां जागविला हा सिंह खुपसून विषारी बाण
दारूच्या कोठारास लाविला अग्नि हा जाण
हो बाजूला चल दूर
गिलच्यांचा किति मगदूर
जरि दैवचि झालें क्रूर
तरि शेवटचे हे बोल 'स्वर्गांत भेट होईल' १

वडिलांचे स्मरुनी पाय वाहतों शपथ कीं साफ
कीर्तीस लागला डाग तो करीन रुधिरें साफ
देणें मी देई पुरतें प्राणाचें भरुनी माप
कां प्रबळ गजाचा छावा
अबलेनें धिक्कारावा?
हा दुर्दैवाचा कावा
जर शेवटचाच असेल स्वर्गांत भेट होईल २

ऐसाच जाउनी घेतों समशेर आणि ती ढाल
बळवंतराव मी नाहीं जाहलों पुरा वेताळ
एकची करोनी देतों आकाश आणि पाताळ
रिपुपक्षाकडचीं भूतें
नाचवितों 'थै थै' तेथें
आलों तर येइन येथें

अंतिम वा संगमकाल स्वर्गांत भेट होईल ३

दुसऱ्याचें साह्य कशाला वनराज एकटा जातों
गर्जना फोडुनी मोठी शत्रूला धडकी भरितों
मेंढ्यांचा झेंपेसरसा पाडोनी फडशा येतों
कोल्ह्यांची गडबड काय
ठेवील न एकहि पाय
ह्मणतील जिवाला हाय
दुर्दैवाचें जरि उलटेल स्वर्गांत भेट होईल ४

बडबडती षण्मुख गर्वी थोपटती निज भुजदंड
गणपतिच्या बलवंताचा पाहिला न शुंडादंड
बघतों मजसह लढती कीं अजि वीर कोणते चंड ?
मी जीव तृणासम गणितों
हें नशीब ठोकुन जातों
जातांना तुजला वदतों
उलटेल जरि हा खेळ स्वर्गांत भेट होईल ५

त्या रणदुळ्ळाखानाला खेंचून आणितों पुढतीं
खिळखिळीं करोनी हाडें वाघाला धरितों हातीं
मिरवीत आणितों येथें बांधोनी हत्तीवरतीं
त्या कापाकापीमध्यें
येतील पुढें जे योद्धे
पाडीन तयांचे मुर्दे
आलीच तशी जरि वेळ स्वर्गांत भेट होईल ६

मी महिंदळे नांवाचा गोंधळांत उडविन खटका
गांठून वजिर काबुलचा हातानें मारिन झटका
मग बघेन येतो कोण करण्याला त्यांची सुटका

सिंहाच्या दाढेखालीं
एकवेळ जी सांपडली
वांचते कशाची शेळी

जरि निष्फल वच होतील स्वर्गांत भेट होईल ७

मज मनःपूत निंदाया ज्यांचिया जिभा चुरचुरल्या
धरतील जिभा दांतांत लाविल्या जयांनीं चुगल्या
तोंडांत घालतिल बोटें ह्मणतील 'कल्पना चुकल्या'

हे काना मागुन आले
शाहणे फारची झाले
उघडितों तयांचे डोळे

अवतार जरी संपेल स्वर्गांत भेट होईल ८

अजवरी चकमकी झाल्या पोरखेळ पोरांचे ते
हैदोस कसा घालावा शिकवीन आज मी त्यांतें
कितिकांच्या विधवा दुःखें लावितील कर भाळांतें

आकाशीं जी थरथरली
उतरेल भूवरी विजली
जर असेल वेळचि भरली

ज्योतींत ज्योत जाईल स्वर्गांत भेट होईल ९

कटिवरतीं नाहीं बाळ ओंपला काय नुकता तो?

जागवूं नको ? झोंपूं दे      एक वेळ पाहुन घेतों !
कमरेस घालुनी विळखा      तो ह्मणेल 'मीही येतों'
"जरि आलों बाळा ! परतीं
तरि घेइन मांडीवरतीं
नाहीं तर जेव्हां पुढतीं
मिळवून कीर्ति येशील      स्वर्गात भेट होईल"      १०

येतोंच अतां चढतीचा      सार्थी ! कर्णा वाजेल
तास दोन तासांमध्यें      मोठी दंगल माजेल
ही पानपताची भूमी      नररुधिरानें रंगेल
तूं रहा बसोनी येथ
येतों जयघोष करीत
जरि फसले माझे बेत
मग ठरले अपुले बोल      स्वर्गात भेट होईल      ११

* * *

तोडुनी पाश मायेचा      कर्मवीर निघुनी गेला
ती तटस्थ पाहत होती      हरिणाक्षी निश्चल विद्युला
निज सौभाग्याचा लाल      तो दृष्टिआडही झाला
निश्वास सोडुनी ध्याई
'हे देवी ! अंबाबाई !
काळजी इकडची वाही
इच्छा जरि तवचि असेल      स्वर्गात भेट होईल'      १२

## ३ विजयाच्या द्वारीं अडला.

रणवाचें नौबत डंके कोणाचीं हीं दुमदुमती ?
कोणाचीं निवडक पथकें वळलीं कुरुभूमीवरती ?
ह्या महिंदळे सरदार ज्या 'पंचहजारी' ह्मणती !
शिंद्यांचें वच ऐकोनी
अपमानानें जळफळुनी
अजि कमरबंद होवोनी
ललकारी ठोकित गेला विजयाच्या द्वारीं अडला १

श्रीमंत सदाशिव भाऊ सरदारांचा सरदार
पाठीवर धांवत आला दासांचा पालनहार
दिलदाराला बघुनीया गहिंवरुनी आलें फार
"कीर्तीचा ध्वज मळवीला
हो ! स्वामि अशा दासाला
कां परतविण्याला आलां ?
परतेल न चाकर अपुला विजयाच्या द्वारीं अडला" २

"बळवंतराव ! ईर्षेनें एकटे चालुनी आलां
सांभाळा आतां बाजू लागेल डाग तोंडाला
भिडवितों बगल मी डावी उजवीला तुह्मि सांभाळा"
नो गरुड भरारी मारी
भुज-पक्षानें रिपु सारी
कितिकांना ठोके मारी
कलकलाट भारी केला विजयाच्या द्वारीं अडला ३

बाणांच्या कैच्यावाले धाडसी जंबूरेवाले
उडवीत आगिच्या ठिणग्या आंगावर धाउन आले
बाहूला बाहू भिडतां घाल्यावर पडले घाले
‘ मी मरेन वा मारीन
कीं कटेन वा काटीन
परि कीर्तीला उजळीन ’
निर्धारें ऐसा लढला विजयाच्या द्वारीं अडला ४

तो ज्वालामुखिचा स्फोट पाषाण द्रवुनी जावे
कीं प्रभंजनाचा लोट उपटोनी वृक्ष पडावे
प्रक्षुब्ध अब्धिची लाट मासे खळबळुनी जावे
होणारें होवो कांहीं
मागें ना परतुन पाही
तुडवीत शवांना जाई
चौफेर घेरला गेला विजयाच्या द्वारीं अडला ५

शद्बांचे भीषण मेघ पर्वतावरी घसरावे
मोठाल्या जल–ओघांनीं सिंधुच्या तटीं नाचावें
कीं पतंग दीपाभंवतीं चहुंबाजूंनीं झडपावे
धिप्पाड काबुली वीर
होउनी लाल अंगार
ठाकले कराया वार
फिरविना पाय तरि अपुला विजयाच्या द्वारीं अडला ६
एकटा वीर सगळ्यांशीं तो झगडे अति निर्धारें
ढालेचा फिरवित हात खड्गांचे चुकवी मारे

धावोनी पट्टे आले जीवास जीव देणारे
खणखणाट मोठा झाला
रक्ताचा पाउस पडला
तो महिंदळा मरणाला
थोडाहि न चितीं भ्याला विजयाच्या द्वारीं अडला ७

जाळ्यांत वाघ[1] सांपडला हें दुरून अवलोकोनी
भाऊही[2] भगवा झेंडा तोलीत येइ धावोनी
नेटानें चढवुन हल्ला घुसला तो फाळि फोडोनी
तो योद्धा हिंमतवान
पाही गर्दन वळवून
प्रेमाश्रू आले भरुन
दुप्पट अवसानें भरला विजयाच्या द्वारीं अडला ८

मोहरा[2] महाराष्ट्राचा आलेला जवळी दिसला
आरक्त रिपूचा डोळा श्रीमंतांवरतीं फिरला
नरहरीच तो तर होता आंतड्याच फाडित गेला ! !
तो प्रसंग पाहुन नयनीं
चावून ओठ दातांनीं
पलटी घेउन रावांनीं
ध्वनि "हर! हर!" ऐसा केला विजयाच्या द्वारीं अडला ९

उसळावा रबरी चेंडू तैसा उसळे त्वेषांत
स्वामींच्या भंवतीं फिरवी पट्ट्याचे गरगर हात

१ बळवंतराव मेहेंदळे. २ सदाशिवराव भाऊ.

जणुं भरली होती वीज शूराच्या सर्वांगांत
पळसासम देहीं नटला
कमरेचा शेला सुटला
अवसर ना बांधायाला
तो रते स्वामिसेवेला विजयाच्या द्वारीं अडला १०

उंच उंच हिमगिरि-शिखरें देखावा पाहत होतीं
लाल लाल शोणित-सरिता धों धों खालीं वाहातीं
चळवळती गंगा यमुना भूवरच्या पुण्यज्योती
मेघांच्या नूतन पंक्ती
कोलाहल ऐकुन भिती
गिरिशिखरांशीं दृढ धरिती
लढवय्या ऐसा लढला विजयाच्या द्वारीं अडला ११

नामर्दाच्याही अंगीं स्फुरवील चेतना मोठी
विजयश्री हांसत यावी घालाया माला कंठीं
कर्तृत्व बघोनी शद्व भाऊंच्या आले ओष्टीं
" बळवंतराव शाबास !
ह्या नीचांना गळफांस
कोंडून धरा अधमांस "
तो स्वामिवचें सरसरला विजयाच्या द्वारीं अडला १२

दैवानें केला घात घातली झडप काळानें
खंजीर खुपसला पोटीं गर्दींत कुणी पाप्यानें
भूमीवर उलथुन पडला त्या प्राणांतिक घावानें

आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली
तद्वाणी शोकें वदली
' कर्णासम योद्धा गेला ' विजयाच्या द्वारीं अडला ! १३

हा तुटे स्वामिभक्तीचा तेजस्वी सुंदर हार
सति सुलोचनेचा झाला इंद्रजीत युद्धीं ठार
साध्वीच्या नेत्रीं आतां लागेल अश्रुची धार
दैवाचा उलटा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेंकी शरिरा
तो काय करिल दैवाला विजयाच्या द्वारीं अडला १४

* * *

तें प्रेत परत मिळवाया प्रेतावर प्रेतें पडलीं !
परतले सदाशिव-भाऊ बाष्पाला गाळित खलीं !
जखम ती स्वामिभक्ताची स्वामीला बाधक झाली !
ह्मणती दैवाचे वादी
' पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी '
हा शकुन तसा भाऊला विजयाच्या द्वारीं अडला १५

# मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूशीं बेइमान होऊं?

पानिपताच्या संग्रामांतील मराठ्यांकडील प्रसिद्ध योद्धा **इब्राहिमखान गारदी**–ज्यावर **भाऊंचा** एवढा विश्वास कीं, शेवटचा विजय मी खानाच्या तोफांवर मिळवीन !– त्याला जातीच्या नांवाखालीं आपल्याकडे वळवून घेण्या-करितां आदल्या दिवशीं रात्रीं **अहमदशहा अबदल्लीनें** आपल्या डोक्याची पगडी पाठविली व पगडीभाई होण्यास सांगितलें! त्या स्वामिभक्त शूरानें ती परत करून त्याच्याकडे मूठभर दारू मात्र पाठवून दिली !!

पाठविली पगडी अपुली करण्याला 'पगडी-भाई'
प्रेमाची भाषा तव जी भेद-नीति केवळ तीही
निश्चय मम ढळला नाहीं परि विचार आले कांहीं !
पाजिलें जयानें दूध
त्यावरी करोनी क्रोध
ओकूं विष मी कां आज ?
स्वामीस घालुनी फासा बेइमान होऊं कैसा? १

उद[illegible]वरचा माझा तो तोफांचा भडिमार
[illegible]ंची चतुराई ती कडाबिनींची फैर
[illegible] जो आनंदानें 'धन्य! धन्य!' बोले वीर
'हाय' काय त्या वदवाया—
राज्यलोभ तव पुरवाया—
दुर्लौकिक घेऊं वाया ?
ज्ञातींच्या मोहासरसा बेइमान होऊं कैसा? २

आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली
तद्वाणी शोकें वदली
' कर्णासम योद्धा गेला ' विजयाच्या द्वारीं अडला ! १३

हा तुटे स्वामिभक्तीचा तेजस्वी सुंदर हार
सति सुलोचनेचा झाला इंद्रजीत युद्धीं ठार
साध्वीच्या नेत्रीं आतां लागेल अश्रुची धार
दैवाचा उलटा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेंकी शरिरा
तो काय करिल दैवाला विजयाच्या द्वारीं अडला १४

* * *

तें प्रेत परत मिळवाया प्रेतावर प्रेतें पडलीं !
परतले सदाशिव-भाऊ बाष्पाला गाळित खालीं !
जखम ती स्वामिभक्ताची स्वामीला बाधक झाली !
म्हणती दैवाचे वादी
' पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी '
हा शकुन तसा भाऊला विजयाच्या द्वारीं अडला १५

# मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूशीं बेइमान होऊं?

पानिपताच्या संग्रामांतील मराठ्यांकडील प्रसिद्ध योद्धा इब्राहिमखान गारदी–ज्यावर भाऊंचा एवढा विश्वास कीं, शेवटचा विजय मी खानाच्या तोफांवर मिळवीन !– त्याला जातीच्या नांवाखालीं आपल्याकडे वळवून घेण्याकरितां आदल्या दिवशीं रात्रीं अहमदशहा अबदल्लीनें आपल्या डोक्याची पगडी पाठविली व पगडीभाई होण्यास सांगितलें! त्या स्वामिभक्त शूरानें ती परत करून त्याच्याकडे मूठभर दारू मात्र पाठवून दिली !!

पाठविली पगडी अपुली करण्याला 'पगडी-भाई'
प्रेमाची भाषा तव जी भेद-नीति केवळ तीही
निश्चय मम ढळला नाहीं परि विचार आले कांहीं !
पाजिलें जयानें दूध
त्यावरी करोनी क्रोध
ओकूं विष मी कां आज ?
स्वामीस घालुनी फासा बेइमान होऊं कैसा ? १

उदगीगवरचा माझा तो तोफांचा भडिमार
संगीनींची चतुराई ती कडाबिनींची फैर
पाहुन जो आनंदानें 'धन्य! धन्य!' बोले वीर
'हाय' काय त्या वदवाया–
राज्यलोभ तव पुरवाया–
दुर्लौकिक घेऊं वायां ?
जातीच्या मोहासरसा बेइमान होऊं कैसा ? २

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं कां देशाला बुडवावें ?
जातीच्या मोहानें कां जन्मभूस हो ! रडवावें ?
नश्वर निज सौख्यासाठीं कां एकीला फोडावें ?
समर्थीच परीक्षा होते
शीलाला महती येते
वाढवी अचल कीर्तीतें
तो समय लाभतां ऐसा बेइमान होऊं कैसा ? ३

"आकाश फाडुनी खालीं सैतान उतरुनी आला
इब्राहिम माझा असतां काढीन भाजुनी त्याला
बसवोनी तोफेवरती पाठवीन निज-धामाला"
हा भाऊंचा विश्वास
मजविषयीं असतां, त्यांस—
सोडाया लावूं श्वास !
हा नव्हे गारदी पेशा बेइमान होऊं कैसा ? ४

सजलेली दाढी माझी भरलेला पीळ जियेला
पाहुन जो हात न लावी रुसलेल्यांच्या दाढीला
ताठ्यानें जातां जाट जाईना परतविण्याला !
माझ्या संगीनी—वरतीं
दिसते ज्याला जयकीर्ती
त्यावरीच फिरवावी ती
शिवते न कल्पना सहसा बेइमान होऊं कैसा ? ५

कोणती बगल भिडवावी कोणता व्यूह फोडावा ?

आणीबाणीच्या वेळीं मनसुबा काय ठरवावा ?
बोलावुन आधीं ज्यानें खानाचा सल्ला घ्यावा !
सरदारांचा सरदार
दिलदारांशीं दिलदार
माझ्यावर ज्याचा प्यार
विसरोनी तत्सहवासा बेइमान होऊं कैसा ? ६

चाळितां कुराणग्रंथ स्वामीची मूर्ती दिसते !
खलिपांचीं वचनें स्मरतां तद्वचमाला आठवते !
भाऊंचे बघतां वैरी रक्ताला उसळी येते !
बंदुकिच्या नलिकेंतूनी
तोफेच्या तोंडांतूनी
उडती गोळे मैदानीं
करिती भाऊच्या घोषा बेइमान होऊं कैसा ? ७

जातीचे हिंदु असोत देशाचे बंधू माझे.
अभिमान तयांना माझा माझ्यावर त्यांचें ओझें
कर्तव्याच्या धर्माला जागोनी कीर्ती साजे
आज काय सांगू वर्म
शिकवीन उद्यां तुज धर्म
कीं स्वामिभक्तिचें कर्म
निरवावें स्वामि-त्रासा बेइमान होऊं कैसा ? ८

उतरोनी यमुना, दिल्ली अडवून तुवां जी धरिली
दख्खनच्या वाटेवरची नाकेबंदी ती केली

तळव्याची चढली आग मस्तकास जाउन भिडली!
दाराला लावुन पाय
वळवाया बघशी काय?
मी होइन कां निरुपाय?
सोडून दीर्घ निःश्वासा बेइमान होऊं कैसा? ९

होईल उद्यां उभयांचें जैं हटा—तटाचें युद्ध
इतुतूंत तुह्मी बोलाल 'दीन दीन' ऐसे शद्ध
मी कर्तव्याच्या घोषें हसवीन ज्ञानी वृद्ध
गोलघुमट बांधुन पुढतीं
देऊन अराबा भवंतीं
एकदांच ती सरबत्ती
देईन घालुनी वळसा बेइमान होऊं कैसा? १०

बरवा हा माझा मजला शोभतो शिपाई-बाणा,
मोत्यांची पगडी तूझी ही परती तुज करितांना,
एक मूठ दारू देतों हा शूरांचा नजराणा!
मुसलमान हिंदूसाठीं
घेती मृत्यूच्या गांठीं
हा इतिहासाच्या पाठीं
लिहवीन लेख सुंदरसा बेइमान होऊं कैसा? ११

# गारदी कटोनी मेला !

कुरुक्षेत्रावर निदानीचा संग्राम करावयास मराठी फौज सज्ज होऊन पुढें आली. इब्राहिमखानाचे पडघम ढोल झडूं लागले. त्याच्या पलटणी अघाडीवर चालल्या. नखशिखांत लष्करी पोषाखांत नटलेला तो जंगबहादूर भाऊसाहेबा-पुढें शेवटच्या सलामीस आला, आणि अहमदशहा अबदालीकडून—आपणास येऊन मिळण्याविषयीं आलेलीं पत्रें दाखवून ह्मणाला, " साहेब ! मी इस्लाम-धर्माचा आहें पण निमकहराम नाहीं हें आपल्या प्रत्ययास येईल. या युद्धांत जरी मी नामोहरम झालों तरी धन्याकरितां— " गारदी कटून मेला " हेच माझ्या कीर्तीचे शब्द जगाच्या कानीं जातील ! भाऊसाहेबांचा त्याच्यावर फार लोभ होता; तीं पत्रें पाहून ते सद्गदित झाले आणि इतकेंच ह्मणाले कीं, " खानसाहेब ! मीही तुह्मांबरोबर कत्तल होऊन जाईन पण मागें हटणार नाहीं ! आतां बोलायला वेळ नाहीं. घोडा मैदान समोर आहे. या भाऊचा अभिमान खानसाहेब कसा ठेवितात तो मी आज पहाणार आहें. " इब्राहिमखानानें मान लववून फिरून एकवेळां सलाम केला; घोड्यास टांच मारिली आणि एकदम तोफांना सरबत्ती दिली ! !

जातीचा ' खान ' परंतू जो भारतभू-सुत होता
जो तिच्याच अंकावरतीं दुग्धामृत प्याला होता
यत्प्रवाह नवरुधिराचा नसनसांत खेळत होता

जननी—ऋण फेडायाला
स्वामिभक्ति दावायाला
' भाऊसह ' पानपताला

इब्राहिम संगिनवाला गारदी कटोनी मेला १

तो कवायती फौजेचा चौफेर बांधुनी गोल
चालला अघाडीवरतीं वाजवीत पडघम ढोल

भाऊस सलामी देतां शेवटचे वदला बोल

"मी धर्माचा इस्लाम!

नाहीं परि निमकहराम!

जरि झालों नामोहरम

संपादिन या कीर्तीला गारदी कटोनी मेला" २

"ही वेळ न बोलायाची कर्तव्यसमय हा खान!

हा समोर आतां आहे घोडा आणी मैदान!

पाहीन ठेवितां कैसा या भाऊचा अभिमान!"

चढवुनी मिशीवर हात

बोले तो आवेशांत—

"येतील शद्ध कानांत

विजयी झाला वा गेला गारदी कटोनी मेला" ३

मांडीच्या खालीं घोडा फुरफुरुनी नाचत होता

टांचेनें उडवित गेला डोळ्यांनीं बघतां बघतां

तो मेघ वायुवेगाचा वीजेनें भरला होता

'कड कड' या आवाजानें

दशदिशांस भरिलें ज्यानें

अंतींही तो जोमानें

गगनांत निघोनी गेला गारदी कटोनी मेला ४

गिलच्यांच्या तोफांवरतीं फेंकतां नेमके गोळे

होऊन तयांच्या ठिकऱ्या अस्मानीं तुकडे गेले

अफगाणी गोलंदाज होते कीं नव्हते केले

तें युद्ध तोफखान्यांचें
चातुर्य खानखानांचें
उलटले डाव युद्धाचे
गढला, तेथुनी न ढळला    गारदी कटोनी मेला ५

भेसूर गर्जना व्हावी    नाचावी चपला वरतीं
वृष्टि श्रावण महिन्याची    खंड ना जियेला पडती
खालतीं रक्तमांसाच्या    चिखलानें भरली माती
तो घटोत्कची अवतार
गारदी रिसालेदार
रक्ताची गाळित धार
गर्दींतचि गारद झाला    गारदी कटोनी मेला ६

तें दैवचि फिरलें होतें    करणार काय त्या कोणी ?
आकाश फाटलें त्याला    लावावें ठिगळ कुठोनी ?
रोधावें सागर फुटतां    खडकानें किति अडवोनी
'विश्वास' सोडुनी गेला
'भाऊ' न दिसे नयनाला
स्वामीच्या पारि कार्याला
लढला तेथेंची निजला    गारदी कटोनी मेला ७

होळीच्या होळकरांची    आधींच परतली स्वारी
बिजलीवर बनुनी स्वार    शिंद्यांची फिरली स्वारी
रणरंग पाहुनी घेती    एकेक पाय माघारी
समशेर-बहादर पडले

तेजस्वी तारे तुटले
पेंढारी धांवत सुटले
रणसिंह न परि चळवळला गारदी कटोनी मेला ८

शिंद्यांची दृष्टी गेली इब्राहिमखानावरतीं
फेट्याचे पेंच सुटोनी मानेच्या भंवतीं रुळती
अर्धीच जळाली दाढी फेंसाची तोंडीं भरती
परि कवायती फौजेशी
दे वरचेवर हुकुमाशीं
नेऊन भिडवि गिलच्यांशीं
नखशिखांत शौर्यें भरला गारदी कटोनी मेला ९

शूराचें शौर्य बघोनी राहवे न त्या शूराला
"शाबास! खानसाहेब!" गहिंवरुनी शिंदा वदला
तो जंग–बहादुर मान लववोनी थोडा हंसला
"पाटील चाललां तुह्मी
येऊं न शके परि हा मी
कळवा नानांस सलामी
सांगा कीं:—"नाहीं हटला गारदी कटोनी मेला" १०

तनख्याच्यासाठीं ज्यानें अडवून कितीदां धरिलें
हट्टही तुह्मीं लाडानें ज्याचे सगळे पुरवीले
आपुल्या कृपेची छाया ज्यावरी सर्वदा डोले
बेइमान नाहीं झाला
जागला खऱ्या निमकाला



"इब्राहिमखान गारदी" व "महादजी शिंदे"

वा. प्रेस ज. "घ्या सलाम शेवटचा हा -- मज मारू द्या गिलच्यांना!" [म. संग्रामगीतें पृष्ठ ७३]

घनघोर अशा समयाला
हें कळवा हो ! नानांला गारदी कटोनी मेला ११

रडतील बायका पोरें जा सांभाळा जा त्यांना
घ्या सलाम शेवटचा हा मज मारूं द्या गिलच्यांना
शिपायांनीं मुख फिरवीलें लावून पदर डोळ्यांना
चालली लांडगेतोड
आली बाजू बिनतोड
सर्वस्वी झाला मोड
विच्छिन्न होउनी पडला गारदी कटोनी मेला १२

हिंदूंच्या मानेवरतीं ठेवोनी अपुली मान
देशाचा अमुचा भाई निजला इब्राहिमखान
जातीचा पडदा आम्ही फेकोनी देऊं मान
निजराष्ट्रहिताच्यासाठीं
व्हाव्या सकलांच्या गांठी
परवा न जिवाची मोठी
हें दावाया सकलांला गारदी कटोनी मेला १३



# विश्वास सोडुनी गेला.

पानिपतचें रणकंदन जोरांत येऊन जेव्हां खाशाखाशांचे मुडदे पडूं लागले. तेव्हां विश्वासरावांनीं हुजुरातीची पागा घेऊन दुराणीवर घोडे घातले आणि एकदम धाव केला! तों एकाएकींच छातींत गोळी लागून विश्वासराव ठार झाले! नानासाहेबांचें निधान हरपलें! भाऊसाहेबही सरमिसळ होऊन स्वतः हत्यार चालवीत होते. "विश्वास सोडून गेला" ही वार्ता ऐकतांच त्यांचें अवसान गेलें. त्यांनीं जवळ येऊन 'बाळ विश्वास' ह्मणून त्याला उराशीं लाविलें! त्यानें "काका!–" एवढेंच ह्मणून भाऊंच्या खांद्यावर जी मान टाकिली ती पुन्हां उचललीच नाहीं!! तेव्हांचें भाऊचें दुःख किती वर्णावें?

* * *

रणदेवी कुरुभूमीची शतवर्ष उपोषित होती
पातला सदाशिवभाऊ रणकंकण बांधुनि हातीं
पेटलें कुंड युद्धाचें कित्येक आहुती पडती!

आकाश फाटलें सारें
भाऊंना शिरलें वारें
पाडिले शवांचे भारे

तों दुःखध्वनि हा उठला 'विश्वास सोडुनी गेला!' १

तें सळसळणारें रक्त गोठलें आंतल्या आंत
चेहरा उग्र भानूचा झांकला दुःखमेघांत
दृढ मिठी तीक्ष्ण खड्गाची जाहली शिथिल हातांत

शत्रूला कर्दनकाळ
पातला तेथ तत्काळ
लावुनी उराशीं बाळ

शोकानें 'भाऊ' वदला 'विश्वास सोडुनी गेला!' २



'सदाशिवराव भाऊ' व 'विश्वासराव'

"बोलुनी मुखानें 'काका !'– टाकिली मान ती स्कंधीं !"

बा. प्रेस ज. [ म. संग्रामगीतें पृष्ठ ७५ ]

बोलुनी मुखानें 'काका' टाकिली मान ती स्कंधीं
बोलणें राहिलें पुढचें मृत्यूची चढली धुंदी
अंतींची इच्छा वदण्या राहिली न थोडी संधी

"घरबुडवे स्वामिद्रोही
गेले मज सोडुनि, कांहीं
चिंता मी केली नाहीं
परि हाहि लाडका मातें 'विश्वास सोडुनी गेला!' ३

जिंकुनी दोन दिवसांत दिल्लीला दासी केली!
फोडुनी तक्त यवनांचें उधळोनी शकलें दिधलीं!
दक्षिणचा राजा तेथें बसविन प्रतिज्ञा केली!

आग्रेचे उंच मनोरे
जे गगनाला भिडणारे
ज्यावरतीं रचिले सारे
युवराज इथें तो मातें 'विश्वास सोडुनी गेला!' ४

वसईच्या युद्धीं ज्यांनीं घाबरा 'फिरंगी' केला
दभईला ज्यांनीं पुरता दाभाड्याला निजवीला
भूषवी सदा उभयांना विजयश्री घालुनि माला

ते दोघे 'अप्पा' 'बाजी'
बैसुनी विमानीं आजी
मर्दुमकी बघती माझी
पण काय करूं हो बाबा! 'विश्वास सोडुनी गेला!' ५

तोडून आइचें पोर मी निष्ठुर घेउनि आलों
तो बळी इथें हा दिधला खाटका कसाई ठरलों
मिळविलें जरी यश आतां या जगीं निंद्य मी झालों

अ. क्र.

# गिलचा खाशानिशीं मारीन !

“ विश्वासराव ठार झाले ! हें वर्तमान भाऊसाहेबांनीं पाहून अन
ान सोडलें. बहूतसा विलाप करूं लागले पण भाऊंनीं निश्चय केला
उपरी ‘ गिलचा खाशानिशीं मारीन ’ ह्मणोन लोकांस ताकीद केली, आणि पुन
केलें. हाणा ! हाणा ! असें मुखें बोलोन बरोबर समशेरबहाद्दर घेऊन पुढें झाले,
आणि तीन वेळ हत्यार केलें ! लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबाबरोबर पुढें सर-
सावून शिपाईगिरी बहूत केली... दुराणी व नजीबखान रोहिला १०|१२ हजार
फौजेनिशीं भाऊवर येऊन वर्षले ! ते समयीं मारामार अशी झाली कीं, ‘ न
भूतो न भविष्यति ’ एकदांच भंवताले वेष्टून उभे राहिले. आंत खंदळारवंदळ
क्षणभर बहुतच केली त्यांत भाऊसाहेब यांची गत कैशी झाली न कळे खासे
कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत. ”

( पाणिपतची बखर )

× × ×

विश्वासनिधन—दुःखाचे भाऊनें डोळे पुसिले
पिळवटलेल्या हृदयाच्या उच्छ्वासांना आवरिलें
पाहिलें पुन्हां तें प्रेत क्रोधानें डोळे चढले
हृदयाचे ठोके पडती
सूडाची भाषा वदती
उठला ऐकुन , भाऊ ’ तो
‘खाशानिशिं मारिन गिलचा’ १
निश्चयांत वदला वाचा

बलसागर पुण्यपुरीचा सोडोनी सीमा सरला !
पुज्य प्रभु उदयगिरीचा मध्यान्हीं तप्त जहाला !

वेगांत हाकिली नौका
खडकाचा बसला ठोका
मृत्यु या क्षणीं प्रत्येका
दु:खांत दु:ख हें मजला ‘ विश्वास सोडुनी गेला !’ ६

पुसतील गोपिकावहिनी “ विश्वास कुठें भावोजी ?
सौंदर्यगुणाची ठेव विसरलां कुठें ती माझी ?
कंठाचा मणि तो होता निजविला कुठें रणगाजी ?”
दाबिल्या आंतल्या ज्वाला
तोडिला पोटचा गोळा
स्वाधीन जियेनें केला
मी सांगूं काय तियेला ‘ विश्वास सोडुनी गेला !’ ७

टाकुनी लेखणी ज्यानें समशेर चढविली हाता
ती टाकुन या संग्रामीं येइल कां मजला जातां ?
दादाला काळें तोंड दाखवूं कसें तरि आतां ?
मारुनी थडक गिलच्याला
घेऊनी विश्वासाला
फिरविल्याहि असत्या ढाला
पण तोच कलीजा माझा ‘ विश्वास सोडुनी गेला !’ ८

नानांना जाउनि माझें साष्टांग नमन सांगा हो !
भट कुळांतील भट गेला अश्रु ना कुणाचा वाहो !
श्रीछत्रपती शिवबांचें तें तख्त सलामत राहो !’
बोलुनी अशा या बोला
आगीचा तो जणुं गोळा
आगींत उडोनी गेला
जाळिती शद्ब हृदयाला ‘ विश्वास सोडुनी गेला !’ ९

# गिलचा खाशानिशीं मारीन !

मराठी [illegible] अ. क्र. [illegible]

“ विश्वासराव ठार झाले ! हें वर्तमान भाऊसाहेबांनीं पाहून अन… न सोडलें. बहूतसा विलाप करूं लागले पण भाऊनीं निश्चय केला कीं, या… परी ‘ गिलचा खाशानिशीं मारीन ’ ह्मणोन लोकांस ताकीद केली, आणि … केलें. हाणा ! हाणा ! असें मुखें बोलोन बरोबर समशेरबहाद्दर घेऊन पुढें झाले, आणि तीन वेऊ हत्यार केलें ! लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबांबरोबर पुढें सर- सावून शिपाईगिरी बहूत केली…दुराणी व नजीबखान रोहिला १०।१२ हजार फौजेनिशीं भाऊवर येऊन वर्षले ! ते समयीं मारामार अशी झाली कीं, ‘ न भूतो न भविष्यति ’ एकदांच भंवताले वेष्टून उभे राहिले. आंत खंदळाखंदळ क्षणभर बहुतच केली त्यांत भाऊसाहेब यांची गत कैशी झाली न कळे खासे कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत. ”

(पाणिपतची बखर)

× × ×

विश्वासनिधन—दुःखाचे भाऊनें डोळे पुसिले
पिळवटलेल्या हृदयाच्या उच्छ्वासांना आवरिलें
पाहिलें पुन्हां तें प्रेत क्रोधानें डोळे चढले
हृदयाचे ठोके पडती
सूडाची भाषा वदती
उठला ऐकुन , भाऊ ’ तो
‘खाशानिशिं मारिन गिलचा’ १
[illegible] वदला वाचा

[illegible]

बलसागर पुण्यपुरीचा सोडोनी सीमा सरला !
पुज्य प्रभु उदयगिरीचा मध्यान्हीं तप्त जहाला !

रणवाद्यांच्या नादांत
'हर ! हर ! या रणघोषांत
चमके जें खड्ग करांत
त्यावरी लेख शूराचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' २

भीष्मास वधाया कैसा श्रीकृष्ण त्वेषें गेला ?
निःक्षत्रिय महि करण्याला परशुराम कैसा सजला ?
भाऊनें गतगोष्टींची स्मृति दिधली कुरुभूमीला
अंगार भडकली होती
तरि तोफांपुढतीं छाती
शूराची नाचत होती
वाहे वायु श्वासाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ३

प्रत्येक हिरहिरीसरसा गर्जे कीं "हाणा ! हाणा !"
हुतुतूनें लढतां लढतां खुणवी कीं "हाणा ! हाणा !"
'ठेवा मर्दानों ठेवा भगव्या झेंड्याचा बाणा !'
राष्ट्रीय निशाणावरतीं
गिलचांची झाली भरती
भाऊची गर्जे मूर्ती
'समय हा क्षात्रधर्माचा खाशानिशिं मारिन गिलचा' ४

उजव्या बाजूनें शिंदा 'हर हर' गर्जोनी उठला
तीराचा सुटला बाण कमरग्यांत जाउन भिडला
डाव्या बाजूला खानें[१] गिरिसम होता गढलेला
शिंद्यांचा पुढुनी मार

१ इब्राहिमखान गार्दी.

खानाचा मागुन जोर
शत्रूस करी बेजार
अभिमान स्वामिवचाचा 'खाशानिशीं मारिन गिलचा' ५

हुजुरातीच्या फौजेनें राखिलें नांव हुजुराचें
वंशदीप यशवंतांनीं फेडियलें ऋण वंशाचें
दौलतिच्या आधारांनीं लाविले कौल देहांचे
दमदार दमाजी दमला
समशेरबहाद्दर अडला
विठ्ठल शिवदेवहि फिरला
फिरला निर्धार न त्याचा 'खाशानिशीं मारिन गिलचा' ६

विजयाच्या उन्मादांत होता तो अहमदखान
फत्ते झाली ह्मणुनी तो धुंदींतच दुंदीखान
चावली जीभ नाजिबानें उतरे तो हौद्यांतून
टिपरघाइ तरवारीची
केली क्षणभर निकराची
दिसतां स्वारी शाहाची
कळवी निश्चय भाऊचा 'खाशानिशीं मारिन गिलचा' ७

भीमानें शक्ती अपुली भाऊला दिधली होती
विजयानें[1] आनंदानें चपलता दिलेली होती
जो धर्म युधिष्ठिर त्यानें धीरता अर्पिली होती
पांच नद्या वाहति जेथ
अगणित हा वाहवि तेथ

१ अर्जुनानें.

भिन्नता मात्र वर्णांत

भटमंत्र समरतीर्थाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ८

नाजिबखान अहमदशाहा अगणित सेनानिशिं आले
"दीन दीन" करुनी त्वेषें एका भाऊवर पडले
त्यानेंही टाकुन खड्ग पट्टे हातीं चढवीले

एकवटुन शक्ती सारी
रोख धरुन तो बलहारी
शाहावर चढवी स्वारी

समय सत्यसंकल्पाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ९

पुण्यश्री श्रीवर्धनची राज्यश्री शिवनेरीची
विभवश्री पुण्यपुरीची धर्मश्री सज्जनगडची
अभिवांछा प्रत्येकीला भाऊच्या मांगल्याची

शोणभद्र नद तो तिकडे
शोणितनद वाहे इकडे
मांसखंड जिकडे तिकडे

शाहास धाक भाऊचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' १०

भेसूर कृष्णमेघांत चमकोनी लपला तारा
नाहींच पुन्हां तो दिसला निखळला कुठें कीं गेला
परि "भाऊ! भाऊ!" ह्मणुनी हळहळला भारत सारा

सत्प्रतिज्ञ असती त्यांच्या
जरि सिद्ध न झाल्या वाचा
आहुति देती प्राणांच्या

अर्थ ह्राच या वाक्याचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ११

# भाऊवर गर्दी झाली !

**सदाशिवराव** भाऊंनीं पानिपतच्या समरांगणांत शेवटची उडी घेतल्या-वर जेव्हां त्यांच्यावर चहुंकडून गिलच्यांची गर्दी झाली तेव्हां तुकोजी शिंदे व सोनजी भापकर यांनीं त्यांस परत फिरण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें पण भाऊंनीं निदानीचे जाबसाल केले[1]. तेव्हां भाऊकरितां **जनकोजी शिंदे** व **तुकोजी शिंदे** यांनींही घोड्याखालीं उड्या घातल्या आणि मातब्बर मर्दुमकीनें झुंजून आपल्या कुळाला धन्य केलें. शेवटीं या गर्दींत भाऊही गारद झाले[2].

शौर्यांत जणों अभिमन्यु ‘ विश्वास सोडुनी गेला !’
संगरीं घटोत्कच ऐसा ‘ गारदी कटोनी मेला ! ’
‘ समशेर बहाद्दर ’ प्यारा सन्निध तो लढतां पडला !

दुर्दैव हांसलें विकट
विसकटला सेना--शकट
राहिला न कोणी निकट

असहाय अशा त्या कालीं भाऊवर गर्दी झाली १

मद—मत्त कुंजरीं व्याघ्र घन--समूह भानूवरतीं
कीं तुहिनकणांची वृष्टी तेजस्वी कमलावरतीं
अफगाणी फौजा वळल्या त्वेषानें भाऊभंवतीं

---

१ “ तुकोजी बाबा ! आतां कोणीकडे जावें ? नानासाहेब यांस काय तोंड दाखवावें ? रावसाहेबांची ( विश्वासरावांची ) गत काय झाली ती पहावी ”... वगैरे बखरींतील भाऊसाहेबांचे उद्गार वाचवत नाहींत. ते डोळ्याला पाणी आणतात.

२ भाऊवरील गर्दीला दीडशें वर्षांहून अधिक काळ लोटला आहे तथापि अजून उत्तर हिंदुस्थानांतील लोक “ भाऊ गर्दी ” हा शब्द विसरले नाहींत ! यावरून या महाप्रसंगाची व त्यांतील भाऊंच्या शौर्य धैर्याची कल्पना होते.

जनकोजी आणि तुकोजी
शिंदे—कुलभूषण गाझी
उडवीत पातले वाजी
त्यांच्याही कानीं आली ‘भाऊवर गर्दी झाली !’ २

बोलले तुकोजी शिंदे “जाहली शर्थ शौर्याची
फिरवावी भाऊ ! ढाल दख्खनच्या ही छायेची
फळि फोडूं पुढच्या वर्षीं काबुलच्या दरवाजाची !”
गर्जला पुण्याचा वाघ
“छे ! पराजयाचा डाग—
लावितो तनूला आग !”
मति हटातटाला भिडली भाऊवर गर्दी झाली ! ३

टाकिल्या उड्या दोघांनीं निर्धार धन्याचा बघुनी
गोटांत घातला गिल्चा हिरहिरीसवें दडपोनी
शिंद्यांची नौबत गर्जे ‘धन्य धन्य’ या शद्बांनीं
गाजली अहा ! तलवार
तों होय अकस्मिक बार
जाहले तुकोजी ठार
अंगावर बाजू आली भाऊवर गर्दी झाली ! ४

“ हत्तीला बसवा खालीं जरिपटका आणा इकडे
राष्ट्राचें भूषण माझ्या होवो न तयाचे तुकडे
त्यावर तर दाटी झाली भिडले जनकोजी निधडे
“आतां तरि भाऊ ! परता—

सोनजी भापकर वदतां—
" होणारें होइल आतां ! "
शूराची वाणी वदली भाऊवर गर्दी झाली ! ५

नजिबखां दुराणी दोघे दशसहस्र सेनेसहित—
वेगानें ऐशा आले कीं दिसले भिडले निकट !
इकडे तर उरले होते सेनानी मात्र सहस्र !
जनकोजी संगर–धीर
पांचशे घेउनी स्वार
उसळला मराठा वीर
इकडे जरिपटक्याखालीं भाऊवर गर्दी झाली ! ६

कंदाहर–गिझनीवाले काबुली शिपाई बाके
मुल्तानी खोरासानी यत्चित न मरणा धाके
शस्त्रासह ज्यांच्या वदनीं विजयाचें तेज लकाके
एकदांच वेष्टुन भंवतीं
घावांची घाई करिती
वर्णावी कैशी विगती
लेखणी लववि शिर खालीं भाऊवर गर्दी झाली ! ७

'दीन ! दीन !' लाटेवरतीं आदळली 'हर ! हर !' लाट
समशेरी भाले पट्टे यांचाच उडाला थाट !
भाऊनें विरथपणींही बहु केली काटाकाट !
मातब्बर झाली झुंज
एकावर सगळी झुड

पाडिले अमित नर–रुंड
शेवटची घटिका आली    भाऊवर गर्दी झाली  ८

क्षणिं दिसे, दिसेना फिरुनी  मच्छावतार भाऊचा !
बुडुनीया उदया येई  कच्छावतार भाऊचा !
" हाणा ! हाणा ! " हा शब्द राहिला मुखीं वीराचा !
गर्दनतोडीचे डाव
खेळून घातले घाव
गाजलें भटाचें नांव
कळसास शूरता गेली  भाऊवर गर्दी झाली !  ९

हें महाराष्ट्र शौर्याचें  कुरुभूमीवरचें तेज
दिसणार पुन्हां जें नाहीं  पाहोनी घ्या तें आज
लष्करी तनूवर चढला  रक्ताचा ताजा साज
बगलफेक छातीचीर
चालले सफाई वार
भूमीस शवांचा भार
रणदेवी तरिहि न धाली  भाऊवर गर्दी झाली !  १०

मातब्बर मर्दुमकीनें  जनकोजी झुंजत होते
वीर-प्रसवेचें दुग्ध  बाहूंत उफाळत होतें
लपक चपक खांडाखांडी  वर्णाया शद्ब न पुरते
हातघाइ अंतीं झाली
बसले हो ! घाव जिव्हाळीं
रणसिंह पहुडला खालीं
राहिला एक बलशाली  भाऊवर गर्दी झाली !  ११



सदाशिवराव भाऊ

“हे महाराष्ट्र--शौर्याचें -- कुरुभूमीवरचें तेज
दिसणार पुन्हां जें नाहीं पाहोनी घ्या तें आज !”

"तो कुठें सुजाउद्दवला विश्वासघातकी दावा ?"
"अबदल्ली खासा कोठें त्याला तरि दावा दावा ?"
भाऊचे अंतिम बोल आले न पुन्हां ऐकाया !

दक्षिणी मोहरा मर्द
गर्दीतच झाला गर्द
अफगाण जात बेदर्द

हें वाक्य मनाला जाळी 'भाऊवर गर्दी झाली !' १२

*          *          *

कुरुभूमीवरच्या वीरा ! तुज नमन असो हें माझें
जाहला पराजय जरिही तव शौर्य–दुंदुभी गाजे
गायिलीं जरी तव गीतें होइना तृप्त मन माझें

कुरुभूमीचें मैदान
एकटा लढशि बेभान
हें चित्र जाइना पुढुन

कविता ही मम गहिवरली 'भाऊवर गर्दी झाली !' १३



# "धन्य जननि जनकोजीची."

कुरुक्षेत्रावर **भाऊसाहेबाबरोबर** निधड्या छातीनें पराक्रमाची शर्थ करून शेवटपर्यंत लढणारा मराठ्यांपैकीं वीर **जनकोजी शिंदे** होय. "ह्राणा ! ह्राणा !" ह्मणतांना **भाऊंच्या** तोंडाला खरस आलीः गळा कोरडा पडला ! तेव्हां ते हातानें व मानेनें "ह्राणा ! मारा !" ह्मणून खुणवूं लागले ! त्यावेळीं या बालवीरास इतका त्वेष चढला कीं, **दुराणीचा** तोफखाना 'धूं धूं' करीत असतां तो **दुंदेखान, नजीबखान** या रोहिल्यावर आणि **अहमदखान** पठाणा-वर एकटाच **अभिमन्यूसारखा** तुटून पडला ! त्यानें धमधम्यापर्यंत घोडदळ नेऊन तोफांच्या कानांत खिळे ठोकले व वरचेवर पडणारे **अरबांचे व दुराणींचे** वेढे फोडून पुन्हां **भाऊसाहेबाजवळ** जरिपटका आणून भिडविला ! तेव्हां दोघां-वरही **दुराणी व नजीबखान** हे १०।१२ हजार फौजेनिशीं कोसळले ! ! तेथें देखील **जनकोजीनें** 'न भूतो न भविष्यति' असा पराक्रम गाजविला. अनेक घावांनीं घायाळ झालेला हा वीर खंदलाखंदळी करीत मूर्छित झाला. रोहिल्यांनीं त्याला तशा स्थितींत उचलून नेला—पुढें या संग्रामसिंहाचा मृत्यु अत्यंत हृदय-द्रावक रीतीनें झाला रोहिल्यांनीं आपसांतील कलहानें त्याचे तुकडे तुकडे केले व ते जमिनींत पुरून टाकिले ! !

आभाळ कोसळुनि पडलें ज्या दिवशीं भाऊवरतीं
"ह्राणा ! ह्राणा !" ह्मणतांना कंठाच्या नाड्या फुगती
तोंडाला कोरड पडुनी शब्द ना उमटती पुढतीं
हातानें खुणवी मारा ?
मानेनें खुणवी मारा ?
शिंद्यांना भरला वारा !
सारिली भिंत फौजेची धन्य जननि जनकोजीची ! १

बंदुका कडाविनि यांच्या फरीवर फेरी झडती

जेजाला तोफा यांची सरबत्ती होतच होती
मारुनी मुसंडी त्यांत मोर्चावर केली गर्दी
पाणी ओतुन तोफांत
ठोकिले खिळे कानांत[1]
ठाके रणमैदानांत
द्यावया धडक जोराची धन्य जननि जनकोजीची! २

चरणारे भीमथडीचे ते तुरग पंचकल्याणी
कांहीं प्यालेले होते त्या मुळामुठांचें पाणी
इकडे तर भव्य रिसाला काबुल खोकंद दुराणी
ते पठाण खैबरघाटी
करिती बहु आटाआटी
दावुनि चपळाई मोठी
भिजवी टोकें भाल्यांचीं धन्य जननि जनकोजीची! ३

वीरांच्या पायाखालीं घोड्यांच्या टापाखालीं
धरणीगत घायाळांची उठली भेदक किंकाळी
त्या निर्वाणीच्या कालीं कोणी न कुणाचा वाली
दिसतील तयां कापावें
येतील तयां झोडावें
यावीण दुजें ना ठावें
तृप्ति करी चामुंडेची धन्य जननि जनकोजीची! ४

वय पुसाल कितिसें होतें विश्वास तरी तो मोठा!

---

१ तोफांना बत्ती देण्याचीं जीं छिद्रें त्यांत.

जयवंत 'जयाप्पा' त्याचा बापसे सवाई बेटा !
पेटोनी क्रोधाग्नीनें वैऱ्यांचा शिजवी घाटा !
कुमक ना कुणाची पाही
येईल कुणी कीं नाहीं
हिमतीनें चालुन जाई
गाळण उडवी गिलच्यांची धन्य जननि जनकोजीची ! ५

अश्वत्थामा द्रोणाचा कीं अभिमन्यू पार्थाचा
कर्णवीर सूर्याचा वा कार्तिकेय रुद्रेशाचा
मारुती मारुताचा कीं इंद्रजीत लंकेशाचा
तैसा शूराचा शूर
वैऱ्यांचें दडपित ऊर
हांकून लावि तो दूर
सेवा करि निज-राष्ट्राची धन्य जननि जनकोजीची ! ६

अरबांना चढुनी जोर गेले खवळोनि पठाण
कितिकांना धारेखालीं कंठाचें घडलें स्नान
कापितात कणसें तैशीं कापिलीं शिरें बेभान
देहाच्या लाह्या फुटल्या
पगडीच्या कंगण्या सुटल्या
घोड्यांच्या दुमच्या तुटल्या
हिंमत चढली फौजेची धन्य जननि जनकोजीची ! ७

" माझ्या अन्नाचे जे जे असतील जिवाचे प्यारे
या माझ्या जखमा बघुनी ज्यांना येतील शहारे
असतिल जरि सेवायाचीं स्वर्गाचीं उघडीं द्वारें

ते लढोत मजसह धन्य
जावोत पळोनी अन्य "
वच वदुनि असें सन्मान्य
गर्जना करी हल्लयाची ! धन्य जननि जनकोजीची ! ८

नेकजात कडवे वीर भरधाव चालुनी गेले
चहुंकडून दाटी झाली खाशाला खासे भिडले
भगव्या झेंड्याच्या खालीं योद्धे ढालाइत पडले
बेसुमार कत्तल झाली
रुधिरानें भूमी न्हाली
शिंद्यांची मूर्ति निघाली
काठी घेउन झेंड्याची धन्य जननि जनकोजीची ! ९

दाढीके रखनेवाले काबुल कंदाहरवाले
खांडेसे लढनेवाले जंगसे न हटनेवाले
सूं सूं सणणण् बाणोंकी बरसात बरसनेवाले
ऐशांचा पडला वेढा
झुंजार वीर तो गाढा
संतोषवि अमित गिधाडां
भागवी तृषा कालीची धन्य जननि जनकोजीची ! १०

किल्लयाच्या दरवाजाला मारावी धडक गजानें
पारधी चिरुन टाकावे जो मत्त वराह तयानें
वृक्षांच्या समर्दाना टक्कर द्यावी गेंड्यानें
सरकुनी जरासा मागें
तोंडानें बोलुनि 'घे ! घे'

उधळोनीं जाई वेगें
कोंडी फोडी वेढ्याची धन्य जननि जनकोजीची ! ११

बंधारा दगड विटांचा फोडावा जल–ओघानें
विदळावा तट दुर्भेद्य तोफेच्या कीं गोळ्यानें
भेदावी शैलश्रेणी देवेंद्र-तीक्ष्ण-वज्रानें
तैसा आवेशें भरुनी
सेनेचे तट पाडोनी
चापल्यें नेला निघुनी
मति गुंग होय शत्रूची धन्य जननि जनकोजीची ! १२

दोन्हीही हातीं पट्टे चढवोनी ' भाऊ ' घुसला
आदित्य प्रळयाचा हो ! दैदीप्यमान तो गमला
कापित उडवित खांडोळी गेला तो पुरता गेला
दरकेना छाती ज्याची
फिरवी न दिशा पायांची
चमके ठिणगी तेजाची
ऐशा त्या नररत्नाची धन्य जननि जनकोजीची ! १३

धूळीचे लोट उठोनी दिवसाची रजनी झाली
घनघोर गर्जना चाले तोफांची चमके बिजली
रुधिराच्या सर सर धारा वर्षोनी भूमी भिजली
मुंग्यांचें वारुळ फुटलें
तें थांबायाचें कुठलें
उठले ते धावत सुटले
तनु निश्चल धैर्यगिरीची धन्य जननि जनकोजीची ! १४



एका खड्गाग्रावरती
दक्खनची अब्रू होती
ते खड्ग जयाच्या हातीं
" त्या शिंदे–कुलदीपाची – धन्य जननि जनकोजीची "

बा. प्रेस ज.

[ म. संग्रामगीतें पृष्ठ ८० ]

पठीवर अरब पठाण पेंढारी पुढतीं पळती
दाढी शेंडीची गांठ तोडुन तुटणारी नव्हती
पुण्याइच ज्या साध्वींची तत्पति कहरांतुन सुटती
'पाणी! पाणी!' मागून
कंठाला कोरड पडुन
कितिकांचे सुटले प्राण
सोडी न बाजु शर्तीची धन्य जननि जनकोजीची! १५

राष्ट्राचा शामीयाना चौफेर तणावे तुटले
धीराचा एकच खांब वायूसह झगडुन डोले
हाँ! पडेल किंवा पडला मोठाले बसती झोले!
एका खड्गाग्रावरतीं
दख्खनची अब्रू होती
तें खड्ग जयाच्या हातीं
त्या शिंदे—कुलदीपाची धन्य जननि जनकोजीची! १६

बद्रिनाथ नारायण जो लाविले तयानें डोळे
काशी विश्वेश्वर शंभू तोही न जागचा हाले
वनदेवि अष्ट दिक्पाल कोणीही नाहीं द्रवले
सांगा नशिबाला काय
करितां येईल उपाय?
वदतां न मुखानें हाय!
पूर्ति करी कर्तव्याची धन्य जननि जनकोजीची! १७

वीत वीत जागेवरतीं जखमा झाल्या देहाला
जीवाचा होता कोण तैं पट्ट्या बांधायाला
होवोनी शक्तीपात झांपड पडली डोळ्यांला

खानानें धरितां हात
मारी झटका जोरांत
नरडीला देउन हात
शय्या केली धरणीची धन्य जननि जनकोजीची ! १८

मृत्यूच्या दरबाराचा शेवटचा साक्षीदार
मातृभूमिसाठीं सोडी नैराश्याचा हुंकार
डोळ्यांतुनि खळ खळ वाहे ती उष्णाश्रूंची धार
पाठीला दिनमणि झुकला
परक्यांना संमुख झाला
शेवटचा धीरा पडला
सोडी न मूठ खड्गाची धन्य जननि जनकोजीची ! १९

तो ग्वालेरीचा वाघ ग्लानीनें मूर्च्छित झाला
रोहिले शिकारी आले गोटांत उचलुनी नेला
नीचांनीं गृहकलहानें तो पंचीप्यारा चिरिला
हर ! हर ! केले हो तुकडे !
हृदयाचे होती तुकडे
पण वदते ऐका तिकडे
रणदेवी पानपताची 'धन्य जननि जनकोजीची!' २०

फत्तर हिमशैलेंद्राचे कारुण्यानें पाझरले
दु:खानें धवलगिरीचें मुख धूसर होउन गेलें
गौरीशंकर—नयनाचे हिमबाष्पराशि विरघळले
पावन पुरुषांची आई
जान्हवी प्रपातें गाई
जीं स्मृतिचित्रें उत्साही
त्यांतुनी नाद ये हाची 'धन्य जननि जनकोजीची!' २१

# भाऊ ! भाऊ !

" नानासाहेब ! आह्मांसारखे तुह्मांस पुत्र आहेत. व आणखीही होतील. परंतु भाऊसारखा बंधु मिळणार नाहीं. " असें विश्वासरावांनीं पानिपताहून–भाऊसाहेबांस कळूं न देतां–पुण्यास पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणें नानासाहेब स्वतः ५० हजार फौज घेऊन त्यांच्या मदतीस निघाले. पण अर्ध्या वाटेंतच त्यांस भाऊसाहेब व विश्वासराव पडून मराठ्यांचा विध्वंस झाल्याचें वर्तमान कळलें. त्यावेळीं भाऊच्या दुःखाचा त्यांस एवढा धक्का बसला कीं शेवटीं त्यांनीं पर्वतीवर " भाऊ ! भाऊ ! " ह्मणून प्राण सोडिला ! !

*　　　*　　　*

बोलतां काय हे शब्द　　' भाऊ मज सोडुनि गेला ! '
ही वार्ता कसली–कर्णीं　　ओतिलें तप्त तैलाला !
तळमळती पंचप्राण　　देहाचा भडका झाला !

शत्रुला न साहे मारा
ज्यापुढें न धरवे थारा
पळती ते सैरावैरा

ऐसा मम तुटला बाहू　　भाऊ तुज कोठें पाहूं ? ॥

करवीरीं रुसुनी जातां　　धावलों तुझ्यामागून
प्रेमाची घालुनि आण　　आणिलें तुला परतून
पुरवाया इच्छा सजलों　　हें राजपदहि सोडून

अत्यंत दिव्य ती प्रीति
तुजवरतीं माझी होती
रुसलास पुन्हां मजवरतीं

आतां पण कोठें जाऊं　　भाऊ तुज कोठें पाहूं ? ॥

गेला होता विश्वास येतासी तूं परतून
तें विष मी गिळिलें असतें माधवाकडे पाहून
ती जखम पुत्रदुःखाची भरली असती मागून
घावावरी बसला घाव
हृदयाचा घेई ठाव
आतां न सुखाचें नांव
' भाऊ , कोणाला बाहूं भाऊ तुज कोठें पाहूं ? ३

अवतार परशुरामाचा तेजस्वी ब्राह्मणवीर
कर्णासम संकटकाळीं जो स्वावलंबनीं धीर
जो युधिष्ठिरचि भासावा घनघोर संगरीं स्थीर
ऐसा तूं भाऊराया !
दैवाची वळतां छाया
त्वत्सद्गुण गेले वाया
निरहातें कैसा साहूं भाऊ तुज कोठें पाहूं ? ४

कां इतुका देहावरतीं तूं उदार झाला होता ?
कां पुण्यपुरीला तूंतें मायेचा कोणी नव्हता ?
प्रीतिचा उन्हाळा राया ! तुजला कां झाला होता ?
मम छत्र तुझ्यावरि होतें
तुज कमी काय जगिं होतें
मज कळवायाचें होतें
नसताच दिला मी जाऊं भाऊ तुज कोठें पाहूं ? ५

जरिपटकेवाले योद्धे अटकेला जाउन भिडले

शत्रूचे बसतां फटके पटकेंहि गमाउन आले !
फुटकें हें दैवचि माझें चटके हृदयाला बसले
उधडिला सिंह कोल्ह्यांनीं
काढिला पाय व्याघ्रांनीं
घेतला धाक शेळ्यांनीं
शोकाला कुठवर गाऊं ? भाऊ तुज कोठें पाहूं ? ६

उचलुनी तळी शत्रूची 'एळकोट' करुनी धावा
लढवय्या ऐसा जबरा कां हात हालवित यावा ?
मग बरा ह्मणावा 'खान' प्राणानें केली सेवा
पाहिजे तिथें जातीचें
ना काम मेंढपाळाचें
खाउनि अन्न देशाचें
आले हे नांव—गमाऊ भाऊ तुज कोठें पाहूं ? ७

घोरांत शत्रु पाडावा ते स्वतांच घोरत पडले !
मारावा मर्मी डंख ते डंखी होउन आले !
चारावी धूळ रिपूला ते धुळींत लोळत पडले !
मुकुटांतिल हीरक गळला
कंठातिल मणि हारवला
त्याला मी शोधायाला
आतां कोठें तरि जाऊं ? भाऊ तुज कोठें पाहूं ? ८

जातीचे पुरुष असोनी बायका होउनी आले !
ज्या खऱ्या बायका त्यांच्या अब्रूवर पडले घाले !

आईबापाविण मुलगे कित्येक पोरके झाले !
आप्तांच्या भेटी कुठल्या ?
प्रीतीच्या माळा तुटल्या
दोन लाख विधवा रडल्या
कां प्राशोनी विष घेऊं ? भाऊ तुज कोठें पाहूं ? ९

आगींत उडी घेतांना त्या तुमुल युद्धसमयातें
पळपुटे अशांच्या हातें त्वां निरोप दिधला मातें
' स्वर्गांत पोंचलों आह्मी पावावें ना दुःखातें ! '
मी वडील असतां मातें
सोडोनी जगतीं येथें
तुज उचितचि जाणें नव्हतें
कां स्वर्गीं उडुनी येऊं भाऊ तुज कोठें पाहूं ? १०

अप्पांच्या जवळीं बंधो ! स्वर्गीं गेला असशील
बाजीही विश्वासाला घेउन बसले असतील
तुज पाहतांच दोघांनीं मज दोष दिले असतील
संसार न झाला ज्याचा
बळि दिला अशा भावाचा
उरला न वंश काकांचा
हें शल्य कसें तरि साहूं भाऊ तुज कोठें पाहूं ? ११

दरबारीं तूं दिसशील ह्मणुनी मी तेथें जातां—
दरबार ढाळितो अश्रू मी "भाऊ ! भाऊ !" वदतां
परतुनी शयनगेहांत डोकावुनि तुजला बघतां
स्वकरीं ठेऊन कपोला

अश्रूंच्या वाही माला
त्या तुझ्या धर्मपत्नीला
कोणत्या वचें समजाऊं — भाऊ तुज कोठें पाहूं ? १२

जे सुभेदार सरदार — विसरले तुला साचार
अंगचोर विधिच्या नांवें — फोडिती खडे ते फार
विसरावें मीही तुजला — सांगतात गोष्टी चार
जे मोठे मोठे राव
दावितात अपुला भाव
त्यांनींच बुडविलें नांव
हे सारे भोजनभाऊ — भाऊ तुज कोठें पाहूं ? १३

हृदयाचे दुःखद पीळ — उकलून कुणा दावावे ?
जें कसेंसेंच मज होतें — तें कसें मुखीं बोलावें ?
बंधुप्रीतीचें वेड — वेड्यांना कसलें ठावें !
सौमित्रासाठीं हाय !
श्रीराम रडे असहाय
माकडांस त्याचें काय
[illegible] कशाला दावूं ? — भाऊ तुज कोठें पाहूं ? १४

तव वसतिक्रीडास्थानें — दुःखातें करिती जागें
हा वाडा शनिवाराचा — खायास धांवतो मागें
ही धुरा राजशकटाची — ओढाया मन ना लागे
एकान्तस्थल पाहून
पर्वतीवरी येऊन
बसलों तरि विहरक्षीण

जाईना क्लेशद आयु    भाऊ तुज कोठें पाहूं ? १५

उपवासी भाऊ गेला    गिळवे न अन्न हें उचला
तो निजला भूमीवरतीं    भूमीवर मजही घाला
तो गेला वाऱ्यावरतीं    वाऱ्यावर मजही घाला
तेजाचा उघडा लाल
घेवोनी गेला काळ
मज हवी कशाला शाल !
काळाचा पडला बाहू    भाऊ तुज कोठें पाहूं ? १६

कां बसलां शयनाभंवतीं    घालोनी खालीं माना ?
आणिले कशाला वैद्य    जाऊन भाउला आणा !
आला का माझा ' भाऊ '    अंधारी आली नयना !
एक वेळ भाऊ बोल !
बोल हा चालला खोल !
करुं नको मदाशा फोल !
ये आलिंगन वा ! देऊं    भाऊ तुज कोठें पाहूं ? १७

' भाऊ भाऊ ! ' वदतांना    देहांतुनि गेला श्वास
जीवास लागला ध्यास    पण पुरली नाहीं आस
दु:खावर बसला डाग    हळहळला सारा देश
इतिहास महाराष्ट्राचा
उज्वल बंधुप्रीतीचा
अजुनीहि पर्वतीवरचा
वाहे या शब्दें वायू    भाऊ तुज कोठें पाहूं ? १८

... ालय, ठाणे
... आ.
अ. क्र. १६४२०
... काव्य
... १५
... २१/७/५०

# महाकाळी

## (तोफ)

(चालः— चंद्रकांत राजाची कन्या.)

हिंदविजयवर्धनाची मानिनी तोफ महाकाळी :
त्वांच चढविली राज्यलक्ष्मिच्या सौभाग्यीं लाली
तुझ्या जिवावर विंध्याद्रीच्या फोडुनि कोटाला
तीक्ष्ण मराठी भाला नाचत गेला दिल्लीला
भीमथडीची टाप उसळली तुझ्या दमावरतीं
हालविली सल्तनत उधळिली तख्तावर माती
जरिपटक्याचें पुच्छ उभारुनि सह्याद्री—कुहरीं
करित गर्जना केली कितिदां शर्थ महासमरीं
रिपुसेनेचे प्रचंड जलधर गर्जत असतांना—
लाल लाल रक्ताचा पाउस वर्षत असतांना—
—तुझी गर्जना, तुझी धडाडी, तुझीच मर्दुमकी
पडती बाजू सांवरण्याला सहाय झाली कीं
पंचरसाच्या समरसाच्या तोफांचा ताफा
ठिकऱ्या केल्या नभीं उडविल्या रिपु टाकी धापा
धैर्य गळालें, धैर्यासह कर—कृपाणही गळले
गोळे सुटले तोंच त्यांसवें प्राणहि ते सुटले
निनादिनी तव निनाद जों नच ऐकाया आले
नवजय—निश्चय नवोत्साह तों पर—हृदयीं भरले

हां हां ह्मणतां धूर पसरिला नभास तूं भरिलें
दिनमणिच्या साम्राज्यांतूनी तारे नाचविले
सूर्यज्योती चंद्रज्योती यांची बरसात
न पाहिलेली दाखविली तूं तुर्की समरांत
गोळ्यांचा सोपान रचियला भूस्वर्गामाजीं
रणतीर्थी जे पावन झाले ते चढले गाझी
बार ठासला, गोळा चढला, ठिणगी जों शिवली
मृत्युलोकची तोंच मंडळी स्वर्गावर चढली
होळकरांची उजवी बाजू डावीला शिंदा
तुझ्या दमावर भिडवित गेले खांद्याला खांदा
निधडे निधडे निदानसमयीं निकराला आले
धडडूड्– धडडूड् तुझ्या निनादें धडाडिनें लढले
अष्टदिशांच्या पडद्यामागें दडलेले वैरी
त्यांवरही अनिरुद्ध झाडिल्या फेरीवर फेरी
रक्तपिपासा मुंडावलिची इच्छा जी ल्याली
त्या कालीची एकाकालीं तृप्ति तुवां केली
भैरव भूत प्रेतानंदीं वेतालादिक जे
समूह त्यांचा त्वत्कंठाच्या नादें धाउन ये
शिर गेलें शिरिं हिमालयाच्या कर सिंधूतीरीं
धड न राहिलें धड जयसंगरिं जीव सुरद्वारीं
स्वराज्य आणि स्वतंत्रतेची त्रिभुवन–मातोश्री
त्वद्भक्तीनें भोगुन गेले स्वतंत्रराज्य–श्री
भिवरावाचा प्रणाम तूतें फडक्यांचें नमन

सलाम इब्राहिमखानाचा तुजही ते मान्य

*　　　*　　　*

कुठें विजयिनी विजन काननीं वससी एकांतीं
कुरुभूमीच्या बहुश्रमाची कीं ही विश्रांती?
सर्वसाक्षि होतीस भयंकर नाशाच्या काळीं
सांग ऐकुं दे कसा उमटला दैवलेख भाळीं?
काबुलच्या खड्गावर झाली अखेरची फेंक
तो दख्खनच्या शौर्यश्रीचा अखेरचा झोंक
श्रीवर्धनच्या धैर्यमेरुचा विलास शेवटचा
तेजःपुंज कसा मणि तुटला तो पुण्यश्रीचा?
वसईच्या निश्चयवंताचा गर्भ निश्चयाचा
बुडी मारण्यापूर्वी वदला सांग काय वाचा?
निजभूपाच्या निर्वाणीच्या आज्ञा पाळाया
ग्वालेरीनें केंवि मानिली तृणापरी काया?
जरिपटक्याच्या भंवतालीचे वेढे फोडोनी
पुनःपुन्हां आणून दाविला भाऊला कोणीं?
कुणीं कुणीं आईचें केलें दुग्ध तिथें सार्थ?
काळमुखीं घातल्या सुखानें माना देशार्थ?
कडनिकडीला निर्वाणाला अंतिम—समयाला
झाडित तोडा केंवि गारदी गर्द्दून तो गेला?
'अब क्या हटना? अब है मरना? सलाम साहेबजी'
संगीनींच्या फेंकी खेळत निजला रणगाजी
मेलें सारें शौर्य मरूं दे, मरणाच्यापूर्वी—

... ग्रंथसंग्रहालय ... 20248

कसें चमकलें, तेंच ऐकुं दे, हृदयाला सुखवी
समशेरीसम नित्य कटीशीं कटि भिडउन लढला
रक्ताचा समशेरबहाद्दर कसा कुठें पडला ?
पहिल्या जोमासवेंचि गेला धुरांत तोफांच्या
अंबारींतुन " धन्य दमाजी ! " उठली ही वाचा
कडाडुनी रिपुसेनेवरतीं गायकवाडाचा—
शर्थ करोनी गर्द जाहला वीर विक्रमाचा

*　　*　　*

स्वातंत्र्याची चौंबाजूला एकमुखी आग
लागोन झटतील सर्वही आर्य महाभाग
त्यांतुन होईल शिवसंभव जैं अवतारी भक्त
गर्जाया लावील तुला अजि उपासना युक्त
ज्वलत्पर्वतीं आग धुमतसे उठेल डोंबाळा
" दीर्घतपाचें पुण्य उजाळितें भविष्यकाळाला "



# वडगांवावरचा वीर

## ( महादजी शिंदे )

पेशवाई मिळविण्याकरितां शेवटीं राघोबादादा सारख्या भारतीय महावीरानें मुंबईकर इंग्रजांचा आश्रय केला ! राघोबास बरोबर घेऊन 'जनरल स्टुअर्ट' व 'कर्नल के' हे दोन रणझुंजार आणि हिय्येबाज इंग्रज सेनापति पुण्याच्या रोखानें निघाले. दोहोंत स्टुअर्ट फाकडा हा फारच पटाईत होता. त्यानें तीनच दिवसांत खंडाळ्याच्या टेकडीवर आपलें निशाण लाविलें. कर्नल के हा पनवेलीच्या मार्गानें तोफखाना घेऊन मोठाल्या मजला मारून स्टुअर्ट यास येऊन मिळाला.

पुणें दरबारास ही वेळ मोठ्या आणिबाणीची होती. इंग्रजांचा पक्ष विजयी झाल्यास पेशवाई त्यांच्या पंजांत सापडणारी होती, अशावेळीं पुणें दरबारचे सेनापति देखील किती दक्ष व रणोत्सुक असले पाहिजेत हें कांहीं सांगायला नको. हरिपंत फडके, बर्वे, होळकर वगैरे नामांकित सरदारांनीं तळेगांवापासून बोरघाटापर्यंत मान्याच्या सर्व जागा रोखून ठेविल्या होत्या. पानशांचा विजयी तोफखाना बीनीवर होता. आणि सर्व सैन्याचें आधिपत्य ज्या वीरभूषणाकडे देण्यांत आलें होतें त्या महादजी शिंद्यांनीं तर प्रतिपक्षास पराजित करण्याची प्रतिज्ञाच केली होती.

युद्धास तोंड लागून पानशांच्या तोफखान्याचा वर्षाव, फडक्यांनीं इंग्रजी पलटणीस मारिलेली धडकी आणि बर्व्यांच्या पराक्रमाची शर्थ यांनीं इंग्रजांची दाणादाण उडत असतां स्टुअर्ट यासही इतका रणावेश चढला कीं, त्यानें जिवाची तमा न धरितां गर्दीत घुसून बेलाशक हैदोसच केला ! त्याच्या शौर्यानें आनंदित झालेल्या मराठ्यांनीं 'फाकडा' या पदवीनें त्याचा गौरव केला ! शिंदे तर लालीलाल होऊन बेफाम लढत होते. या लढाईंत स्टुअर्ट व कर्नल के हे दोन्ही सेनापति गारद झाले. मराठ्यांच्या चतुर सेनापतीनें वळसे घालून घालून शह लावून लावून इंग्रजी फौज वडगांवावर कोंडली आणि तिला शरण यावयास भाग पाडिलें !

'राघोबा' अंतीं झाला केवळ हो ! कलहज्वाला
मुंबईहुन घेउन त्याला स्टूअर्ट फाकडा आला
बोरघाट घाळुनि मार्गें खंडाळ्यावर तो चढला
'कां अमुच्या गृहकलहांत
हा शत्रु घालतो हात?
चावून खालचा ओठ
ये महादजी रणधीर वडगांवावरचा वीर १

"खंडाळ्यावर खांडोळी शत्रूची उडवायाची !
शिंद्यांच्या कुलकीर्तीची अजि नौबत झडवायाची !
विजयलक्ष्मि बाहूवरतीं बसवोनी आणायाची"
घेउनी प्रतिज्ञा शिंदा
युद्धीं लढवय्या खंदा
देशाचा चाकर बंदा
उपसून निघे समशेर वडगांवावरचा वीर २

तळ दिला तळेगांवाला रोखिलें बोरघाटाला
निवडोनी एकेकाला साबितजंग सरदाराला
मान्याच्या जागीं ठेवी कोंडाया रिपु-सिंहाला
बीनीच्या सरदारांचा
भिवराव पानसे यांचा
ताफा चमके तोफांचा
ठाकला तिथें झुंजार वडगांवावरचा वीर ३

श्रीमंत पेशवे त्यांच्या गादीच्या पुण्याईची—

बुद्धीचे सागर नाना त्यांच्या समयज्ञपणाची–
जे समरधुरंधर शिंदे त्यांच्या भुजसामर्थ्याची–
ती खरी परिक्षा वेळ
शूरांचा जमला मेळ
झाला एकच कल्लोळ
बिजलीची चमके कोर वडगांवावरचा वीर ४

होत्या त्या सातच तोफा चतुर मात्र गोलंदाज
एकेका गोळ्यासरसी शत्रूचा जिरवी माज
संग्रामीं जयमरणाची रिपुनेंहि लाविली पैज
घोड्याची उडवित नाल
वाढवीत पुढची चाल
कापीत शत्रुचा नाळ
चौफेर घालतो घेर वडगांवावरचा वीर ५

निर्झरवारी-धर अचल मदधारा-धर कीं दंती
शोभावा किंवा जैसा उत्फुल्ल पलाश वसंतीं
कीं पयोद वर्षाकारी जास्वंद तरूची पंक्ती
आरक्त असा झालेला
घेऊन करीं झेंडयाला
हैदोस कराया सजला
सोडीना जय–निर्धार वडगांवावरचा वीर ६

दंगल करण्याला आला संगीन खोउनी वैरी
आगीचा होउन मारा फेरीवर झडल्या फैरी

रक्तानें ओलीं झालीं भाल्यांचीं टोकें सारीं
हुकुमासरसी वेगानें
वडगांवाच्या रोखानें
वळवी रिपु जैं निजसैन्यें
गैब्रीचा देई मार वडगांवावरचा वीर ७

कितिकांचे तुटले हात कितिकांचे तुटले पाय
किति शिरें तनूविण पडलीं किति शिरोविहीनहि काय
किति याचिति जल घायाळ जेथल्या तिथें निरुपाय
शूराला लागे चुरस
तोंडाला आली खरस
उत्तेजित करि सैन्यास
घेईना परि माघार वडगांवावरचा वीर ८

जयवंत ‘ जयाप्पा ’ शिंदे नागोरावरचा वीर
यमुनेच्या घाटावरचा ‘ दत्ताजी ’ शिंदे शूर
योद्धा कुरुभूमीवरचा ‘ जनकोजी ’ संगरधीर
त्या दिवशीं आकाशांत
देवांच्या समुदायांत
डोलत होते मोदांत
वंशज विजयी ठरणार वडगांवावरचा वीर ९

आकाशांतोनी पडती त्यावरी सुमांच्या माला
कडनिकडीच्या समयाला चपल हस्त गुंते त्यांला
जणुं देई लतिकांजवळीं तो माला ठेवायाला



'महादजी शिंदे'

"उचलोनी टोपी हातें - करि सलाम टोपीवाला"

बा. प्रेस जळगांव

[म. संग्रामगीतें पृष्ठ १०७]

अमरलोक आकाशांत
शार्दूल गुहाद्वारांत
विस्मित होते पाहात
नरसिंहाचा अवतार वडगांवावरचा वीर १०

फडक्यांनीं धडकी सरसी फोडिली फळी शत्रूची
बरव्यांनीं बरवी धरली दोन्ही बाजूंनीं कैची
पानसे सारखा वर्षे बरसात तोफखान्याची
'स्टूअर्ट' जाहला ठार
'कर्नल के' निजला वीर
सेनेचा सुटला धीर
तैं करी गर्जना थोर वडगांवावरचा वीर ११

पांढरा बावटा बोले 'थांबवा कतलबाजीला'!
उचलोनी टोपी हातें करि सलाम टोपीवाला!
खड्गानें घे नमनाला ग्वालेरी पगडीवाला!!
इतिहास स्वकरीं घेतां
वडगांवाला पाहातां
हा रिपुमित्रांच्या चित्ता
देतो स्मृति वारंवार वडगांवावरचा वीर १२



# बेलाग बदामी कोट !

टिपूनें वचनभंग करून पेशव्यांशीं झालेला तह मोडला व इतरही अनेक दुष्टकृत्यें केलीं, त्यांची वार्ता कळतांच पुणें दरबार खवळून गेला. परशुराम भाऊ पटवर्धन, हरिपंत तात्या फडके, शिंदे, होळकर, यांच्या फौजा टिपूवर रवाना झाल्या. त्यांनीं एकदम जाऊन टिपूच्या प्रख्यात बदामी किल्ल्यास वेढा घातला. या विस्तृत किल्ल्याच्या भोंवती मजबूत तट बांधिलेला आहे. पटवर्धन व फडके यांनीं प्रथम तोफांचा धडाका सुरू केला. शिंदे व होळकर हेही एक दिलाची फेर झाडूं लागले. २० दि० सारखी झटापट चालली तरी बदामीचा तट दाद देईना शेवटीं मराठ्यांनीं तटाला शिड्या लाविल्या ! तों किल्ल्यांतून ३५००० लोकांची मांड येऊन कोसळली व तिनें पेशव्यांच्या सैन्याची राळ मांडली ! त्या अप्रतिष्ठिनें भाऊ व तात्या खदिरांगासारखे लाल झाले. त्यांनीं एकच गर्जना केली. सैनिकांपुढें टिपूचीं पापें वर्णिली आणि चोहींकडून हूल करून किल्ल्यावरच्या माऱ्यास न जुमानतां तटावर पंत प्रतिनिधींचा विजयध्वज फडकाविला !

* * *

मैत्रीचीं निश्चित वचनें तीं भ्रष्ट टिपूनें केली !
गर्जना पुण्याला झाली म्हैसुरास ऐकूं गेली !
पेशवे प्रभूची भ्रुकुटी सक्रोध टिपूवर चढली

पटवर्धन फडके यांचीं
शिंद्यांची होळकरांचीं
कवचें चढलीं युद्धाचीं

वेढिला जाउनी नीट बेलाग बदामी कोट १

फडक्यांच्या मोर्चातूनी जो धडड्ड् बार उडाले !
भाऊंच्या मोर्चातूनी तों कडकड नाद जहाले !

दोषांचे गोलंदाज तट चूर्ण कराया सजले !

ती अखंड वृष्टी चाले
आकाश धूम्रमय झाले
तरि अभेद्य तट ना हाले

चावती मराठे ओठ 'बेलाग बदामी कोट' २

उडविले सुरुंग अनेक एक ही बुरुज ना हाले !
जागोजागीं फुटलेले तोफांचे दिसती गोळे !
त्या अभेद्यतेनें तेथें हतबुद्ध शक्तिला केलें !

माळा संतत विजयाच्या
शोभाव्या कंठीं ज्यांच्या
चिंता चित्तांत तयांच्या

शिरके न कुठेंही वोट बेलाग बदामी कोट ३

तट जैसा होता अढळ तन्निश्चय तैसा अढळ
उचलती विडे पैजेचे ते स्वराज्य–सेनाप्रबळ
दृढनिश्चय साहस एकी त्रिगुणांचा झाला मेळ

निर्वाणीच्या युद्धाला
प्रत्येक मराठा सजला
रणवाद्यांचा ध्वनि झाला

वीरांचे यत्न अलोट बेलाग बदामी कोट ४

रणकुंजर जे जे होते मारिल्या तयांनीं थडका !
बुरुजावरच्या तोफांनीं आगीचा केला भडका !
शूरांच्या शीर्षीं उठल्या निष्फल यत्नांच्या तिडका !

लागल्या शिड्या कोटाला
गिल्ला किल्ल्यांत जहाला

तट धारकऱ्यांनीं फुलला
सुचवी दारूचा लोट    बेलाग बदामी कोट ५

गडकरी नेक जातीचे    तरवारी परजुन आले
मृत्युच्या मुखीं युद्धाचें    क्रीडांगण त्यांनीं केलें
चढणारे हिंमतवाज    बावट्यासवें धडपडले
श्रीमंत प्रतिनिधी सेना
चालली तिची जी दैना
ती नेत्रांनीं बघवेना
हृदयाचा करितो स्फोट    बेलाग बदामी कोट ६

शिंद्यासम खंदे वीर    फडक्यासम धडकीवाले !
पटवर्धनकुलमणि 'भाऊ'    युद्धाचे बीनीवाले !
रण-धुरंधराच्या नेत्रीं    शौर्याचें पाणी चढलें !
पापें वर्णून टिपूचीं
मोडाया खोड रिपूची
झुल्लड केली हल्ल्याची
खवळला मराठी गोट    बेलाग बदामी कोट ७

शिंद्यांची होळकरांची    चालली तटावर फैर !
पटवर्धन फडके यांनीं    चढतीचा केला जोर !
लाविलें निशाण तटाला    तेव्हां झाली घेमार !
तेथें ज्यांनीं धैर्याचें
दाविलें तेज शौर्याचें
निश्चयी शूर वीरांचे
गातो अजुनीही पाट    बेलाग बदामी कोट ८



बदामी किल्ल्याच्या कोटावरील लढाई

लाविलें निशाण तटाला -- तेव्हां झाली घे--मार !"

बा प्रेस ज.

[म. संग्रामगीत पृष्ठ ११०]

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे
... क्रमांक ९८७५० ...
... ३१८ ...
... ९.८ ...
नों. दि. ...२७.१.२१.५८...

# शूराच्या उदरीं शूर !

म्हैसूरच्या दुसऱ्या युद्धांत हरिपंत फडके व लॉर्ड कॉर्नवालिस यांनीं टिपूच्या राजधानीस वेढा घालून तेथें त्यास कोंडिलें. परशुरामभाऊ पटवर्धन व क. लिटल हे टिपूची पिछाडी सर करीत चालले. या युद्धांत भाऊबरोबर त्यांचे पुत्र आप्पासाहेब हेही होते. चित्रदुर्ग, बेदनूर काबीज करून ते तिघेही तुंगभद्रेपार झाले. व त्यांनीं शिमोगा किल्ल्यास वेढा घातला इतक्यांत 'सय्यद रेझा' जवळच्या दाट झाडींत टपून बसला आहे, असें कळतांच भाऊंनीं आप्पास तिकडे पाठविलें व सोबत लिटल यांस मदतीस दिलें. त्या घनकुंजांत रेझाशीं लढतां लढतां आप्पासाहेब कोंडले गेले. इतक्यांत शिमोग्यावर बावटा रोवून भाऊ परत आले ते अशा संकटांत पडलेल्या पुत्राच्या साहाय्यार्थ धांवतील असें सर्वांना वाटलें. परंतु भाऊंनीं सांगितलें, "आजचें युद्ध आप्पाचें ! त्याजवर सोंपविलेली कामगिरी त्यानें पार पाडलीच पाहिजे ! तो शूराच्या उदरीं उत्पन्न झाला आहे !" असें म्हणून ते समोरच्या टेकडीवरून पुत्रशौर्य अवलोकन करूं लागले ! बाप आपली परीक्षा घेत आहे, हें पाहतांच आप्पा साहेब फारच शौर्यानें लढले. त्यांनीं रेझास मागें हटवून "शूराच्या उदरीं शूर" हें वाक्य सार्थ केलें !

*　　*　　*

बलवान टिपू सुलतान　　माजला जणों सैतान
इंग्रजी मराठी वीर　　जमले जयमंत्र जपून
परशुराम भाऊसंगें　　चमकती 'लिटल' संगीन
भाऊंचा वीर कुमार
बांधून नवी तरवार
चालला बाल सरदार
लोकोद्धाराचा पूर　　'शूराच्या उदरीं शूर !'　　१

ते विचित्र बलधैर्याचे चित्रदुर्ग भेदुन गेले
बेदनूरचे गढ कोट बदनूर तयांनीं केले
'होळिनोरच्या' किल्ल्याचे बनले मग होळिवाले
तुंगेंत धुवोनी अंग
शिमुग्यांत उडविती रंग
वृद्धास तरुण करि दंग
पसरे नव-वार्ता दूर 'शूराच्या उदरीं शूर!' २

'सय्यद रेझा' सरदार जो टिपुचा विजयाधार
त्रिकुटाची भव्य शिकार साधाया टपला फार
पारधी लपे घन विपिनीं जीवावर सिंह उदार
'हूं' ह्मणतां छावा धांवे
'लिटल' ही त्यासवें धांवे
नव शौर्याचे देखावे
पाहून वदति रणधीर 'शूराच्या उदरीं शूर'! ३

नंग्या समशेरी संगें संगिनिची फेक जहाली!
बाणांच्या वृष्टीसंगें बंदुकिची फैर उडाली!
रक्तानें लाल जहाल्या कुंजाकुंजांतिल वेली
कळकाच्या निबिडवनांत
तो पटवर्धन-कुलवंत
अडके जरि तरि यशवंत
उडवी रिपुमनिं काहूर 'शूराच्या उदरीं शूर!' ४

चुरसीची भाला-फेंक चुरसीची संगिन-फेंक



'आप्पासाहेब पटवर्धन' व 'सय्यद रेझा'

बा प्रेस ज. "झाडींत झटापट चाले -- तरवार खटाखट बोले!" [म. संग्रामगीतें पृष्ठ १ ३]

सरसीचा दिसतां झोंक धडसी चाले बिनधोक !
पडतील घेइ न एक लढती लढवय्ये लोक !
'धुतुतू' गर्जे रणशिंग
हुतुतूला चढला रंग
तो कुमार त्यांतच दंग
'लिटल' ही शिपाई शूर 'शूराच्या उदरीं शूर !' ५


झाडींत झटापट चाले तरवार खटाखट बोले !
किति वीर पटापट मेले किति हटातटाला भिडले !
शिमुग्यावर रोवुन झेंडा परशुराम भाऊ आले !
सरसाउन विजयी बाहू
धावेल जनक हा 'भाऊ'
कल्पना लागल्या धावूं
तो अचल वदे गंभीर 'शूराच्या उदरीं शूर' ! ६

'जर असेल शूर कुमार दावील शौर्य शत्रूला
जो पटवर्धन वंशाचा तो याची ना साह्याला
आजचें युद्ध आप्पाचें तो जागो कर्तव्याला'
प्रत्यक्ष पोटचा गोळा
एकला कोंडला गेला
परि पिता न तो डळमळला
विश्वास किती हा थोर 'शूराच्या उदरीं शूर !' ७

पाहतो परीक्षा तात हें कळलें जैं पुत्राला
त्वेषाचा उत्साहाचा संचार अधिकची झाला

सळसळणाऱ्या रक्ताला उसळीसरसी कढ आला
शत्रूवर करुनी मात
फिरला नौबत ठोकीत
वीरांच्या विजय--सुरांत
जयवाद्यांचेही सूर 'शूराच्या उदरीं शूर !' ८

कर्तव्यपाठ युद्धांत जनक देत होते येथें
स्वावलंबनाचे पाठ शिकविती कठिण समयातें
रणशाळेचे विद्यार्थी चढविती देश भाग्यातें
तल्लीन तद्गुणीं व्हावें
रोमांचित होउनि गावें
पूर्व स्थितीला चिंतावें
हें वाक्य स्फुरवी ऊर 'शूराच्या उदरीं शूर !' ९



# हें शील नव्हे मर्दांचें !

इ. स. १७७० सालीं हैदरावर माधवराव पेशव्यांची जी स्वारी झाली तींत परशुराम भाऊ पटवर्धनांनीं हैदरास अगदीं जर्जर करून सोडिलें. प्रत्येक युद्धांत भाऊंच्या तरवारीला भिऊनच त्यानें तह करावे व मोडावे असें चाललें होतें. यावेळीं पटवर्धनाचा चांगलाच सूड घ्यावा म्हणून हैदरानें १२ ह. गारदी, ४ ह. स्वार व २५ तोफा अशा तयारीनें कडलुराहून बुद्धिविहाळाची मजल मारिली व रात्रीं अकस्मात् भाऊवर छापा घातला. हैदरानें एकदम तोफा डागल्या व बाणांची वृष्टी सुरू केली. भाऊच्या लष्करांत भयसूचक नौबत वाजूं लागली ती ऐकतांच तो नरवीर एकदम जागा झाला व नौबती जवळ आला. आपल्या लोकांस धीर देऊन भाऊनें तो अग्निप्रळय धैर्यानें सहन केला. नौबतीच्या आवाजाचा रोंख धरूनच हैदरानें भडिमार चालविला होता. भाऊच्या मांडीखालील २ घोडे गोळे लागून मेले. स्वतः त्यासही गोळा लागून अंग भाजलें. त्यांच्या बंधूस गोळा लागून ते होरपळले. शेकडो नव्हे हजारो सैनिकांचीं प्रेतें पडलीं. हत्ती, घोडे, तंबू डेरे जळून खाक झाले. तथापि त्या धीरोदात्त पुरुषाची हिंमत हरली नाहीं व तो नौबती जवळून बालाग्र डगमगला नाहीं. तो सकाळपर्यंत त्या तोफांच्या आणि बाणांच्या भडिमारांत सिंहनाद करीत राहिला. सकाळीं भाऊनें काळाच्या जबड्यांत उडी टाकावी तसा प्रकार केला ! हैदराच्या अघाडीवर जोराचा हल्ला चढवून तिसरे प्रहरपर्यंत पाण्याच्या घोटाऐवजीं या नरसिंहानें शत्रूच्या रक्ताचेच घोट घेतले ! ! शेवटीं हैदरअल्ली जिवानिशीं पळून गेला !

*　　　*　　　*

जातीचा खुनशी सर्प　　हैसुरचा हैदरअल्ली
भाऊवर छापा घाली　　तो मध्यरात्रिच्या कालीं
प्राणदान दिधले त्याची　　दुष्कृती फळाला आली
रजनी ती घोरत होती
कल्पना तियेला नव्हती

काळोख्या ऐशा रात्रीं
झोंपेंत वार करण्याचें हें शील नव्हे मर्दांचें १

जागृतिचे होते मित्र लष्करी गस्तवाले ते
निजकंठीं घोषत होते अलबेलीच्या शद्वातें
घोड्यांच्या टापांचेहीं मधुनी ध्वनि उमटत होते
मर्दुमकी निजली होती
कल्पना तियेला नव्हती
क्रूरता करी सरबत्ती
तिमिरांत घात करण्याचें हें शील नव्हे मर्दांचें २

धडकल्या भयंकर तोफा भडकली आग गोटांत
भयसूचक नौबत वाजे लष्करच्या बाजारांत
'गनिमाचा छापा आला!' धांदल ती मग सर्वत्र
पोषाख घालतो कोणी
शस्त्रास शोधितो कोणी
उठतांना पडतो कोणी
आकस्मिक नख देण्याचें हें शील नव्हे मर्दांचें ३

तंबूंतुन जेव्हां भाऊ उफळोनी बाहिर आला
मुरहंतक जो श्रीविष्णु अवतार तयाचा गमला
सेनेचा नौबतवाला नौबतीपुढें तो ठेला
सांग्रामिक वीरमण्यांचा
धैर्यध्वज धीरधरांचा
जमवि तो गोट फौजेचा

असहाय त्यांशिं लढायाचें हें शील नव्हे मर्दांचें ४

नौबतिच्या आक्रोशाचा साधला रिपूनें नेम
नामांकित शौर्यकुलाचा एकेक जळाला कोंब
भाऊस सोडुनी मागें पाहती किती स्वधाम
दुःखाचे आंतुन गोळे
तोफांचे वरुनी गोळे
धैर्यसिंह तरिही बोले
"संकटीं पळुन जायाचें हें शील नव्हे मर्दांचें" ५

आरंभीं कवि साहतसे भडिमार मूर्ख वक्तयाचा
पंचाक्षरि किंवा साहे उत्पातहि वेतालाचा
तैसा तो मारा साहे रणधीर वीरवृत्तीचा
बंधूस लागला गोळा
निजदेह भाजला गेला
शत्रूच्या निर्घृणतेला
श्वासाच्या वदला वाचे हें शील नव्हे मर्दांचें ६

गोळ्यांच्या वृष्टीसंगें बाणांची वृष्टी झाली
मर्मच्छेदी तनु पडल्या विच्छिन्न तनूंच्या खालीं
व्याकुलता विव्हलतेच्या कंठांत पडोनी रडली
बाहेर पेटली होळी
देहांत पेटली होळी
वदला रण--विक्रमशाली
मरणास अतां भ्यायाचें हें शील नव्हे मर्दांचें ७

भ्यालेली रजनी सरली हैदरच्या त्या पापानें
काळाच्या जबड्यामाजी टाकिली उडी भाऊनें
दैवाची चिरिली मान विजयी निज खड्गाग्रानें
'घे घे' बोलोनी सरला
छबिन्यावर जाउन पडला
कापला रिसाला पहिला
निष्प्रभ रणिं परतायाचें हें शील नव्हे मर्दाचें ८

रवि चढे अंबरीं जैसा रणिं चढे वीर तो तैसा
रवि तप्त भासला जैसा हा तप्त भासला तैसा
रवि ढळला माध्याहूनी रणिं वीर न ढळला सहसा
मृत्यूचा सोडुन कांठ
रिपुनेंच फिरविली पाठ
भाऊही वळवी गोट
विन्मुखासवें पळण्याचें हें शील नव्हे मर्दाचें ९

"येथेंच झोंपला होता घेऊन उशाला ढाल
येथून धावला भाऊ शौर्याचे बोलत बोल"
अजुनीही जन वदताती रणवार्ता हृदय-विलोल
स्मृतिगीत युद्धभूमीचें
संतत जें पवनीं नाचे
हैदरच्या दुष्कीर्तीचे
ध्वनि त्यांत उमटती साचे 'हें शील नव्हे मर्दाचें!' १०

---

# पटवर्धन कुलभाण भाऊ !

परशुराम भाऊ पटवर्धन धीर देत असतांही नाना फडणीस हे शिंद्यांचे दिवाण बाळोबा तात्या कुंजर यांच्या भीतीनें पुणें सोडून गेले ! तेव्हां भाऊंनीं कुंजरास आपलासा करून नानांच्या संकेताप्रमाणें चिमाजी माधवाचें दत्तविधान करवून त्यांस पेशवा केलें. पण इकडे नानांनीं पुन्हा निराळेंच कारस्थान रचून बाजिरावास पेशवा करण्याचें ठरविलें आणि मश्रुउल्मुल्काची ५० हजार फौज नारोपंत चक्रदेवाच्या हाताखालीं देऊन, भाऊ व चिमाजीमाधव यांस कैद करण्याकरितां त्यांना पुण्यास पाठवून दिलें !

कांहींच आगापिच्छा नसतां सकाळच्या वेळीं पुणें शहरांत ' दीन दीन ' शद्बांचा भयानक ध्वनि उमटला व शनिवारवाड्यास मोगलसैन्याचा गराडा पडला ! अशा भयानक प्रसंगीं या गर्द ब्राह्मणवीरानें तातडीनें लष्करी पोषाख घातला, दोन्ही हातांत पट्टे चढविले आणि एका खंद्या घोड्यावर त्या बाल स्वामीस आपल्यापुढें घेऊन पट्ट्यांची गर्र गर्र फेक करीत तो एकदम वाड्याबाहेर उसळला आणि शत्रूच्या छातीवर पाय देऊन त्यांच्या डोळ्यादेखत भरधाव घोडा फेकीत निघून गेला ! !

बुधवारांतून शुक्रवारांतून पर्वतीच्या मार्गानें शिवनेरीकडे हा स्वामिनिष्ठ सरदार वेगानें जात होता व मागून नारोपंत चक्रदेव, आप्पा बळवंत दांत ओठ खाऊन २५ हजार फौजेनिशीं पाठलाग करीत होते. शेवटीं भाऊनें शिवनेरीचा किल्ला गांठला व त्यांत आपल्या स्वामीस सुरक्षित ठेऊन तो किल्ल्याच्या दरवाजाशीं जीवावर उदार होऊन शत्रूशीं पट्ट्याचे हात खेळावयास उभा राहिला !

* * *

काढून चिमाजी राजा वसवावा बाजीराव
परशुराम भाऊ वरतीं नानांचा चढला डाव
लेखणी आणि तरवार दोघींत वैर दुर्भाव
सेनानी नारोपंत

उत्मुल्काच्या समवेत–
आले, ही कळतां मात
उठला तो धीर लढाऊ पटवर्धन कुलमणि भाऊ १

पूर्वेच्या कंठामाजी चमकलें रत्न तेजाचें
वृक्षांच्या घरट्यांमधुनी ध्वनि उठले जों काव्यांचे
तों पुण्यपुरीच्या कानीं ध्वनि 'दीन दीन ' हा नाचे !
पेशवे प्रभूचा वाडा
त्या भंवतीं पडला वेढा
नाचला नवाबी घोडा
सरसाउन आला बाहू पटवर्धन कुलमणि भाऊ २

आनंद विलसला, तेथें चिंतेचे पडदे सुटले !
उल्हास नांदला तेथें काहूर भयाचें उठलें !
शौर्य धैर्य या दोघांच्या तोंडाचें पाणी गेलें !
श्रीमंत चिमाजी बाळ
फिरतां त्या वरतीं काळ
देहाची करुनी ढाल
रक्तानें सजला न्हाऊं पटवर्धन कुलमणि भाऊ ३

चिलखत तें शरिरीं चढलें मंदील फडकला शीर्षीं
कमरेस शोभला शेला लटकली ढाल पाठीशीं
वीराचे फुरफुरणारे लगटले हात पट्ट्याशीं !
त्या बालनृपाला पुढतीं
घेवोनी अश्वावरतीं



‘ परशुरामभाऊ पटवर्धन ’

दा. प्रेम ज.　“ गरगर पट्ट्याचे हात — फिरवीत चालला वीर ! ”　[ म. संग्रामगीतें पृष्ठ १२१ ]

शौर्य धैर्य यांची मूर्ती
काळावर धजला धावूं  पटवर्धन कुलमणि भाऊ ४

टांचेसह उधळे घोडा  चमकली वीज पट्ट्यांची !
भेदिली फळी शत्रूची  चालली दौड वेगाची !
स्तिमिताच्या काळीं सिद्धी  वीराच्या चपल कलेची !
तो अरुण बालभानूचा
हनुमान रामरायाचा
कीं गरुड कृष्णमूर्तीचा
भेदीत चालला वायू  पटवर्धन कुलमणि भाऊ ५

सत्कविची प्रतिभा जैशी  उड्डाण अंबरीं घेई
किंवा दारूचा बाण  आकाश मंडलीं जाई
तैसा तो निधडा वीर  महि सोडुन वर वर जाई !
चंचलतेच्या तीरास
अचलता करी तैं वास
शस्त्रें बघतीं वीरास
गेला तों मांड—भिडाऊ  पटवर्धन कुलमणि भाऊ ६

गर गर पट्ट्याचे हात  फिरवीत चालला वीर !
शूराला अडवायाला  एकास न झाला धीर !
अर्धलाख शिरगणतीचे  ते मोंगल बनले पीर !
दोन्ही बाजूला कडपे
त्यांतून सिंधुनद तळपे
वळसे घेवोनी लोपे

कुणि शकला पूर्ण न पाहूं   पटवर्धन कुलमणि भाऊ   ७

जमलेल्या दुस्मानांच्या   छातीवर देउन पाय
राक्षसी महत्वाकांक्षा   तद्हृदयीं लावुन 'हाय!'
झोत तो स्वामिनिष्ठेचा   नेत्रांना दिपउन जाय!

क्षणिं दिसला बुधवारांत
क्षणिं दिसे शुक्रवारांत
धावे हुलकावणि देत

संकट काळाचा भाऊ   पटवर्धन कुलमणि भाऊ   ८

शिवनेरीच्या मार्गानें   चालला सिंह उफळून
लागले शिकारी मागें   करकरा दांत खाऊन
स्वारांची शर्यत चाले   धूळीच्या पटलांतून

शिवनेरी दुर्गामाजीं
ठेवून धन्याला गाजी
दुर्गाच्या द्वारामाजीं

ठाकला उभारुन बाहू   पटवर्धन कुलमणि भाऊ   ९



# फिरविशी कसा जरिपटका ?

खर्ड्यांच्या युद्धांत हरिपंत तात्या फडके यांचे चिरंजीव बाबुराव फडके हे जरिपटका घेऊन आघाडीवर होते. बाबुराव संग्रामांत नवखे असल्यामुळें ऐन गर्दींत त्यांचा दम सुटून ते जरिपटक्यासुद्धां पळूं लागले ! तेव्हां शिंद्यांचे सेनाध्यक्ष जिवबादादा बक्षी हे घोडा पिटाळीत त्यांच्या जवळ आले, आणि त्यांचा धिक्कार करून ह्मणाले--" अरे भ्याडा ! फडक्यांच्या कुळाला आज काय काळोखी आणतोस ही ?... असा भागुबाईपणा दाखवून पेशव्यांच्या सर्व फौजेला निर्वीर्य नि:शक्त आणि नाउमेद करणार काय ?... शत्रूच्यापुढें उभें रहावत नसेल, तर न पळतां शिंद्यांच्या लष्करामागें स्वस्थपणें निर्भय रहा. " हें बोलणें ऐकतांच बाबुरावांना वडिलांच्या शौर्याचें स्मरण होऊन ते पुढें सरले व त्यांनीं निशाणाचा धुव्वा उडविला. अवाडीहून फडक्यांचा सांडणीस्वार श्रीमंताकडे डाक घेऊन आला. त्यांत खुद्द बाबुरावांनीं लिहिलें होतें:-" नबाब कोसभर मागें हटला, आह्मी आंगावर मारीत चाललों आहों ! "

*   *   *

खर्ड्यांच्या मैदानांत दंगल रंगाला आली !
शिंद्यांची वीस हजार जोरांत कडाबिन फुटली !
भोसले सुभे जे त्यांनीं बाणांची झिम्मड केली !

आगही नबाबी धडके
जरिपटका घेउन फडके
फिरले, तों जिवबा भडके

" कीर्तीस लाविशी चटका फिरविशी कसा जरिपटका ? १

अस्तन्या सारुनी ज्यानें गोऱ्यांस सारिले मागें !
राघोबा 'तोबा ! तोबा !' करुनी ज्यापुढतीं भागे !
बेलाग बदामी कोट सर करी शिड्यांच्या योगें !

त्या तात्यांचाच कुमार
वीनीवरचा सरदार
खड्यांवर खाउन मार

लौकिक ठरवीशी लटका फिरविशी कसा जरिपटका? २

हैदराबाद—दरबारीं मस्करी पुण्याची झाली!
काळ्यांनीं कानावरची लेखणी ठेविली खालीं!
'काढीन धिंड वजिराची' तेथेंच प्रतिज्ञा केली
तो बोल किती बिनमोल
राष्ट्राचा केवळ तोल
पळपुट्या! गमे तुज फोल

ही निर्धाराची घटिका फिरविशी कसा जरिपटका? ३

'फडके' या नांवामागें किति पराक्रमाचें तेज!
'फडके' या नांवामागें किति निर्धाराचें ओज!
त्या नामोच्चारें कांपे चळचळ रिपुचें काळीज
निर्वीर्य आणि निस्तेज
करितोस नांव तें आज
वाटते अह्मांसहि लाज

तूं गळ्यांतला मणि फुटला फिरविशी कसा जरिपटका? ४

किति झाला मृत्युप्रळय त्या पानिपताच्या समरीं!
किति झुंजारांच्या पडल्या जरिपटक्याखालीं हारी!
निग्रही भाउही याला घेऊन नाचला निकरीं
हें वस्त्र नव्हे व्यक्तीचें
राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें

हें निशाण बहुमानाचें

हा बहुमानाला झटका फिरविशी कसा जरिपटका ? ५

हरिणाचें काळिज तुझिया काळजांत शिरलें काय ?
शिंद्यांच्या गोटामागें संरक्षीं अपुला काय
आकाश तोलितों आह्मी येथें रोवोनी पाय
जरिपटका फिरला फिरला
फडक्यांचा पुत्र पळाला
आपणासवें सकलांला
पाजिशीं विषाचा घुटका फिरविशी कसा जरिपटका ? ६

बघ, हौदा खालीं झाला 'लालखान' खासा पडला !
मुर्दावर दुसरा मुर्दा 'वजिरखान' याचा पडला ?
'असगूलखान' बेदील हिंमत हारोनी हटला
भाऊंच्या बाहुबळाला
बघ बहार कैसा आला
सोडून अतां बाजूला
उधळिशी तूंच जयपट कां ? फिरविशी कसा जरिपटका ? ७

* * *

कुणि वदो 'मोहरा वळला' वळवाचा पाउस वळला !
कुणि ह्मणो 'बहादर' फिरला वायूचा भंवरा फिरला !
आकाशपथावर गेला, परसैन्याचा पाचोळा !
रणविन्मुख होय निझाम
तह करी, करून सलाम
गाजलें शूरकुल—नाम
फडक्यांच्या गुरुचा फटका फिरविशी कसा जरिपटका ? ८

# हळदी घाटाचें युद्ध !



अंबेरचा राजा मानसिंग हा अकबराचा मामा होता. मानसिंग एका प्रसंगीं महाराणा प्रतापसिंह याच्या राज्यांतून जात असतां राण्यानें त्याचें आदरातिथ्य करून त्यास मेजवानी दिली. पण तो स्वतः त्याजबरोबर जेवला नाहीं. मानसिंगास राग येऊन तो जातांना ह्मणाला, ' मी नांवाचा मान असेन, तर तुह्मी मान लववीन ' पुढें तो अफाट मोंगल फौज घेऊन अकबराचा मुलगा सेलीम यासह राणा प्रतापावर चालून आला. दोन्ही सैन्याची गांठ हळदीघाटावर पडून तेथें घनघोर युद्ध झालें. राण्याच्या चैतकानें सेलिमाच्या हत्तीच्या गंडस्थळावर टापा रोविल्या ! तितक्यांत चपळाई करून राण्यानें सेलिमावर भाला फेकला. पण तो अंबारीच्या लोखंडी कठड्यास लागून मोडला. त्यामुळें तर चिडलेल्या मोंगल सरदारांनीं राण्याच्या डोक्यावर विराजत असलेल्या सुवर्णछत्राची खूण लक्षांत घेऊन त्याजवर तीन वेळां भयंकर गर्दी केली ! या गर्दींत राण्याकरितां प्रथम ' तुवर ' वंशानें मान दिली. नंतर ' झाला ' वंशाच्या राजनिष्ठेची पराकाष्ठा झाली. राण्याकरितां त्या वंशाचे १२५ वीरपुरुष एकामागून एक कटून

मेले. ! ! चोंडावत व सुक्तावत शाखेचे असंख्य बळी पडले. शेवटीं चेतकास टांच मारून चेतकाचा धनी उडून गेला.

*   *   *

' मी नांवाचा जरि मान    लववीन तुझी तरि मान ! '
मानसिंह अपमानानें    बुझवूं पाहे अपमान !
दिल्लीशाचें धनु सज्ज    हा सर्प होय तद्बाण !
तो ' प्रताप ' धर्मत्राता
शौर्यांत पार्थ जणुं होता
' जय एकलिंगजी ! ' वदतां
माजे भारत–प्रसिद्ध    हळदी घाटाचें युद्ध    १

चैत्राचे वायू–लोट    आकाश–मंडपीं फिरतां
कीं आषाढाचे मेघ    शिखरा शिखरावर वळती
तैसे मोंगल–रजपूत    हळदी घाटावर जमती
गंभीर निनाद जहाले
दिग्मंडळ भेदुन गेलें
चापावरतीं शर चढले
हसवी वीर–प्रारब्ध    हळदी घाटाचें युद्ध    २

वर कृष्णशिलांचे कडपे    बाजूस भयानक खोरें
घन हरित लतांतुन गेले    वृक्षांचे उंच मनोरे
निर्झर-प्रपातें उडती    सलिलाचे रम्य फवारे
ऐशा त्या विषमस्थानीं
हळदी घाटाच्या रानीं
मेवाडाचे अभिमानी

जाहले कराया सिद्ध हळदी घाटाचें युद्ध ३

ते भजक स्वातंत्र्याचे संहारक परदास्याचे
संभाविक नृपभक्तीचे संमर्दक परशक्तीचे
देशार्थ मानिलें त्यांनीं तृणतुल्य मोल जीवांचें
राठोड राव रजपूत
एकेक जणो यमदूत
करि कार्य एक घावांत
स्वर्गास करी संस्तब्ध हळदी घाटाचें युद्ध ४

मेवाड राजलक्ष्मीचा सौभाग्यकंठमाणि दिव्य !
स्वातंत्र्याचा आदित्य त्याचा उदयाचल भव्य !
ध्वज सिसोदिया वंशाचा क्षत्रीय वीरवर सेव्य !
राजस्थानाचा राणा
स्वातंत्र्य जयाचा बाणा
तो भीमकर्म करितांना
यज्ञकुंड गमलें शुद्ध हळदी घाटाचें युद्ध ५

शरशिला—वृष्टि भिल्लांची शत्रूस करी संचूर्ण
उत्साहोन्मुख तद्वृंद मेघासम होय विकीर्ण
कीं नक्रसंघ जमलेला तळभागीं होय विशीर्ण
आरक्त जाहला घाट
प्रेतांनीं अडली वाट
भिववी रणरूप विराट
सरलें न तरी संक्रुद्ध हळदी घाटाचें युद्ध ६

पर्वतावरी सिंधूचा सलिलौघ आदळे जैसा
शैलाच्या शृंगीं नाचे बालार्क किरण कीं जैसा
सेलीमाच्या गजशीर्षी राण्याचा ' चैतक ' तैसा
तेव्हांस पावला अल्ला
राण्याचा चुकला भाला
हत्तीसह हौदा फिरला
काळास करी संक्षुब्ध हळदी घाटाचें युद्ध ७

तो धर्मभूमिचा भर्ता राजनिष्ठ लोकभ्राता
निःशस्त्र जनांचा त्राता निःशक्त जनांचा पाता
समराश्रयांचा कर्ता कलहोन्मुख खलजनहर्ता
सद्‌गुणी धनुर्विद्येचा
अग्रणी खड्‌गशास्त्राचा
चूडामणि राजमण्यांचा
तत्प्रताप—गुण—संवेद्य हळदी घाटाचें युद्ध ८

काव्याचा सुंदर ओघ त्या भंवतीं उपमा जैशा !
सिंधूचा दीपस्तंभ त्या भंवतीं ज्योती जैशा !
तेजस्वी राण्यामागें तेजस्वी सेना तैशा !
मानोचित छत्र नृपाचें
सोन्याचें रवि—चिन्हाचें
त्या भंवतीं संकट नाचे
तेव्हां झालें बेहद्द हळदी घाटाचें युद्ध ९

तुर्की अफगाणी घोडे छत्रावर धांवत आले !

पाणबुडे मोत्यासाठीं  बुडले नक्रांनीं गिळिले !<br>
अहि--शीर्षमण्याच्या लोभें  घातकी जिवाला मुकले !

भाला बरची तरवार<br>
निर्दय शस्त्रांचे वार<br>
भूमीस शिरांचा भार

पेटलें असें अनिरुद्ध  हळदीं घाटाचें युद्ध १०

जों पडे प्रतापीं घाव  'तुवर' वंश देई मान !<br>
'झाला–कुल' झेली घाव  त्याचीही तुटली मान !<br>
गर्दीवर गर्दी झाली  सोडी न तरी मैदान !

'मानसिंह दावा मातें ?<br>
सलीम दाखवा मातें ?'<br>
ते तर दडलेले होते !

चिरकाल स्मृतिसंबद्ध  हळदी घाटाचें युद्ध ११

'चोंडावत' चंडतनूचे  'सुक्तावत' शक्तिधरांचे<br>
विख्यात देशभक्तांचें  सांडलें रक्त मोलाचें<br>
जे कडे कपारीं पडले  दर्शनही दुर्लभ त्यांचें

चैतकास झाली खूण<br>
पापणीहि लवली जों न<br>
तों 'प्रताप' गेला उडुन

शत्रूस करी हतबुद्ध  हळदी घाटाचें युद्ध १२

*

# रक्तास मिळालें रक्त !

हळदी घाटाच्या युद्धांत राणाप्रतापसिंह यानें शौर्याची पराकाष्ठा केली. १४००० मेवाडी रजपूत धारातीर्थी करून मेले. निदानीला चैतकावर स्वार झालेला प्रतापसिंह मोंगलांचा घेर फोडून निघाला. ‘ मुलतानी ’ व ‘ खोरासानी ’ या दोन धिप्पाड पठाणांनीं त्याचा पिच्छा पुरविला. सर्व दिवस पळतां पळतां तो व त्याचा घोडा दोघेहि थकून गेले; इतक्यांत पठाणांनीं लगट केली ! घामाघूम झालेल्या चैतकाच्या तोंडांतून फेस गळत होता, त्याच्यानें पाऊलही उचलवेना, अशा स्थितींत “ भिऊं नकोस, भिऊं नकोस. ” असें कोणी ओरडून बोलल्याचें प्रतापानें ऐकिलें. तो त्याचा ‘ सुक्त ’ नांवाचा भाऊ होता. पूर्वी प्रतापाशीं भांडण होऊन तो मोंगलास मिळाला होता. ते दोघे एका रक्ताचे असल्यामुळें कांहीं झालें तरी बंधूचें अनिवार्य मृत्युसंकट पाहतांच रक्त रक्ताकडे धांवलें. त्यानें त्या दोघां पठाणास ठार मारून बंधूस निर्भय केलें. दोघे भाऊ कडकडून भेटले. धन्याला संकटमुक्त पाहून चैतकानें प्राण सोडिला. त्याजवरील अलोट प्रेमानें राणाजीस फार दुःख झालें; त्यांनीं जेथें त्यास पुरलें तेथें त्याजवर एक चबुतरा बांधिला, तो ‘ चित्तकका चबुतरा ’ ह्मणून राजस्थानांत प्रसिद्ध आहे.

* * *

हळदी घाटाची भूमी कुरुभूमीसम करुनीया
शत्रूचे—छे ! दैवाचें आघात हृदयिं साहुनिया
चैतकचा स्वार उडाला रिपुमंडळ उल्लंघुनिया
‘ मुलतानी ’ ‘ खोरासानी ’
पुरविली पाठ दोघांनीं
पूर्वींचा वैरि असोनी
धांवला सहोदर ‘ सुक्त ’ रक्तास मिळालें रक्त ! १

सेलीमाच्या गजशीर्षीं ज्यानें नाचविल्या टापा

उन्मत्त शहाजाद्याला करण्यास लावि अनुतापा
दिल्लीच्या नृपलक्ष्मीला टाकाया लावी धापा
रणचतुर तुरंगम ऐसा
स्वामीच्या प्राणासरसा
धांवे गिरिकाननिं सहसा
तों साह्य मिळालें युक्त रक्तास मिळालें रक्त ! २

युद्धीं रक्ताचें स्नान आतां घर्माचें स्नान
तेव्हां वृत्ती बेभान आतां तनुवृत्ती क्षीण
स्वार आणि घोडा दोघे दोघांस दिसे निज-मरण
विखुरले मुखावर केस
तोंडांतुन गळतो फेंस
नावरतो श्वासोच्छ्वास
संकट होतां संप्राप्त रक्तास मिळालें रक्त ! ३

चौकींत चालला केव्हां भरधांव धांवला केव्हां
झाडींतुन गेला केव्हां अंबरीं उडाला केव्हां
ओढा गति अडवी जेव्हां घोडा तो उधळे तेव्हां
जाहली लगट अश्वांची
हालली ज्योत जीवाची
ऐकिली वाणि धैर्याची
'भिउं नको' शद्व हे स्पष्ट रक्तास मिळालें रक्त ! ४

'कोण तो ?' ह्मणोनी बघतां दुर्द्वेषी बंधू दिसला !
सदनांतिल हा तर सर्प यवनांस सहायक झाला !

क्षण एक संशयें जीव जाहला उत्कंठित पाळ !
तों रक्ताचा अभिमानी
मुलतानी खोरासानी
त्यांच्या संमुख ठाकोनी
मुक्त होय समरासक्त रक्तास मिळालें रक्त !

शंका निस्सीम पळाली आश्चर्य हांसलें थोर
प्रीतीला भरती आली आनंद डोलला फार
त्या सिसोदियावंशाच्या खांड्याचा जबरा मार
ढालेचे ढलपे तुटती
चिलकांड्या भंवतीं उडती
हुंकार मुखांतुन निघतो
वनदेवि वदति अव्यक्त 'रक्तास मिळालें रक्त !' ६

चंचल कवितेचा नूर उतरी जैसा शाहीर
इष्काची वेडी तार तोडी मर्दानी सूर
अफगाणी डोळ्यांवरचा उतरी तो तैसा धूर
तो क्षणांत भासे अरुण
तो क्षणांत भासे वरुण
परि जन वदती कीं अजुन—
'तो जातीचा रजपूत रक्तास मिळालें रक्त !' ७

'विजयोस्तु' ह्मणा सूक्ताचा शिर तुटलें खोरासानी !
'विजयोस्तु' बंधुधर्माचा शत्र पडलें तें मुलतानी !
दोघे मेवाडी भाऊ भेटले अहा ! कडकडुनी

हृदयाचीं कमलें फुललीं
शरिरें रोमांचित झालीं
बाष्पांची गंगा स्रवली
तींत दोष झाले लुप्त रक्तास मिळालें रक्त! ८

धनि संकटमुक्त जहाला चैतकास धुगधुग थोडी!
तो पंचप्राण धन्याचा पंचप्राणाला सोडी!
दिव्य शौर्य दिव्यहि वेग त्यांची तुटली ही जोडी!
त्या अश्व–समाधीवरतीं
स्वामिभक्ति बंधुप्रीती
दोघींही गीतें गातीं
त्यांतील एक हें गीत 'रक्तास मिळालें रक्त!' ९



# एक काल ऐसा होता.

( १ ) जुना भारतकाळ. ( २ ) श्री छत्रपतींच्या वेळचा मराठी काळ. ( ३ ) पेशवाईचा काळ. ( ४ ) पेशवाई बुडाल्यापासून तों श्री. विष्णुशास्त्र्यांपर्यंतचा काळ असे हे काळाचे निरनिराळे ४ भाग आहेत.

* * *

## भाग पहिला.

जग निद्रित होतें जेव्हां वेदांत घोष करणारे
जग अज्ञानावस्थेंत शास्त्रें तेव्हां रचणारे
जग उघडें होतें जेव्हां उन्नतिला तैं भिडणारे
ज्ञानवंत जन मतिमंत
धन विद्येनें श्रीमंत
होते येथेंच अनंत
रोमांच येति आठवतां एक काळ ऐसा होता १

एक वेळ गेले शद्ब काय ते पुन्हां फिरवावे
प्राणांतिक येवो काळ सत्य ते करुन दावावे
भीतीचें नांव कशाला स्वत्वातें प्रगट करावें
सत्याचा उज्वल दीप
सत्वाचें निर्मळ रूप
आर्यांची कीर्ति अमूप
ज्याकाळीं येई बघतां एक काळ ऐसा होता २

पाहिजे शूर कां तुह्मां ? वाचा अर्जुन चरिताला !
कां हवा तापसी सांगा ? पाहा विश्वामित्राला !
निग्रही पाहिजे कां हो ? अवलोका जा भीष्माला !

एकेक अलौकिक मूर्ति
करि कर्तव्याची पूर्ति
मिळवी जी शाश्वत कीर्ति
त्या नर-रत्नांचा दाता एक काळ ऐसा होता ३

पाठीस घातला ज्याला रक्षक होतील तयाचे
कुणि आश्रित होउन आला तर तरुवर हे छायेचे
कुणि चातक होउन आला तर पयोद हे मायेचे
चंदन घासून तनूचें
परक्यांना सुखवायाचें
श्रेष्ठत्व भारतीयांचें
जन वर्णिति येतां जातां एक काळ ऐसा होता ४

परधर्माचे ना द्वेष्टे निजधर्माचे अभिमानी
ना गुलाम करितिल कोणां, राखतील अपुलें पाणी
अपहार न ठावा ज्यांना व्यवहार नीतिचे ज्ञानी
सच्छील श्रद्धायुक्त
स्वातंत्र्याचेही भक्त
ऐहिक विभवास विरक्त
प्रसवी जो आर्यश्रेष्ठां एक काळ ऐसा होता ५

" सोन्याचा कोठें धूर ? तर भारत-खंडामध्यें !
रत्नांच्या कोठें खाणी ? तर हिंदुस्थानामध्यें !
अमृताची वृष्टी कोठें ? तर आर्यावर्तामध्यें !
हें यश परक्यांनीं गावें
मन अगदीं मोहुन जावें
तारूवर भटकत यावें
पाहाया ती सुंदरता एक काळ ऐसा होता ६

# एक काळ ऐसा होता.

## भाग दुसरा

बिनतारांचे संदेश सोडावे रायगडानें
त्यावरुनी इतर गडांनीं झुंजावें अति जोमानें
गोळ्यांच्या पर्जन्यानें भिजवावीं रणमैदानें

शौर्याचा पाहुनि थाट
तोंडांत घालुनी बोट
फिरवावी रिपुनें पाठ

व्हावी भुइ थोडी पळतां एक काळ ऐसा होता १

गिरि–कुहरांतुनि उफळोनी वनराज केसरी यावा
कीं ज्वालामुखि भडकोनी आगीचा लोळ उठावा
कडकडुनी जलधरमाला वीजेचा गोल तुटावा

" शिवबाची स्वारी उठली
भ्रुकुटी कोणावर चढली ?
कोणाची घटिका भरली ? "

ऐकाया ये जन–वार्ता एक काळ ऐसा होता २

भूपाल महाराष्ट्राचा दरबारीं जेव्हां यावा
" श्री छत्रपती शिवराज !" जयघोष असा उसळावा
सरदार शिलेदारांचा संघात उभा ठाकावा

गोऱ्याचा टोपीवाला
दिल्लीचा दाढीवाला
मान्य जो तयांसहि झाला

लवविसात अपुल्या माथां एक काळ ऐसा होता ३

[library stamp]

औरंगपुराचें रूप बेरंग करोनी फिरती
दाभोळावर वेगानें टोळासम जाउन पडती
सुरतेच्या सुरतीवरतीं जे हात फिरउनी येती
गो-विप्रांचे ते वाली
विजयाचा तिलक कपाळीं
लावोनी ज्या त्या वेळीं
झटले जैं देशाकरितां एक काळ ऐसा होता ४

वेढिला पुरंदर किल्ला दिल्लीच्या दिल्लिरखानें
कोंडाणा कोंडुन धरिला 'जयसिंह' समर-धीरानें
किल्ल्याचे तट लढताती शौर्यानें उत्साहानें
जरि शिरें तुटोनी पडतीं
तरि रायाची आज्ञा ती
रणि कबंध पाळित असती
स्पृहणीय राजभक्तीचा एक काळ ऐसा होता ५

जन्मभूमिसाठीं सांगा जातील मृत्युच्या द्वारीं !
कुलकीर्तीसाठीं सांगा काळाचे होतिल वैरी !
देशबंधुसाठीं सांगा शेपावर करिती स्वारी !
समशेरी नाचविणारे
भाल्याला खेळविणारे
चापाला भूषविणारे
या शूरांचा जो दाता एक काळ ऐसा होता ६

जमवून मांड घोड्याला भरधांव कसा फेंकावा
जातांना निजखड्गानें रिपु-कंठ कसा छेदावा
नाचवीत भाला हातीं शत्रूस कसा वेधावा
हें शिक्षण नव तरुणांचें

'देशभक्त' या पदवीचें
ना बी. ए एल्‌एल् बीचें
उपयोग काय पण आतां     एक काळ ऐसा होता     ७

शिवरायासाठीं अपुलें     सौभाग्यहि मळवायाला
एकुलता एकच पुत्र     तोही पण गमवायाला
तत्पर ज्या होति सुखानें     धन्य ! धन्य ! साध्वी विदुला
अपुलें फुटलें जरि भाळ
सुखि राहो शिवभूपाल
सुखि असो देश चिरकाल
ध्यास हाच युवती-चित्ता     एक काळ ऐसा होता     ८

जैं महाराष्ट्र भूमीची     भाग्याची होती सृष्टी
कोणाची जननी व्याली     टाकील वांकडी दृष्टी
कोणाची छाती होती     बोलेल वांकड्या गोष्टी
रावा पासोनी रंका
कोणाला नव्हती शंका
शिवबाचा एकच डंका
चहुं दिशेस वाजत होता     एक काळ ऐसा होता     ९

घेवोनी उत्कंठेनें     वाचावा गत इतिहास
भिजवावीं त्यांचीं पानें     सोडावा दिर्घोश्वास
जीर्ण दुर्ग ते पाहोनी     व्हावें हो चित्ति उदास
आठवून त्या त्या गोष्टी
लक्षून आजची सृष्टी
अंतरांत व्हावें कष्टी
येती वच सहजीं वदतां     एक काळ ऐसा होता     १०

# एक काळ ऐसा होता.

## भाग तिसरा.

राघोबा कोठें आहे ? अहमदाबाद वेशीला
ह्मणतात कुणी-' छे ! भिडला अजमीराच्या कोटाला !'
इतुक्यांत बातमी आली थडके तो मुलतानाला !
जों अधिपति लाहोराचा--
पोषाख चढवि युद्धाचा
सेनापति पुण्यपुरीचा--
थडके लाहोरा पुढती ! एक काळ ऐसा होता १

कृष्णा--कांठाचे घोडे अटकेला पाणी प्याले
सह्याद्रीचे रणशूर हिमगिरीस जाउन भिडले
हस्तिनापुराची लक्ष्मी ढालेवर घेउन आले
त्यांना तैं अडवायाची
छाती न होय एकाची
घटिका ती ऐश्वर्याची
येतात अश्रु आठवितां एक काळ ऐसा होता २

होसुरचा वाघ निघाला सावनूर काबिज केलें !
धारवाड--मैदानांत पंजाचे डावचि खेळे !
खेळ खेळ बेटा ! खेळ पाहा पण उघडुनि डोळे !
युद्धाचे तालिमवाले
पटवर्धन चालुन आले

पाहतांच सावज लोळे
स्फुरते तनु ज्यातें स्मरतां  एक काळ ऐसा होता ३

हैदराबादचे वीर  राखाया पाणी झटती
भाऊच्या समशेरीचें  चाखोनी पाणी पळती !
राहील कोठचें पाणी  पाण्यानें तोंडें सुकतीं !
हत्तीच्या सोंडेवरतीं
घोड्यांच्या तोंडावरतीं
जय--चिन्हें शोभा देतीं
शौर्य-श्री-वर्धनकर्ता  एक काळ ऐसा होता ४

एका निजराष्ट्रासाठीं--विप्र  क्षत्रिय ते वैश्य
जातिभेद विसरुन अपुला  व्हावे रणिं एक अवश्य
एकीचें कळलें होतें  सकलांस खरें स्वारस्य
उन्नतिच्या मंगल कालीं
स्वातंत्र्य--निशाणाखालीं
देशभक्त वेळेवेळीं
यावेत सोडुनी स्वार्था  एक काळ ऐसा होता ५

गारदी फौज खानाची  संगीन खोंवुनी चाले
ग्वालेरी पगडीवाले  सरदार तोलती भाले
माळवी रिसाले भव्य  हेषा--रव करिते झाले
पांढऱ्या गजावर बसुनी
पेशवे निघाले सजुनी
इंद्राची स्वारी ह्मणुनी

भास हाच व्हावा चित्ता    एक काळ ऐसा होता ६

गड दुर्ग न ऐसा उरला    वांचला न ज्याला भाला
ऐसा न कोणता प्रांत    जो पुण्यपुरीस न भजला
भूपती न ऐसा कोणी    श्रीमंतांस न जो लवला

ज्या दिशेस मुख फिरवावें
तेजाचे किरण पडावे
डोळे हे दिपुनी जावे

वैभव--रवि होता चढता    एक काळ ऐसा होता ७

गारांचा पाउस बरवा    बरवी न वृष्टि शिंदांची
स्वारी जी होळकरांची    त्याहून बरी व्याघ्राची
धडगति ना यद्देवाची    त्यांनाच गांठ फडक्यांची

शत्रूंना ज्यांची भीति
अत्यंत वाटली चित्तीं
त्या गेल्या गेल्या मूर्ति

तोंडानें बोला आतां    एक काळ ऐसा होता ८

जो 'हर! हर!' गर्जुनि गेला ध्वनि दोन्हीही टोंकाशीं
हर देई त्याची साक्ष    रामेश्वर--काशीवासी
ऐकाया येइल काय ?    रवि रोज येइ उदयासी

गिरिशिखरीं आरोहून
रणतीर्थे तीं पाहून
परवश स्थिती जाणून

चंद्रांशु स्मरतो बुडतां    एक काळ ऐसा होता ९

---x---

# एक काळ ऐसा होता

## भाग चवथा

कोरेगांवाच्या पगड्या खुंटीवर झळकत होत्या
अष्टयाच्या संग्रामाच्या तरवारी लटकत होत्या
बंदुकीमुळें फुटलेल्या गेहिं गेहिं ढाला होत्या
गाजविलेल्या शौर्याचा
ओढवलेल्या दैवाचा
इतिहास मुखें शेवटचा
सांगती शूर हळहळतां एक काळ ऐसा होता १

पारतंत्र्य—शय्येवरतीं भारत निजलेला होता
आंखडून साऱ्या नाड्या दम छातीमध्यें होता
आकळ्या दिल्या जोरानें शेवटीं अचेतन होतां
मिरतेला उठला बार
कानपुरीं झडली फैर
दिल्लीस माजलें वैर
दीप होय मोठा विझतां एक काळ ऐसा होता २

झाले नानासाहेब साहेबांचे तैं काळ
केले तात्या टोप्यांनीं टोपीवाल्यांचे हाल
झांशीची लक्ष्मी अबला प्रबलांशीं करि कल्लोळ
हाताशीं आला स्वर्ग
मिरवी जो तो निजगर्व

भूपाल ह्मणविती सर्व
कोणी न कुणाचा शास्ता एक काळ ऐसा होता ३

मर्दांच्या मर्दुमकीचे पोवाडे रचिले जातां
लढवय्यांच्या नांवाची ती थाप डफावर पडतां
स्वातंत्र्याच्या काळाला हौसेनें शाहिर गातां
तों सुधारणा नव आली
गेलेल्या वैभव-कालीं
भुरळ ती मनाला घाली
तिजलाही भुलली जनता एक काळ ऐसा होता ४

देवधर्म मानुन झूट घालावा भलता वाद
संध्यास्नानें राहोत जावें नित हाटेलांत
भक्षावें तेथ अभक्ष्य तें अपेय-पान करीत
डबक्यांतिल मंडुक जैसे
भक्षोनी पंकिल घोषें-
डरडरती कटु आवेशें
बोलाव्या तैशा बाता एक काळ ऐसा होता ५

परक्यांची संस्कृति गावी निंदावें वंद्य ऋषींना
आचार उचलुनी त्यांचे हिणवावें साधुजनांना
देव्हारें मांडुन त्यांचें हांसावें देव्हाऱ्यांना
आर्यांच्या सद्वेदांचा
आचार्यांच्या ग्रंथांचा
अभिमानहि नुरला साचा

पोशाखींही परवशता एक काळ ऐसा होता ६

इंग्रजी शिकोनी थोडें पुस्तकी ज्ञान मिळवावें
एखादी पदवी मिळतां विद्वान ह्मणुन मिरवावें
वाणीचें तांडव करितां परशब्द मधें घालावे
देशाच्या पोकळ गोष्टी
करितांना केवळ ओष्टीं
एकाला दुसरा पुष्टी
देई, श्रम कांहि न करितां एक काळ ऐसा होता ७

विल्यम्साचें ह्मणणें कीं 'कालिदास सत्कवि कसचा !'
मानिएर बोले त्याला[१] 'कर्ता कृत्रिम कवितेचा !'
आह्माला मान्य असाव्या मत्सर–ग्रस्त तद्वाचा !
अमुच्या विद्वद्रत्नांना—
परके निंदित असतांना—
तुकवाव्या आह्मीं माना
ग्रंथही न केवळ बघतां एक काळ ऐसा होता ८

'शिव भूप लुटारू होता' ढोलकें अह्मीं बडवावें !
'अगदींच निरक्षर होता' तुण तुणें अह्मीं ताणावें !
'विश्वासघातकी होता' सूरांत सूर मिसळावे !
राज्याला मुकलों जैसें
बुद्धीला मुकलों तैसें
सांगितलें कोणीं जैसें

१ कालिदासाला

मानावें तैसें चित्ता  एक काळ ऐसा होता  ९

जोंवरी विष्णुशास्त्र्यांनीं  लेखणी उचलली नव्हती
लेखणी कशाची छे-हो !  स्वाभिमान दीपज्योती
जोंवरी लोकमान्यांची  निश्चयांत मूर्ती होती
निजपूर्वज-वंचक तोंची
आपुली खांच उदराची
भरण्यासाठीं स्वत्वाची
दिसले जैं विक्री करितां  एक काळ ऐसा होता  १०



स्वस्तिक वाचन
पाडा - ठाणे

# केवळ देशाकरितां

" स्वदेशाकरितां लढतां लढतां समरांगणावर पतन पावलेल्या आपल्या पुत्रानें आणखी काय सांगितलें ? " असें बापानें गहिंवरून विचारलें. तेव्हां अंतसमयीं जवळ असलेला त्याचा मित्र बापास त्या मृतवीराचें शेवटचें भाषण सांगत आहे.

*  *  *  *

प्रिय-पुत्र दिवंगत झाला    स्वातंत्र्य—रणीं लढतांना
तन्मित्रें शोकद—वार्ता    कथिली मातापितरांना
मातेची शुद्धी गेली    करि विलाप भगिनी नाना
' बाळ काय वदला अंतीं ? '
पुसतसे तात शोकांतीं
कथि तदंत्य-वाणी तो ती—
" जन्मुनी धन्य मी झालों    देशाच्या कामीं आलों "  १

' शूरांच्या वंशीं शूर    वीरांच्या सुकुलीं वीर
मर्दांच्या पोटीं मर्द    धीरांच्या उदरीं धीर '
मज जागृति या वचनांची    देत होति ही **समशेर**
कुलदेवी हीच भवानी
कुल-पुरुषांनीं वंदोनी
कुल भूषविलें सकलांनीं
तें यश रक्षाया झटलों    देशाच्या कामीं आलों  २

उलटला रंग युद्धाचा 'घे मार' सुरू जैं झाली
स्मृति झाली तैं स्वजनांची क्षण वृत्ती होय निराळी
तों **"केवळ देशाकरितां"** ही ध्वजाक्षरें वाचियलीं
तेव्हांपासुन खड्गानें
प्राशिलें रक्त किति नेणें
तें तेंच एकलें जाणें
कर्तव्यीं मी रमलेलों देशाच्या कामीं आलों ३

ना प्रभाव या हातांचा सर्व तो जननि-दुग्धाचा
ना विक्रम मद्देहाचा आर्यांच्या कुलकीर्तीचा
नाचविला भगवा झेंडा ज्यांनीं शिवछत्रपतींचा
मातापितरांची प्रीती
तच्चरणीं माझी भक्ती
उभयांची तुटली ग्रंथी
सेवेला त्यांच्या मुकलों देशाच्या कामीं आलों ४

एकुलता होतों एक पितरांनों ! वंशज तुमचा
हृदयाची कोमल भगिनी बंधु एक मी प्रेमाचा
ऐकतांच मन्निधनाला लोटेल पूर बाष्पाचा
पृथ्विराज पडला जेथें
तानाजी निजला जेथें
दाखवून निज शौर्यातें
स्वातंत्र्य-रणीं त्या निजलों देशाच्या कामीं आलों ५

मंदारपुष्पनवमाला घेवोनी निर्जरबाला

खेळवीत निजहास्याला दाखवीत अभिनय-लीला
वाद्यांच्या घेउन ताला वाजवीत घुंगुरमाळा
आला हा त्यांचा मेळा
दिसतसे स्पष्ट नयनांला
मित्रा ! जननीजनकाला—
जा सांग; 'स्वर्गीं गेलों देशाच्या कामीं आलों' ६

* * *

हृदयावर ठेवुन हात शोकानें विव्हल तात
आकाशीं वर पाहात गद्गद वदला दुःखांत
राखोनी 'बाळा !' नांव मज केलें धन्य जगांत
देशाची आज्ञा होतां
केवळ जे प्राणाकरितां
कचरतील लढतां लढतां
तत्क्षणीं वाणी खेळो 'देशाच्या कामीं आलों' ७

# परीक्षा पास झाली; पण पुढें काय ?

## दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?

जाहली परीक्षा पास ऐकिली मींहि ती वार्ता
नवसास पावला देव झाली ना श्रमसार्थकता ?
'कृतकृत्य जाहलों' ऐसें गमतें ना तुझिया चित्ता ?
रात्रीचा करुनी दिवस
गणितां न नेत्रविकृतीस
जपतां न तसें प्रकृतीस
मिळविलें यश परी हाय ! दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? १

कारागृहिं पडली आई पाहते दीनवदनानें
भाळास लावुनी हात न्हाते ती अश्रुजलानें
तोडून कडाकड बेड्या फेंकाव्या निजहस्तानें
ऐशा निकराच्या वेळीं
दुःखाची पेटे होळी
जन्मभू तिची आरोळी
तुज अरण्यरोदन होय दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? २

देशानें आशा केली 'फिरवील दिवस हा माझे'
जन्मभूमि वांछित होती 'उचलील संकटीं ओझें'
राष्ट्रेच्छा कीं, 'उघडील स्वातंत्र्याचे दरवाजे'
जन्मलास ज्या देशांत
वाढलास ज्या भूमींत

त्यांचा अभिमान तुझ्यांत
सांग? सांग? तरुणा! काय? दास्य हेंच ना त्वद्ध्येय? ३

वीनीवरचे सरदार लढतांना पडले युद्धीं
उरलेले बघती मागें वोलाविति तरुणां आधीं
ती कर्तव्याची हाक स्वार्थांध तुझी पण बुद्धी
ये अशिक्षितांतहि वारें
मर्दांचा देह थरारे
घोकुनी बुकांचे भारे
त्वत्स्वत्व लयाला जाय दास्य हेंच ना त्वद्ध्येय? ४

देशभक्त-चरितें ज्यांत घोकलास ना इतिहास?
पृथ्विराज शिवरायांनीं मोहिलें न काय मनास?
कर्तृत्व तयांचें तुझिया हालवी न कां हृदयास?
पोटाचा जो अभ्यास
बुद्धीचा त्यांत विकास
व्हायाचा नाहीं खास
अव उदाहरण या योग्य दास्य हेंच ना त्वद्ध्येय? ५

तो प्रतापराणा तरुणा! 'बी. ए.' झालेला नव्हता
शिवभूप परीक्षा द्याया 'एम्. ए.' ला बसला नव्हता
परि देशाकरितां होता धगधगत तयांचा आत्मा
देशभक्त एकहि पुरतो
देशमुक्त करण्याला तो
इतिहास तयांचा तुज तो

श्रुत असतां निःसंदेह दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?

तानाजी बाजी गाजी एसाजी तो नेताजी
संताजी आणि धनाजी वा ! राणोजी दत्ताजी
राखोनी अपुली बाजी देशाच्या खपले काजीं
तो उज्वलतेचा काळ
ही परवशतेची वेळ
दोहोंत घालुनी मेळ
ठरविलें तुवां अनिवार्य दास्य हेंच ना त्वद्ध्येय ! ७

ब्रह्मचर्य देशासाठीं गार्हस्थ्यहि देशासाठीं
विद्यार्जन देशासाठीं द्रव्यार्जन देशासाठीं
संसारहि देशासाठीं कांहींच न अपुल्यासाठीं
हें ध्येय असें आर्यांचें
तत्पुत्र ह्मणविणारांचें
यत्कीर्ती चपला नाचे
तत्कुलीं जन्मुनी देह दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ८

'आचार्य' 'भट्ट' पदवींचे विद्वान इथें वा ! होते
ज्यांच्याशीं नव विद्वत्ता लागेल न पासंगातें
ऐसे गुलाम होण्याकरितां विद्वान जाहले नव्हते
ज्योतिःशास्त्राला शिकशी
गणितांत हुषारहि ठरशी
उपयोग काय देशाशीं ?
ह्मणवि तूं 'भास्कराचार्य' दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ९